आपत्तीवर मात

बीजेएसची साथ



सरोजिनी चव्हाण

आपत्तीवर मात - बी.जे.एस. ची साथ

सौ. सरोजिनी चव्हाण

आपत्तीवर मात - बी.जे.एस. ची साथ

सौ. सरोजिनी चव्हाण

सर्व हक्क सुरक्षित

संयोजन : डॉ. श्रीराम गीत

प्रकाशक

शांतिलाल मुथ्था

भारतीय जैन संघटना (बी.जे.एस.)

८ वा मजला, मुथ्था चेंबर्स २, सेनापती बापट मार्ग,

पुणे - ४११ ०१६

मुद्रक

प्रभात प्रिंटर्स

४२७ गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७

मुखपृष्ट

चिंतामणी हसबनीस

प्रथम आवृत्ती

५ मे २०१२

किंमत : रू. १००/-

अर्पणपत्रिका

अज्ञानांध:कारामधून ज्ञानरूपी प्रकाशाकडे,

मृत्युरूपी क्षणिकत्वापासून श्वाश्वततत्त्वाकडे,

दुर्वृत्तीपासून सद्वृत्तीकडे,

घेऊन जाणाऱ्या

संवेदनशील, स्वयंप्रेरित

वाटचालीला.....

सन्मानपूर्वक अर्पण.

अनुक्रमणिका

१. भारतीय जैन संघटना :
समाजकार्यातील अग्रणी संस्था ८

२. आपत्ती व्यवस्थापन:
भारतीय जैन संघटनेचे कार्य १४

३. लातूरचा धडा:
आपत्ती नियोजनाची पायाभरणी २१

४. वाघोली प्रकल्प उभारताना ३५

५. मेळघाटचे कुपोषणाला सामोरे जाताना ५१

६. पुन्हा भूकंप : गुजरातची हाक.....६२

७. त्सुनामीचे तांडव: तामिळनाडू, ...७७

८. भूकंप व टोकाचे हवामान :
जम्मू-काश्मीरचे अनुभव ९९

९. मांढरदेवी दुर्घटना ११०

१०. पूराचे थैमान: महाराष्ट्र व बिहारचे धडे
आकडेवारीतून ११३

११. संवेदनशीलतेने आपत्तीला सामोरेजाताना .. १२०

१२. उपसंहार १३५

लेखिकेचे मनोगत

आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात लिहिण्याबाबतचा प्रस्ताव जेव्हा माझ्यासमोर आला, तेव्हा एक क्षणभर विचार चमकला की, आपत्ती, आपत्तीनिवारण वा आपत्ती व्यवस्थापन यासंदर्भात तर माझ्याकडे बरेच अज्ञानच आहे. पण भारतीय जैन संघटनेच्या मुख्यालयात, अध्यक्ष शांतीलालजीं समवेत जेव्हा मिटींग झाली, त्यांच्या आपत्तीसंदर्भातील कार्याचा आवाका पाहून मन अचंबित झाले आणि जसजसे आपत्तीसंदर्भातील भारतीय जैन संघटनेने देशभरात केलेले कार्य अभ्यासू लागले, तसतशा माझ्यातील जाणिवांच्या कक्षा रुंदावत गेल्या.

संघटनेच्या कार्यातील नियोजनपद्धती, बारकाईने केलेला घटनेचा अभ्यास, वेळापत्रक, काटेकोर व शिस्तबद्धरीतीने केलेली कामांची विभागणी, अंमलबजावणी मी अभ्यासत गेले. प्रत्येक ठिकाणी घडलेल्या घटनेशी निगडीत संदर्भ आणि भारतीय जैन संघटनेने केलेल्या कार्याची आखणी बारकाईने समजून घेतली. या सर्व घटनांमध्ये, आपत्तीदरम्यान भारतीय जैन संघटनेने केलेल्या कार्याची गुंफण पुस्तकरूपाने बांधण्यास घेतली, तेव्हा जाणवत गेले की, हे नुसतेच कार्य नाही तर संवेदनशील मनाने इतरांच्या भावनांचा, परिस्थितीचा विचार करून, त्या परिस्थितीला आपले मानून, परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी केलेले अथक, अविरत प्रयत्न होत. स्वयंस्फूर्त प्रेरणेतून निर्मिलेला हुंकार दुसऱ्यांच्या वेदनांवर, दु:खावर फुंकर घालण्यासाठी कटिबद्ध होऊन प्रयत्नरत असतो.

स्वयंसेवी संस्था अनेक असतात, पण भारतीय जैन संघटनेचे कार्य हे या सर्वांपेक्षा वेगळे आहे. संवेदना, भावना आणि अनुभवांचे अनोखे मिश्रण या कार्यातून प्रतीत होते. याशिवाय भारतीय जैन संघटनेच्या कार्यातील मला भावलेली सर्वांत

महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रसिद्धीपराङ्मुख राहून प्रत्यक्ष कृतीवर दिलेला भर.

या परिश्रमांना, अथक प्रयत्नांना शब्दबद्धरीत्या एकत्रित करण्याचे काम या पुस्तकाद्वारे मी करीत आहे. आतापर्यंतच्या माझ्या लेखनापेक्षा वेगळ्या प्रकारचे लेखन करायला मिळाल्याचे समाधान निश्चितच आहे, याशिवाय भारतीय जैन संघटनेसारख्या नावाजलेल्या स्वयंसेवी संस्थेच्या कार्याविषयी लिहिण्याचे भाग्य मला मिळाले, याचाही खूप आनंद आहे.

मनुष्यजीवनामध्ये आकस्मितपणे उद्‌भवणाऱ्या आपत्तींमुळे असे जाणवले की, ईश्वराचे अमर्यादितत्त्व व त्याचे अमाप सामर्थ्य, तसेच स्वत:च्या इच्छेप्रमाणे निर्मिती आणि विनाश करण्याची त्याची शक्ती, विश्वाचे अनादित्व व अनंतत्व हे सारे आपल्याला मान्य करावे लागते. पण यासर्वांत समाजाविषयी संवेदनशीलतेने कार्यरत राहण्यातच शाश्वतत्त्व अंतर्भूत आहे. समाजविषयक कर्माचा उगम व्यक्तिगत गुणधर्मांपासून होतो. समाजाची आणि साऱ्या जगताची सुस्थिती कायम राखण्यासाठी प्रत्येक व्यक्ती व त्याची कृती या गोष्टी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत असे असल्याचे कारण मला वाटते की, अखिल विश्व ही ईश्वराची निर्मिती असून मानवप्राणी ही त्याची किमया आहे. सेवाभावी अंत:करणाने मानवाची केलेली सेवा, ही खऱ्या अर्थाने ईश्वरसेवाच होय!

- सौ. सरोजिनी चव्हाण

१. भारतीय जैन संघटना : समाजकार्यातील अग्रणी संस्था

भारतीय जैन संघटना ही एक स्वयंसेवी संस्था आहे. वीस एक वर्षांहून अधिक काळ आपत्ती निवारण व व्यवस्थापनाच्या क्षेत्रात ही संघटना कार्यरत आहे. भारतीय जैन संघटनेचे कार्य फोफावले ते बीड मधून. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व सर्वेसर्वा श्री. शांतीलालजी मुथा, मूळचे बीडचे. आपल्या शालेय, महाविद्यालयीन जीवनापासूनच ते सामाजिक कार्यात सहभागी आहेत. सन १९८५ मध्ये त्यांनी "अखिल महाराष्ट्रीय जैन संघटना" नावाची संस्था सुरू केली. त्याद्वारे ते "वधू-वर संम्मेलन", सामुदायिक विवाह सोहळा, हुंडाबंदी, प्लास्टिक सर्जरी कँप, यांसारखे उपक्रम राबवित. त्यातून त्यांची समाजकार्याविषयीची तळमळ, जाणीव व सामाजिक बांधिलकी सर्वांना परिचित होतीच. त्यांचे कार्य केवळ जैन समाजापुरते किंवा जैनबांधवांपुरते मर्यादित कधीच नव्हते किंवा लाभार्थीही केवळ जैनधर्मीय नव्हते. संपूर्ण भारतात जैन समाज ०.४% आहे. काश्मीर ते कन्याकुमारी सगळीकडे जैन समाज विखुरलेला आहे. गंमतीने म्हटले जाते की, "जहाँ ना पहुँचे बैलगाडी, वहाँ पहुँचे मारवाडी।" प्रत्येक राज्य,

जिल्ह्यात जैन समाज आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून स्थिरावलेला आहे.

जैन समाज एक अहिंसावादी समाज आहे. करुणा आणि प्रेम हे या समाजाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. भगवान महावीर यांना अहिंसेचे प्रतीक मानले जाते. करुणा, प्रेम ही त्यांची शिकवण आहे.

हजारो जैन साधुसंत त्यांची ही शिकवण स्वत: आत्मसात करून इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी मैलोन्‌मैल पदयात्रा करतात, पायी फिरतात. व्यवसाय, व्यापार या क्षेत्रांमध्ये कार्यरत असणारे सर्वात जास्त जैन लोक आहेत. देशभरात कुठेही, कोणत्याही प्रकारची आपत्ती आली तरी तिचे निवारण करण्यासाठी, आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी, सहकार्यासाठी सर्वांत पुढे कोण असतील तर ते जैनबांधव! संपूर्ण भारतात जैन समाजाच्या २५०० शैक्षणिक संस्था आहेत. खूप लोक स्वत:च्या पैशाने समाजकार्याची उभारणी करतात. या संपूर्ण समाजकार्याला एक दिशा, एकत्रितपणा निर्माण करणे शांतीलालजींना आवश्यक वाटले. जैन बांधवांच्या या संपूर्ण समाजकार्यामध्ये, पैशाच्या नियोजनामध्ये एकसूत्रीपणा, नियोजनबद्ध आराखडा व एकछत्री कार्यभार असण्याची गरज शांतीलालजींना वाटली. त्यामुळे १९९३ मध्ये शांतीलालजींनी या संघटनेचे नामकरण भारतीय जैन संघटनाङ्क असे केले. व आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यात, शैक्षणिक, सामाजिक कार्यात दिली जाणारी मदत, केले जाणारे कार्य एका व्यासपीठावर एकत्रित केले, ते म्हणतात, “If the purpose is right, the means will follow.”

त्याप्रमाणे भारतीय जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांचे जाळे देशभर पसरलेले आहे. कोणतीही आपत्ती झाली तरी दोन-तीन

तासांत साहाय्योजनेचा आराखडा ठरवला जातो, इतके ते एकमेकांच्या संपर्कात असतात.



व्यवस्थापन समिती	
व्यवस्थापन समिती	गणसंख्या
राष्ट्रीय समिती	२०
राज्य समिती	७६
विभाग समिती	२८८
जिल्हा समिती	९८७
शहर समिती	१२९८
कार्यकर्ते	हजारो

भारतीय जैन संघटनेचे कार्य नैसर्गिक व मानवनिर्मित अशा दोन्ही प्रकारच्या आपत्ती व्यवस्थापनामध्ये आहे. ६ डिसेंबर १९९२ रोजी उत्तरप्रदेशमध्ये बाबरी मशिदीचा पाडाव करण्यात आला व संपूर्ण देशभर मानवनिर्मित आपत्तीचा प्रसंग ओढावला.

शांतीयात्रेचे आयोजन :

रामजन्मभूमी वाद व त्यानंतर बाबरी मशिदीचा पाडाव या दोन्ही गोष्टींमुळे संपूर्ण देशभर तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली. जातीय दंगली व जाळपोळ यामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले. संवेदनशील भागांमध्ये कर्फ्यू लावण्यात आला तर अतिसंवेदनशील भागात दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आले.

अशा संपूर्ण तणावपूर्ण स्थितीमध्ये देश असताना, भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष श्री. शांतीलाल मुथा यांनी शांतता राखण्याचे व संयम बाळगण्याचे आर्जव केले. अहिंसा व करुणा या जैन बांधवांच्या मुख्य शिकवणीला अनुसरून त्यांनी "शांतीयात्रेचे" आयोजन केले. डिसेंबर १९९२ ते फेब्रुवारी १९९३ पर्यंत भारतीय जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पुणे ते नागपूर दरम्यान शांतीयात्रेचे आयोजन केले.

यानिमित्ताने भारतीय जैन संघटनेने विविध धर्मीय, प्रांतीय नेत्यांना, कार्यकर्त्यांना एकत्र आणले. शंकराचार्य व आचार्य सुशिलजी मुनी यांची भेट भारतीय जैन संघटनेने घडवून आणली. त्याचबरोबर मौलाना वाहीबुद्दीन खानसाब, स्वामी चिदानंदजी, पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, समाजसेवक अण्णा हजारे, यांसारखे सर्व प्रतिष्ठित मान्यवर देखील शांतीयात्रेत सहभागी झाले होते. शांतीयात्रेमुळे सामाजिक व सौहार्दाचे वातावरण निर्माण होण्यास, तणावपूर्ण वातावरण निवळण्यास निश्चितच मदत झाली.

फेडरेशन ऑफ जैन एज्युकेशनल इन्स्टिट्यूटस् (FJEI) :

FJEI हे भारतीय जैन संघटनेद्वारे संचलित शैक्षणिक संशोधन संस्था आहे. भारतभर जवळपास २५०० शैक्षणिक संस्थांचे जाळे पसरलेले आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल, क्रांती या माध्यमातून घडवून आणली जात आहे.

एकंदरीतच, भारतीय जैन संघटनेचे कार्य हे सामाजिक, शैक्षणिक व आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रात विस्तारलेले आहे. भारतीय जैन संघटना ही अराजकीय, स्वयंसेवी संस्था आहे. ना नफा तत्त्वावर ही संघटना सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी पार पाडत आहे. सामुदायिक विवाह, आरोग्य, शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन यांमध्ये त्यांनी केलेले कार्य तळागाळापर्यंत पोहोचले आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा फायदा मिळविण्याचा तसूभरही प्रयत्न होत नाही, हे या संघटनेच्या कार्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

१९९२ पासून भारतामध्ये भूकंप, त्सुनामीसारख्या आपत्ती मोठ्या प्रमाणावर आल्या. पण भारतीय जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व शांतीलालजींनी अतिशय धीरोदात्त, निश्चयी, दूरदर्शी व नियोजनबद्धरीत्या या संकटांचा सामना केला. काही वेळा घेतलेले निर्णय चुकताहेत काय अशीही परिस्थिती यायची, उदा. लातूरहून १२०० मुलांना पुण्याला आणण्याचा निर्णय. अशावेळी खळाळत्या समुद्रात उचंबळणाऱ्या लाटांप्रमाणे शांतीलालजींचे मनही काही काळ खळबळून उठत असे. पण क्षणभरच!

पण स्वीकारलेले कार्य तडीस न्यायचे ही मनातील ऊर्मी नैराश्याचे सर्व मळभ दूर करीत असे. हीच प्रेरणा, हीच ऊर्मी, हाच सकारात्मक विचार, आशावाद संघटनेचे कार्य पुढे नेत आहे. सर्वसामान्यांच्याही जीवनातील नैराश्याचे मळभ, अंधाराचे

साम्राज्य दूर करून प्रकाशमय चैतन्य निर्माण करीत आहे. शांतीलालजी अविरतपणे कार्यरत आहेत आणि म्हणूनच सामाजिक, शैक्षणिक, आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील भारतीय जैन संघटनेची कामगिरी सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे!

शांतीलालजींच्या प्रेरणेने निर्माण झालेली ही संस्था समाजकार्यातील एक नामांकित, अग्रणी संस्था म्हणून गणली जाते.

☆☆☆

२. आपत्ती व्यवस्थापन: भारतीय जैन संघटनेचे कार्य

भारतीय जैन संघटना एक स्वयंसेवी संस्था आहे. १९९३ च्या लातूर भूकंपानंतर भारतात बऱ्याच ठिकाणी भूकंपस्थिती, त्सुनामी अशा प्रसंगांचा सामना करावा लागला. त्यात प्रामुख्याने जबलपूर भूकंप, गुजरात भूकंप, महाराष्ट्रातील पूर परिस्थिती, तमिळनाडू व अंदमान निकोबारमधील त्सुनामी, बिहारमधील पूरस्थिती, जम्मू-काश्मीरमधील भूकंप यांचा समावेश होतो.

या सर्व आपत्तीग्रस्त ठिकाणी भारतीय जैन संघटनेने सर्वतोपरी साहाय्य केले, भरीव कार्य केले.

शांतीलालजींचे आपत्तीप्रती असे मत आहे की, "संपूर्ण विश्वात आपत्तींचे प्रमाण वाढत आहे. निसर्गचक्र बदलत आहे. या निसर्गाच्या विपरीततेवर कोणाचाही अंकुश नाही. कधी, कुठे, कशा प्रकारच्या आपत्तींचा अभ्यास, सामना करण्याची तयारी आपल्याकडे असणे आवश्यक आहे."

भारतीय जैन संघटनेने भूकंपाचा सूक्ष्म अभ्यास केला.

भूगर्भातील हालचालींमुळे भूकंपाची निर्मिती होते. भूकंप तीन प्रकारचे असतात- टेक्टॉनिक्, व्होल्कॅनिक आणि एक्स्लोजन तसे तर भूगर्भामध्ये सातत्याने काही ना काही हालचाल सुरू असते. पण भूकंपलहरी भूपृष्ठाला भेदून जात असतील तर भूपृष्ठावर मोठ्या प्रमाणावर नुकसान होते.

भारतात आतापर्यंत झालेले मुख्य भूकंप :

वर्ष	ठिकाण	तारीख	वेळ	रिश्टर स्केल	मृत्युमुखी
१९५०	आसाम	१५ ऑगस्ट	संध्या. ७ वा.	८.६	१५००
१९५६	गुजरात	२१ जुलै	रात्री ११ वा.	७.०	हजारो
१९५६	उत्तर प्रदेश	१० ऑक्टोबर		६.७	१०० च्या वर
१९५८	उत्तर प्रदेश	२८ डिसेंबर		६.३	१०० च्या वर
१९६०	दिल्ली	२७ ऑगस्ट	रात्री ११ वा.	६.०	
१९६३	काश्मीर	२ सप्टेंबर	स. ७ वा.	८.८	शेकडो
१९६६	प. नेपाळ-उत्तरांचल	२७ जून		६.३	
१९६६	उत्तर प्रदेश	१५ ऑगस्ट		५.३	
१९६७	निकोबार	२ जुलै		६.२	
१९६७	महाराष्ट्र	११ डिसेंबर	पहाटे ४ वा.	६.५	२००
१९७०	आंध्रप्रदेश	१३ एप्रिल		६.५	
१९७०	गुजरात	२३ मार्च	स. ७ वा.	५.७	
१९७५	हिमाचल प्रदेश	१९ जून		६.५	
१९८८	बिहार-नेपाळ	२१ ऑगस्ट	पहाटे ४ वा.	६.६	१००३
१९९०	केरळ	८ फेब्रुवारी		६.०	
१९९१	उत्तरांचल	२० ऑक्टोबर	पहाटे ३ वा.	६.६	७६८

१९९३	महाराष्ट्र	३० सप्टेंबर	पहाटे ४ वा.	६.३	७९२८
१९९७	जबलपूर	२२ मे	पहाटे ४ वा.	६.०	३८
१९९९	चामोली	२९ मार्च			१०३
२००१	कच्छ	२६ जानेवारी		६.९	१३८११
२००५	काश्मीर	८ ऑक्टोबर	पहाटे ४ वा.	७.६	८० हजार

आपत्ती व्यवस्थापनातील भारतीय जैन संघटनेचे कार्य :
१९९३ नंतरच्या भारतामध्ये आकस्मिकरीत्या उद्‌भवलेल्या, नैसर्गिक वा मानवनिर्मित, आपत्तींचे निवारण करण्यासाठी भारतीय जैन संघटनेने भरीव कार्य केले आहे. कोठेही आपत्ती घडल्याची घटना घडताच भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते तीन-चार तासांतच तिथे पोहोचत व त्वरित मदतकार्याला सुरुवात करीत.

स्थानिक ठिकाणाहून निघतानाच; प्रामुख्याने जनरेटर, तंबूंचे साहित्य, ट्यूब, वायर, अन्नधान्य, अन्न बनविण्याची भांडी, वाटपाचे विशेष तयार केलेले किट अशा सर्व तयारीनिशीच कार्यकर्ते निघत. भारतीय जैन संघटनेचा एकमेकांशी संवाद होऊन, या संवादातूनच प्रामुख्याने कामाची विभागणी, साहित्याची विभागणी वगैरे गोष्टी ठरविल्या जात.

बचाव कार्य :
प्रत्येक आपत्तीच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर भूकंपात अडकलेल्यांची सुटका करण्याचे महत्त्वाचे कार्य वेगाने पार पाडले

जाते. आर्मी, होमगार्ड, पोलीस, शासकीय अधिकाऱ्यांना या कार्यात मदत केली जाते.

मृतदेहांची विल्हेवाट : जंतूसंसर्ग रोखण्यासाठी औषधांची फवारणी करण्याची कार्य प्रामुख्याने हाती घेतले जाते.

अन्नपुरवठा : काही कार्यकर्ते अन्न बनविण्यासाठी जागेची पाहणी करतात व अन्न बनविण्याची प्रक्रिया सुरू करतात. रात्रंदिवस चहा, सकाळ-संध्याकाळ नाश्ता व तीसेक हजार जणांना पुरेल असे अन्न बनविण्याचे व वाटपाचे कार्य त्वरित सुरू केले जाते.

साहित्याचे वाटप : भारतीय जैन संघटनेने भूकंपग्रस्तांसाठी एक कीट तयार केले आहे. त्यात अंथरूण, पांघरूण, वापरण्याचे कपडे, काडेपेटी, मेणबत्ती, साखर, चहा, डाळ, तांदूळ वगैरे गोष्टींचा समावेश केला जातो व ते प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था केली जाते.

तात्पुरता निवारा : भूकंपामध्ये बहुतांशी घरे उद्ध्वस्त झालेली असतात. त्यामुळे सर्वांच्या तात्पुरत्या निवासाची व्यवस्था केली जाते.

औषध पुरवठा व डॉक्टर्सची सेवा : भूकंपपीडितांना त्वरित इलाजाची सोय होणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी ॲम्ब्युलन्स, दवाखाना, ऑपरेशन्स्ची सोय, औषधोपचारांची सोय होणे गरजेचे असते. ठिकठिकाणाहून जैन कम्युनिटीचे डॉक्टर्स येऊन रुग्णांना तात्काळ सेवा देण्याचे कार्य अहोरात्र करतात. रक्तदान शिबिरं भरवून रक्त साठवले जाते.

अशा सर्व कार्याला नियोजनबद्धरीत्या सुरुवात संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून होते.

पण या कार्याशिवाय इतरही अनेक अडचणींचा, अडथळ्यांचा सामना करावा लागतो. यात विविध राज्यांमध्ये विविध अनुभव संघटनेला आले.

विविध राज्यांमध्ये संघटनेने केलेले कार्य :

लातूरमध्ये जीवित व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाली होती. पण यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे लहान मुलांवर फार परिणाम झाला, त्यामुळे लातूरमधील १२०० मुलांच्या शैक्षणिक पुनर्वसनाचा निर्णय घेतला. वाघोली येथे जमीन BJS ने खरेदी करून वर्ल्ड बँक व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने शाळा बांधून BJS ला देण्यात आली व सर्व मुलांना पदवीपर्यंतचे शिक्षण दिले.

जबलपूर भूकंपात त्यामानाने जीवितहानी कमी झाली, पण तेथील मुलांनाही पुण्याला आणून त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन केले.

गुजरातमध्ये प्रचंड जीवितहानी तर झालीच पण गावेच्या गावे उद्ध्वस्त झाली. शाळा, घरे, दुकाने, हॉस्पिटल्स सर्वकाही नष्ट झाले. फार अवघड परिस्थितीतून संघटनेला इथे वाट काढावी लागली. इथे शाळांची उभारणी करून देण्याचा निर्णय घेण्यात आला व ९० दिवसांच्या आत ३६८ शाळांची उभारणी करून, त्या समारंभपूर्वक गुजरात सरकारकडे हस्तांतरित करण्यात आल्या.

तमिळनाडू, अंदमान व निकोबारमध्ये जेव्हा त्सुनामी आली, तेव्हाची तर अत्यंत बिकट परिस्थिती होती. अनंत अडचणींवर मात करीत संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मदत कार्य तर केलेच. याशिवाय अंदमान-निकोबारमध्ये शाळांची व प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या केंद्रशासित प्रदेशामध्ये उभारलेले हे कार्य होय.

जम्मू-काश्मीरमध्ये झालेला भूकंप हा सर्वांत मोठा भूकंप होय. अनेक गावे, प्रदेश बेचिराख होऊन गेलाच पण हवामान अत्यंत प्रतिकूल होते. लोकांना निवारा नव्हता, कडाक्याची थंडी-बर्फ पडायला सुरुवात होणार होती. बाकीची तर सर्व मदत नेहमीप्रमाणे संघटनेने केलीच पण, भूकंपपीडितांची निवाऱ्याची व्यवस्था करण्याचे फार महत्त्वाचे कार्य केले.

याशिवाय महाराष्ट्र, बिहारमध्ये आलेल्या पूरस्थितीच्यावेळी देखील पूरग्रस्तांना तातडीने मदत पुरवण्याचे कार्य भारतीय जैन संघटनेने केले.

याशिवाय मानवनिर्मित आपत्तींमध्ये देखील संघटनेने निवारण कार्य पार पाडले आहे. यात प्रामुख्याने मेळघाटचा कुपोषण प्रश्न सोडविण्यासाठी कार्य केले. मांढरदेवीमंदिराभोवतीच्या दुकानांना आग लागल्यानंतर त्वरित मदतकार्य पुरविण्याचे काम संघटनेने हाती घेतले.

विविध संस्था/ शासनाकडून आपत्तीनिवारण कार्य :

आपत्तीच्या वेळी मदतकार्य उभारणीचे काम करणाऱ्या शासकीय, अशासकीय, देशी व आंतरराष्ट्रीय संस्था अनेक असतात. शासनाची देखील संपूर्ण यंत्रणा इथे राबत असते. आता दळणवळण, संपर्कमाध्यमाचे जगभर जाळे असल्यामुळे विविध संस्थांकडून, विविध प्रकारे, हरतऱ्हेची मदत येत असते.

पैशाचा ओघ सुरू असतो. सर्वांकडून मदतीचा जगभरातून, सहकार्याचा हात पुढे येतो व सर्वजण आपापल्या परीने मदत करण्याचा प्रयत्न करतात.

भारतीय जैन संघटनेच्या कार्यातील वेगळेपण :

या सर्व भूकंप, त्सुनामी, मानवनिर्मित आपत्तींमध्ये भारतीय जैन संघटनेने सर्वतोपरी मदतकार्य तर उभारलेच. पण महत्त्वाचे म्हणजे स्वीकारलेले आव्हान पूर्णत्वास नेले. आपत्तीच्या ठिकाणी संघटनेचे अध्यक्ष शांतीलालजी स्वत: १५-१५ दिवस राहिले. तेही टेंटमध्ये! आंघोळीचे, खाण्यापिण्याचे सर्वांसारखेच त्यांचेही हाल झाले. पण न डगमगता कार्य तडीस नेले. कोणतेही कार्य बीजेएसने अर्धवट सोडले नाही, की कंटाळून कोणी माघारी फिरले नाही. मग ते शाळा उभारणीचे कार्य असो, निवारा उभारणीचे कार्य

असो की दोन वर्ष अंदमान-निकोबारमध्ये चालणारे प्राथमिक आरोग्य केंद्रांचे कार्य असो.

जिद्द, निश्चयाच्या जोरावर सर्व कार्य पूर्णत्वास नेले.

भारतीय जैन संघटनेच्या नियोजनबद्ध, आखीव-रेखीव कार्यामुळे, शिस्तबद्ध पारदर्शकतेमुळे सगळीकडे आपत्ती व्यवस्थापन कार्याचा गाजावाजा झाला आहे. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांशी बीजेएस संलग्न आहे. Direct Relief International, the Red Cross अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थांबरोबर बीजेएस कार्य करते. भारतातील मुख्य वर्तमानपत्रांकडे येणारा मदतीचा ओघ, मोठमोठ्या कंपन्यांची मदत बीजेएसकडे सुपूर्द करण्यात येते. शासनदेखील मदतकार्य उभारणीच्या वेळी बीजेएसशी सल्लामसलत करूनच निर्णय घेते. अशा प्रकारे बीजेएस व आपत्ती व्यवस्थापन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अत्यंत महत्त्वपूर्ण वाटा आपत्ती निवारण्याच्या कार्यात शांतीलालजी व बीजेएसने उचलला आहे.

☆☆☆

३. लातूरचा धडा:
आपत्ती नियोजनाची पायाभरणी

कोणतीही नैसर्गिक आपत्ती ही दुर्दैवीच होय, मग ती आपत्ती भूकंप असो, पूर असो की त्सुनामी! आपत्ती एकटी येत नाही, येताना संकटांची मालिकाच घेऊन येते, अशावेळी या दुर्दैवी घटनेतून सावरण्यासाठी कणखरतेची, निर्भीडतेची जशी आवश्यकता असते, तशीच सुयोग्य नियोजनाची देखील.

आपत्ती नियोजनाचा सुसंबद्ध पाया प्रथम कोणी रचला असेल तर तो भारतीय जैन संघटनेने, लातूर आपत्तीच्यावेळी!

३० सप्टेंबर १९९३ रोजी महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात एक अतिशय दुर्दैवी घटना घडली, ती म्हणजे पहाटे ३ वाजून ५६ मिनिटांनी ६.३ रिश्टर स्केलचा येथे जबरदस्त भूकंप झाला. लातूर जिल्ह्यामधील किल्लारी, सस्तूर आणि जवळपास ५८ गावे या भूकंपाने विद्रुप करून टाकली. फार मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली, सरकारी आकडेवाडीनुसार सुमारे दहा हजार लोकांना या भूकंपाच्या हादऱ्यात आपले जीवन गमवावे लागले. कित्येक लोक बेघर झाले. आर्थिक हानी प्रचंड प्रमाणावर झाली.

कित्येक लोक अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून वंचित झाले, पण यातील सर्वांत मोठा धक्का होता तो मानसिक!

आता पुढे कसे जगायचे? काय करायचे? कशी उभारणी करायची? कुठून सुरुवात करायची? ज्या शून्यातून सुरुवात करायची तो शून्यच भूकंपातील खोल पोकळीत विरून गेला होता, वातावरणात संपूर्णत: उद्ध्वस्त सन्नाटा होता.

अशा कठीण परिस्थितीत भारतीय जैन संघटनेचे श्री. शांतिलाल मुथा व संघटनेचा जथ्या भूकंपग्रस्त, आपत्तीग्रस्त, पीडित जनतेला मायेचा हात देण्यास पुढे सरसावले. आशेचा, जीवनाचा किरण घेऊन त्यांच्यापर्यंत गेले. या भूकंपग्रस्त व्यक्तींसमोर अनेक अडचणी, अनेक समस्या, अनेक व्यथा आ वासून उभ्या ठाकलेल्या असतात. त्यातील सर्वांत महत्त्वाची म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा. त्याबरोबरच येणाऱ्या गरजेच्या गोष्टी म्हणजे औषधांची उपलब्धता, मृतदेहांची विल्हेवाट, आजारी, दुखापतग्रस्त व्यक्तींची त्वरित देखभाल. या अत्यावश्यक असणाऱ्या सुविधांमध्ये प्रामुख्याने डॉक्टर्स, नर्सेसची उपलब्धता. तसेच ॲम्ब्युलन्स, रक्तपेढीची आवश्यकता. मृतदेहांचा जर वास येत असेल तर रोगजंतूनाशक औषधांची फवारणी. संसर्गजन्य रोग, रोगराई टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर त्वरित उपाङ्गोजनांची गरज असते.

मृतदेहांच्या दहनासाठी लाकूडफाटा उपलब्धतेची अत्यावश्यकता असते, या सर्वच गोष्टींची, सुविधांची उपलब्धता अतिशय तात्काळ जलदगतीने, आपत्तीग्रस्त भागामध्ये होणे अतिशय जरुरीचे असते.

भारतीय जैन संघटनेने या अतिशय कठीण परिस्थितीमध्ये आपल्या कार्याचा, नियोजनबद्ध, सुसूत्र जो डोंगर उभा केला त्याला खरोखरीच तोड नाही.

यातील सर्वांत प्रथम व महत्त्वाची अशी राबविलेली उपाययोजना संघटनेने उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील नऊ गावे दत्तक घेतली, त्वरित "रिलीफ कँपची" उभारणी करण्यात आली. सुमारे तीस हजार जणांची दोन्ही वेळेच्या जेवणाची व्यवस्था पाहून अनेक लोक इतकी सुंदर, आखीव-रेखीव, नियोजनबद्ध व्यवस्था पाहून भारावून गेले.

भोजन व्यवस्थेच्या मंडपाची रचना अशी केली होती की, भोजनास येणाऱ्यांचा प्रवेश एकाच दाराने, आत आल्यानंतर ताट-वाट्यांची नेटकी व्यवस्था. काय असेल ते अन्न वाढून घेऊन लोकांना त्वरित बाहेर पडण्याची सुलभ व्यवस्था. एकाच ठिकाणी गर्दी किंवा ताटकळत राहावे, यासारख्या कोणत्याही गोष्टी घडणार नाहीत याची पुरेपूर दक्षता घेतली जात असे. भोजन मंडपाची व्यवस्था दोन रस्ते जिथे मिळतील त्या चौकोनात केली जाते, त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना, माल उतरावयाला सोयीचे पडते. पाण्याची व्यवस्था केली जाते. अशा प्रकारे अन्नधान्य साठवण्याबाबत, अन्न बनविण्याबाबत व अन्न वाटपाबाबत अत्यंत काटेकोर, शिस्तबद्ध नियोजन केले जाते. सर्व शासकीय अधिकारी, डॉक्टर्स, आर्मी, पोलीस, एम.एस.ई.बी.चे लोक कार्यकर्ते सर्वांसाठी बीजेएस अन्न बनवित असे. सर्वांना बोलावून जेवायला देत असत. हा फार मोठा विचार शांतीलालजींनी अशा आपत्तीग्रस्त काळात दिला. रात्रंदिवस चहाची व्यवस्था करण्यात आली. शासकीय अधिकारी, लष्करातील लोक, डॉक्टर्स, कार्यकर्ते सतत कार्यरत असतात. त्यांच्यासाठी चहा, बिस्कीटे, नाश्ता-जेवण देणे गरजेचे असते. जेवण अशा प्रकारे बनवले जात

असे की ज्याला फार वेळ लागणार नाही. पूर्ण जेवणामध्ये पौष्टिक आहाराचा समावेश असे, पण स्वच्छता आणि लवकरात लवकर अन्न बनविले जाईल, याची पुरेपूर काळजी घेतली जात असे.

लातूर भूकंपामध्ये बीजेएसने साधारण महिनाभर कार्य केले. अमेरिकेचे राजदूत तिथे आले. त्यांनी बीजेएसच्या कँपमध्ये जेवण केले. त्यांना तिथली सर्व व्यवस्था, स्वच्छता, अन्नाची पौष्टिकता एवढी आवडली की त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले, की "जे अन्न खाल्ले ते अमेरिकेत मिळाल्यासारखेच वाटले."

पण भूकंपामुळे हानी झालेल्या काही मंडळींना कँपवर येऊन जेवण घेणे चांगले वाटायचे नाही. अशा व्यक्तींची मनधरणी करून त्यांचा कँपवर आणून जेवू घालण्याचे किंवा त्यांच्या घरी नेऊन जेवण देण्याचे कामही बीजेएसच्या कार्यकर्त्यांनी केले.

आजूबाजूच्या राज्यांतून ४-५ ट्रक साहित्य घेऊन लोक येत होते. कोण अन्न बनवतेय याचा शोध घेत. लोकांना माहित झाले की, भारतीय जैन संघटनेच्यातर्फे दररोज तीसेक हजारजणांना अन्न बनवून दिले जात आहे, त्यामुळे धान्य आणून कोणाकडे द्यायचे हा त्यांचा प्रश्न सुटत असे. हे धान्य किंवा इतर साहित्य उतरवून घेणे. नीट जमा करणे, त्यांची व्यवस्था ठेवणे या सर्व गोष्टींना शांतीलालजींनी नेटके वळण, सुव्यवस्थित नियोजन दिले. त्यामुळे अन्नधान्याची नासाडी झाली नाही. पुण्याहून येताना बीजेएसचे कार्यकर्ते जनरेटर, ट्युब, वायर, डिझेल, माईक असेही सर्व साहित्य घेऊन आले होते. कारण नुसते जनरेटर आणून फायदा नाही तर त्यासाठी डिझेलही पाहिजे. त्यामुळे डिझेल आणण्यासाठी वेगळी गाडी ठेवली. कोणत्याही गोष्टीची अनाऊन्समेंट करण्यासाठी माईकचा चांगला उपयोग झाला. बीजेएसच्या टेंट, माईक, लाईट, जनरेटरमुळे गावातील वातावरणामध्ये बदल झाला. बीजेएसचा टेंट

म्हणजे सर्वांसाठी एक माहिती केंद्र झाले होते. शासकीय अधिकारी, आर्मी, पोलीस लोक देखील माईकवरून अनाऊन्समेंट करण्यासाठी बीजेएसच्या टेंटवर येत.

भारताचे पंतप्रधान जेव्हा भूकंपग्रस्त ठिकाणाची पाहणी करण्यासाठी आले, तेव्हा त्यांचे भाषणासाठी बीजेएसचा माईक वापरण्यात आला.

लातूरच्या भूकंपामध्ये प्रचंड जीवितहानी झाली. मृतदेह इतस्तत: पडलेले होते. त्यातच प्रचंड पाऊस येत होता. मृतदेहांना अग्नी द्यायला लाकडे मिळत नव्हती. ५०-१०० मृतदेहांना एकत्र अग्नी द्यावा लागे. भावना आणि अनुभव नेहमीच वेगळे असतात. आपत्तीच्या काळात तर कधी कोणती परिस्थिती उद्‌भवेल, याचे भाष्य कोणीच करू शकत नाही. स्वत: शांतीलालजींना देखील या परिस्थितीतून जावे लागले. पुण्याहून भूकंपग्रस्त भागात जाऊन मोठ्याप्रमाणात भरीव मदतकार्य करण्याची कल्पना डोक्यात घेऊन संध्याकाळच्या वेळी पुण्याहून संघटनेच्या गाड्यांचा ताफा बार्शीच्या दिशेने निघाला. शांतीलालजींबरोबर श्री. मदनलाल बाफना व सुवालाल चोरडिया होते. मुसळधार पाऊस सुरू होता, गाडी चालविताना समोरचे काहीच दिसत नव्हते, रात्रीची वेळ होती, टेंभूर्णीच्या आसपास आल्यावर ज्या गाडीत शांतीलालजी होते, त्या गाडीच्या मागच्या काचेवर वीज कोसळली. गाडीचे खूप नुकसान झाले पण कर्मधर्मसंयोगाने शांतीलालजी व मदन बाफनाजी या दुर्घटनेतून बचावले. गाडीच्या टायरच्या अर्थिंगमुळे ते वाचले. गाडीची पाठीमागची काच फुटल्याने धो-धो पाऊस गाडीमध्ये देखील येत होता. पण अशाही परिस्थितीत रस्त्यात कुठेही न थांबता त्यांनी रात्री बार्शी गाठली. तेथे सर्व कार्यकर्त्यांशी सविस्तर

चर्चा झाली. पुढील कार्यक्रमाची दिशा ठरविली व सर्वजण उस्मानाबादला रवाना झाले.

प्रत्येक मनुष्याच्या अंतर्यामी दिव्यप्रकाश तेवत असतो. शांतीलालजींसारखी एखादीच व्यक्ती अंतर्यामीच्या दिव्यप्रकाशाला प्रज्वलित करून आसमंतातील अंधकारमय आभासीरूप नाहीसे करून टाकतात. त्यामुळे शांतीलालजींनी दाखवलेल्या या तेजोमय प्रकाशाच्या वाटेवर अनेकांची आयुष्ये उजळून निघाली.

श्री. शरद पवारांचे योगदान :

महाराष्ट्र राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी लातूरची भूकंपग्रस्त परिस्थिती अत्यंत चांगल्या प्रकारे हाताळली. ते स्वत: पंधरा दिवस या ठिकाणी होते. त्यांनी आपले मुंबई कार्यालय सोलापूरमध्ये हलविले. ते त्वरित निर्णय घेत. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांना वेगवेगळ्या कार्याचे वाटप त्यांनी केले. लोक भूकंपग्रस्तांना हरप्रकारे मदत करू इच्छित होते, या मदतीचे देखील योग्यप्रकारे नियोजनबद्ध वाटप घडून येणे गरजेचे असते. जे कोणी पैसे रूपात मदत देत होते, ते स्वयंसेवी संस्थांना देत. त्यांना इन्कमटॅक्समध्ये सवलत असा शरदरावांनी निर्णय घेतला. मुख्यमंत्री निधीमध्ये जे मदत देतील त्यांना इन्कमटॅक्समध्ये १००% सवलत दिली जाईल. यानंतरचा त्यांनी राबविलेला महत्त्वाचा निर्णय होता तो म्हणजे निवासस्थान बांधण्याचे कार्य हाती घेतले. त्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या बिल्डर्सना कायमस्वरूपी निवासस्थानाच्या दृष्टीने आपापले स्ट्रक्चरल डिझाईन्स किंवा आराखडे सादर करण्यास सांगितले, त्याचे एक्झिबिशन भरवले व त्यातून काही बिल्डर्सना निवडून त्यांच्याकडे भूकंपग्रस्त मंडळींच्या कायमस्वरूपी निवासाची सोय करून देण्याचे कार्य सोपविले.

पुनर्वसन कार्यामध्ये नियोजनाची आवश्यकता- बीजेएसचे निरीक्षण :

आपत्तीग्रस्तांसाठी मोठ्या प्रमाणावर मदतीचा ओघ शासकीय, अशासकीय संस्था, विविध राज्ये, परदेशांतून सुरू होतो. या वस्तू उतरवून घेण्याची, योग्य तऱ्हेने ठेवण्याची विशिष्ट यंत्रणा असणे गरजेचे असते, ही मदत देखील कशा प्रकारची असावी? त्यासाठी काही नियोजन असणे गरजेचे आहे. उदा. १०० बोरी गहू घेऊन लोक येत. पण नुसता गहू आणून काय फायदा? दळायला गिरणी पाहिजे. जुने कपडे लोकांकडून गोळा केले जातात, त्यासाठी गावांमध्ये गाड्यांची चक्कर होते. लोकांनी कपडे कशा प्रकारचे द्यावेत याबद्दलही काही सुसूत्रता असली पाहिजे. कारण जुने कपडे भूकंपग्रस्तांना तरी देणार कसे? दुसरी गोष्ट एवढी मेहनत घेऊन कपडे गोळा होणार ते तिथपर्यंत पोहोचवले जाणार पण जर त्यांचा काही उपयोगच नाही, तर ते एवढे कपड्यांचे ढीग ठेवणार तरी कुठे? आणि त्यांचे काय करणार? वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्था येऊन तिथे कार्य, मदत करू इच्छितात. पण कोणी कोणते कार्य करावे याचेही विशिष्ट नियोजन, धोरण असले पाहिजे. म्हणजे मदतकार्यात एक प्रकारची सूसुत्रता येते. कोणी धान्य आणायचे? कोणी अन्न बनवायचे? कोणी साहित्याचे वाटप करायचे? कोणी मृतदेहांची विल्हेवाट लावायची? कोणी आजाऱ्यांची शुश्रूषा करायची? लहान मुलांची काळजी घ्यायची? कोणी पुनर्वसनाच्या कार्यामध्ये मदत करायची? निवाऱ्याची व्यवस्था करायची? या सर्वांचे एक विशिष्ट नियोजन असले म्हणजे मदतकार्य सुरळीतपणे पार पडू शकते.

आपत्तीग्रस्त भागाला पाहण्यासाठी म्हणून सुद्धा अनेक लोक येत असतात. त्यामुळे रस्ते ब्लॉक होतात. वाहतूक तासन्तास खोळंबते. अशा काळात वाहतुकीवर, येणाऱ्या गाड्यांवर नियंत्रण असणे गरजेचे

असते. कारण शासकीय अधिकारी, होमगार्ड, लष्कर, पोलीस, स्वयंसेवी संस्था यांचे येणे महत्त्वाचे असते.

सुरुवातीला मृतदेहांना अग्नी देण्यासाठी लाकडांची कमतरता जाणवत होती. पण मिडीयाकडून जेव्हा लोकांपर्यंत बातमी गेली की लाकडे नाहीत, तर सगळीकडून लोक एवढे लाकडं घेऊन आले की ठेवायला जागा नव्हती. स्वयंस्फूर्तपणे अनेक कार्यकर्ते मदतीसाठी येत असतात, पण काही कालावधीनंतर ते थकतात. राहाण्याचे, खाण्यापिण्याचे हाल होतात. कार्यकर्त्यांची अशाही परिस्थितीत जुळवून घेऊन तिथेच राहून कार्य करण्याची यासाठी तयारी असायला हवी. शांतीलालजींनी या सर्व परिस्थितीतही मदत कार्य सुरू ठेवले. त्यांना स्वत:ला गाडीतच झोपावे लागे, सकाळचे आन्हिक उरकण्यासाठी कधी झोप होई, तर कधी नाही. पण कार्य पुढे नेणे त्यांना फार गरजेचे वाटे. पण एकंदरीतच याविषयी त्यांचे मत आहे की, “आपत्ती व्यवस्थापनात मदत कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांना, स्वयंसेवी संस्थांना विशिष्ट प्रशिक्षण देण्याची निश्चितच गरज आहे.”

याशिवाय सर्वांत महत्त्वाचा अनुभव बीजेएसला अनुभवायला मिळाला, तो म्हणजे भूकंपग्रस्त भागातील गावांची लोकसंख्या आपत्तीनंतर वाढते! घरात एकत्र राहणारे लोक त्वरित वेगळे होतात. कोणी स्वयंसेवी संस्था घरे बांधून देत आहे, हे ध्यानात येताच बाहेरगावी राहणारे लोकही गावातील जागांवर, घरांवर आपला हक्क सांगू लागतात. तहसीलदार, तलाठ्यांकरवी आपले रेकॉर्ड बदलवून घेतात. तर काही लोक म्हणत आम्हांला पैसे द्या, आम्ही घर बांधतो अशा सर्व अडचणींमधून वाट काढीत मदत कार्य पूर्ण करून लोकांच्या जीवनाला मार्गदर्शन करणे, उभारी देणे गरजेचे असते.

सर्व अडचणींचा सामना करताना, वाट काढताना लोकांचा सहभाग घेत कार्य वाढवीत कार्य करणे गरजेचे असते. त्यामुळे बीजेएसने आपल्या अनुभवाद्वारे मांडलेले निरीक्षण असे की, पुनर्वसनाच्या कार्यामध्ये ज्या कोणी स्वयंसेवी संस्था कार्य करतात त्यांच्यासाठी सेल्स टॅक्स, कस्टम ड्युटी, एक्साईज ड्युटी, सर्व्हिस टॅक्स या सगळ्यामध्ये सवलती मिळणे आवश्यक आहे.

शांतीलालजींची लहान मुलांप्रतीची संवेदनशीलता :

लातूर भूकंपग्रस्त भागामध्ये जेवण-खाण, कपडे, इतर सामानाची व्यवस्था, मृतदेहांची विल्हेवाट, औषधोपचार, दवाखान्यांची सोय, तात्पुरते निवारास्थान अशा सर्व गोष्टींची नीट व्यवस्था लावल्यानंतर, आणखी काय केलं जावं यावर शांतीलालजी लक्ष केंद्रित करू लागले. जैन संघटनेच्या मदतकेंद्रावर जेवणासाठी जी रांग लागत असे त्यामध्ये लहान मुलांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर असे. शांतीलालजींची चौकसबुद्धी काम करू लागली. लहान मुलांशी ते बोलू लागले. कोणाची आई वारली, कोणाचे वडील वारले, तर कोणाचे काका, मामा, हे त्या मुलांच्या तोंडून ऐकत असताना याचा त्या मुलांच्या मनावर काय परिणाम होत असेल याची शांतीलालजींना काळजी वाढू लागली. कारण काय घडले आहे, काय होत आहे हे सर्व कळण्याचे अनुभवण्याचे लहान मुलांचे वय नसते.

आपल्या घरी जरी एखादी घटना घडली तरी, आपण घरातल्या व्यक्तींना ती घटना हळूच सांगतो. म्हणजे प्रत्यक्षात मृतव्यक्तीविषयीही आपण सांगतो, सिरीयस आहे. मग जाताना रस्त्यात मनाची तयारी करतो व प्रत्यक्ष वस्तुस्थितीची माहिती देतो पण कोणताही मानसिक धक्का बसू न देता!

इथे तर त्या मुलांच्या मनावर काय परिणाम होत असेल याची शांतीलालजींना चिंता वाढू लागली. काही काही मुलं ढसढसा

रडत असत, तर काही मुलं अंत:करणापासून दु:खी झाल्याने त्यांना कोणतीही प्रतिक्रिया देता येत नव्हती. रात्रंदिवस मातीचे ढीग पाहणे, प्रेतं इकडून तिकडे उचलताना पाहणे, आर्मीचे लोक, पोलीस यंत्रणा, डॉक्टर्स, ॲम्ब्युलन्स, मोठमोठ्या क्रेन्स, गाड्या, गर्दी हे सर्व दृश्य पाहून लहान मुलांच्या डोक्यावर काय परिणाम होत असेल याचा विचार करणेच अतिशय मुश्किल आहे. त्यामुळे लहान मुलांच्या मानसिकतेचा विचार करणे, त्यांच्या डोक्यावर होणाऱ्या परिणामांचा विचार करणे, त्यांची विचार प्रक्रिया अजमावणे, त्यांना या सर्वांतून बाहेर काढणे हा कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमधील सर्वांत मोठा संशोधनाचा विषय असू शकतो असे शांतीलालजींना वाटते. त्यामुळे शांतीलालजींनी या विषयाच्या अनुषंगाने भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये पुढे काहीतरी काम करायला पाहिजे यावर लक्ष घालायला सुरुवात केली.

मदतकार्यासाठी बाहेरगावहून जेव्हा ट्रक येत, तेव्हा ते घेण्यासाठी घरातील लोक आपल्या मुलांना पाठवीत. मदत आपल्याला मिळावी यासाठी मुलं धडपड करीत असत. मुलांना लहानपणापासूनच दुसऱ्यांकडून काहीतरी मागण्याची सवय लागणे चांगले नाही, असे शांतीलालजींना वाटायला लागले. या गोष्टीचे सखोल निरीक्षण करून, त्यावर खोलवर विचार करून शांतीलालजींनी मार्ग काढण्याचे ठरविले. भूकंपग्रस्त भागातील ज्या ज्या लोकांची घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत, अशा परिवारातील शाळेमध्ये जाणारी मुले शाळा बंद असल्यामुळे पूर्ण वेळ भूकंपाचे ते दृश्य पाहत असताना त्यांच्या मनाच्या व हृदयाच्या आत खोलवर रुजलेले परिणाम या सर्व गोष्टींचा शांतीलालजी सांगोपांग विचार करू लागले. त्यातून मार्ग काढण्यासाठी विचार करू लागले. या भूकंपामुळे लहान मुलांची संपूर्ण पिढीच बरबाद होईल की काय? मानसिकदृष्ट्या ते

खचतील काय? पुढील आयुष्यात काही उभारी घेण्याची उमेद त्यांच्यामध्ये निर्माण होईल की नाही? त्यांना लोकांकडून सहानुभूतीची, मदतीचीच सवय लागेल काय? अशा प्रकारच्या शंकांनी शांतीलालजींना घेरले होते. या पिढीला संपूर्ण धक्क्यातून, धक्क्यानंतरच्या मानसिक परिणामातून सावरण्यासाठी व त्यांच्या शिक्षणामध्ये अडथळा न येऊ देता त्यांना पुढील शिक्षण दिले पाहिजे, त्यांचे मन विधायक कामात गुंतविले पाहिजे, असा ठाम निर्णय शांतीलालजींनी घेतला. त्यामुळे ही मुले सकारात्मक विचार करू लागतील, जीवनाकडे नव्या उमेदीने, उत्साहाने पाहू लागतील. त्यासाठी त्यांनी मुलांच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतला. हे सर्व कसे केले जावे, यावर शांतीलालजी विचार करू लागले. त्यांनी निर्णय घेतला की, भूकंपग्रस्त भागातील पूर्णपणे उद्ध्वस्त घरे झालेल्या मुलांची एक यादी तयार करायची. त्या पद्धतीने शांतीलालजींनी व कार्यकर्त्यांच्या मोठ्या टीमने गावं विभागून दौरा केला. शांतीलालजींनी जे फॉर्म दिले होते, ते फॉर्म भरून घेतले. माहिती गोळा केली. या सर्व माहितीचे संकलन झाल्यावर ती माहिती पुण्याच्या कार्यालयात पाठविली. पुणे येथे अशा प्रकारच्या १२०० मुलांच्या यादीचे एक पुस्तक छापण्यात आले. इतक्या मुलांची शिक्षणाची व्यवस्था कुठे व कशी करावी यावर विचारविनिमय सुरू झाला. त्याभागात आंतरराष्ट्रीय पातळीवर मुलांसाठी काम करीत असणाऱ्या मोठमोठ्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना शांतीलालजी भेटले. त्यांच्यासमोर शांतीलालजींनी या मुलांना शिक्षणासाठी पुण्याला घेऊन जाण्याची कल्पना मांडली. परंतु भूकंपग्रस्त भागातील मुलांना त्या भागापासून दूर घेऊन जाऊ नये, त्याच परिसरात त्यांचे पुनर्वसन केले जावे किंवा त्याच ठिकाणी त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी, अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय धोरण असल्याची कल्पना

शांतीलालजींना देण्यात आली. शांतीलालजी भ्रमात पडले, त्यांना असे वाटत होते की, या भागात ही मुलं राहिली तर त्यांच्या मनावर जास्त तणाव येईल म्हणून त्यांना तेथून बाहेर घेऊन गेलं पाहिजे. स्वत:ला जे योग्य वाटते, त्यादृष्टीने पुढे काम करण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे निर्णय घेतला की या सर्व १२०० मुलांना पुण्याला घेऊन जायचे. तेथे त्यांची राहाण्याची, जेवणाची, शिक्षणाची व्यवस्था करायची. अर्थात या सर्व गोष्टी बोलण्याइतक्या सोप्या मुळीच नव्हत्या. त्यामध्ये असंख्य अडचणी होत्या. त्यामध्ये महत्त्वाचे म्हणजे शांतीलालजींकडे कोणतीही शाळा नव्हती, कॉलेज नव्हते, वसतीगृह नव्हते. मोठ्याप्रमाणावर पैसा खर्च करण्याची वेळ येणार होती. हे सर्व समजून-उमजून शांतीलालजींनी या मुलांना शिक्षणासाठी पुण्याला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली त्याप्रमाणे २५ ऑक्टोबर १९९३ रोजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार व राज्यपाल श्री. पी.सी. अलेक्झांडर यांनी मुलांना पुण्याला घेऊन जाणाऱ्या २५ बसेसना हिरवा झेंडा दाखविला.

निश्चय, जिद्द, सेवाभाव, संवेदना व सामाजिक कार्याची जाणीव या वैशिष्ट्यपूर्ण गुणांचा संगम शांतीलालजींच्या ठायी असलेला दृष्टोत्पत्तीस येतो. भारताचे भावी नागरिक घडविताना त्यांनी आपल्या सृजनशील मनाचेच दर्शन या निर्णयातून, निर्णयातील जबाबदारीतून, अंमलबजावणीतून घडविल्याचे आपल्याला प्रकर्षाने जाणवते.

लातूरच्या भूकंपातून बीजेएसने घेतलेले धडे :

लातूरमधील भूकंपग्रस्त स्थिती हाताळण्याची बीजेएसची पहिलीच वेळ! सर्वांमध्ये आवश्यक असणारी माहितीची देवाणघेवाण व वीज या गोष्टींची कमतरता येथे प्रकर्षाने जाणवली.

प्रशिक्षित कार्यकर्ते असण्याची बीजेएसला गरज वाटली. त्याचप्रमाणे तेथे येऊन राहण्यासाठी, कार्य आखणी करण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची एक साखळी निर्माण होण्याची फार गरज बीजेएसला जाणवली. शासन, स्वयंसेवी संस्थांमध्ये सुसंवादाची गरज लातूरमध्ये दिसून आली. सुस्थितीत असणाऱ्या कुटुंबीयांची मदत घेण्याची मानसिक तयारी नव्हती. त्यांनी मदत घ्यावी. अन्नग्रहण करावे व दैनंदिन जीवन पुन्हा सुरळीत करावे यासाठी कार्यकर्त्यांना फार मेहनत घ्यावी लागली. सर्वांत जास्त परिणाम लहान मुलांवर झाला. या धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन व पुनर्विकास करण्याची निकडीची गरज भारतीय जैन संघटनेला जाणवली व त्याप्रमाणे पुढचे नियोजन करण्याचे संघटनेच्या अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी ठरविले.

धोरणात्मक निर्णय :

लातूर आपत्तीतून धडा घेऊन भारतीय जैन संघटनेने लहान मुलांचे शैक्षणिक पुनर्वसन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्याप्रमाणे १२०० मुलांची राहण्याची, जेवण्या-खाण्याची, कपड्यालत्त्यांची, शिक्षणाची, वह्या-पुस्तकांची सोय केली. प्रथम त्यांना पिंपरी येथील आत्मनगरच्या मुथा अपार्टमेंटमध्ये ठेवण्यात आले. नंतर त्यांची वाघोली पुनर्वसन व शैक्षणिक प्रकल्पामध्ये कायमस्वरूपी सोय करण्यात आली. तेथे त्यांना पदवीपर्यंतचे शिक्षण देण्यात आले. त्यांच्या जीवनाला योग्य दिशा मिळाली. श्री. मुथा यांच्या दूरदृष्टीपणातून व उदार धोरणातूनच हा निर्णय साकारला गेला, त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाली. कोणत्याही आपत्तीच्या वेळी अनुकरण करावा असाच हा धोरणात्मक निर्णय आहे!

लातूर भूकंपादरम्यान ज्या कार्यकर्त्यांनी मदत केली त्यांची नावे :

अ-क्र .	कार्यकर्त्याचे नाव	अ-क्र .	कार्यकर्त्याचे नाव
१.	श्री. शांतीलालजी मुथा	७.	श्री. गौतमचंदजी संचेती
२.	श्री. प्रकाशचंदजी सुराना	८.	श्री. विजय बेदमुथ्था
३.	श्री. महेंद्र सुराना	९.	श्री. नितिन कोटेचा
४.	श्री. पारसजी बोरा	१०.	श्री. सुवालाल चोरडीया
५.	श्री. चंदनमालजी बाफना	११.	श्री. ओमप्रकाश बाफना
६.	श्री. जी.एम.बोथरा	१२.	श्री. मदन बाफना

✯✯✯

४. वाघोली प्रकल्प उभारताना

आपत्ती कोणतीही असो, नैसर्गिक की कृत्रिम, यात सर्वांत जास्त हानी होते ती लहान मुलांची! जबरदस्त मानसिक धक्का बसतो त्यांना! या मानसिक धक्क्यातून वेळीच सावरून त्यांना सामान्य, दैनंदिन व्यवहारात लवकर रुळवले तर ठीक, नाहीतर कित्येकदा परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. कारण आपत्तीनंतरची परिस्थिती व वातावरण भयंकर दु:खद, हताश, निराश, वेदनामय असते. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना रिकामपण येऊन जाते. प्रत्येकजण मदतीचा हात पुढे करतो खरे, पण दुसऱ्याच्या सहानुभूतीची, मदतीची, परावलंबित्वाची सवय जडण्याचीच शक्यता असते!

यातून त्वरित त्यांना बाहेर काढायचे असेल तर एकच मार्ग म्हणजे, काहीही करून, अडचणींचे डोंगर पार करून लहान मुलांची शाळा सुरू ठेवणे. त्यांना त्यांच्या शालेय जीवनात रमू देणे. हे कार्य चारओळींत मांडण्याइतके सोपे मुळीच नसते. पण महाराष्ट्रात १९९३ साली झालेल्या लातूर-किल्लारी भागातील सर्वांत मोठ्या भूकंपानंतर भारतीय जैन संघटनेने, ही गोष्ट प्रत्यक्षात आणली.

लातूर-किल्लारी भागातील जवळपास २९ गावांतील सर्व शाळा भूकंपानंतर उद्ध्वस्त झाल्या होत्या. यातील साधारण १४००-

१५०० मुलांच्याबाबत शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न होता. त्यामुळे भारतीय जैन संघटनेच्या श्री. शांतिलाल मुथा व कार्यकर्त्यांनी तिथे पाहणी करून, निष्कर्ष काढला की या सर्व मुलांना शिक्षणासाठी पुण्याला नेऊ व तिथेच त्यांची राहण्या-खाण्या-पिण्याची, शिक्षणाची, वैद्यकीय उपचारांची, कपड्यालत्त्यांची सोय करू.

त्याप्रमाणे मुलांच्या पालकांशी, नातेवाईकांशी, ग्रामस्थांशी, शिक्षकांशी संवाद साधण्यास सुरुवात केली. सुरुवातीला ते तयार नव्हते, निर्णय घेण्याच्या मन:स्थितीत नव्हते. परंतु तत्कालिन मुख्यमंत्री श्री. शरद पवार साहेबांनी या पाठीमागची भूमिका समजावून सांगितल्यावर पालक तयार झाले, पण मुलींना पाठविण्यास तयार नव्हते.

त्याप्रमाणे २५ ऑक्टोबर १९९३ रोजी तत्कालिन मुख्यमंत्री श्री. शरद पवार व राज्यपाल पी.सी.अलेक्झांडर यांनी लातूरहून पुण्याला रवाना होणाऱ्या २५ बसेसना हिरवा झेंडा दिला. या बसेसमधून १४२१ मुले पुण्यात आली, त्यातील ७० जणांनी आई-वडिल गमावलेले होते, ते अनाथ होते. तर काहींचे वडील नव्हते, काहींना आई नव्हती.

आयुष्याची वाटचाल थांबवून चालत नसते, थांबलेली वाट संपलेलीच असते! आयुष्याचा प्रवाह जिथे थांबतो, साचून राहातो ते पाणी प्रवाही न राहता केवळ एक डबके बनते! परमेश्वराने मानवाला दिलेली सर्वांत चांगली देणगी म्हणजे काळ! काळानुसार माणसामध्ये परिवर्तन घडते पण काळ जाईल तसतसे मागील घटनांचे विस्मरण करीत मनुष्य पुढे जाऊ पाहातो, तशी साथ आणि हात मिळाला तर. श्री. शांतीलाल मुथा यांनी काळाच्या पलीकडे विचार करून या मुलांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी त्यांच्या हातात आपला हात दिला. आणि या मुलांना साथीला घेऊन त्यांनी शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचा आराखडा तयार केला.

पिंपरी-चिंचवड येथे मुलांची सोय :

ही सर्व मुले काष्टी, अर्णी, पेठसांगवी, उदतपूर, तौशिगार, कानेगाव, माकणी, किल्लारी अशा वेगवेगळ्या गावांतील होते. प्रथम त्यांची सोय पिंपरी-चिंचवड येथील मुथा असोसिएटस्च्या इमारतीमध्ये करण्यात आली. त्यांच्याबरोबर चौदा शिक्षकांनाही आणले होते.

या सर्व मुलांची राहण्या-खाण्याची व्यवस्था येथे करण्यात आली तर शाळेची सोय पिंपरी-चिंचवड कार्पोरेशनतर्फे शाळेसाठी बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीमध्ये करण्यात आली.

या शाळेत प्रवेश देण्यासाठी श्री. पवारसाहेबांना विनंती करण्यात आली, त्याप्रमाणे साहेबांनी स्पेशल केस म्हणून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गाच्या तुकड्यांना परवानगी दिली. त्या त्या वर्गाप्रमाणे मुलांची व्यवस्था करून, शिक्षकांची नेमणूक केली व याप्रमाणे शाळा सुरू झाली.

परंतु ह्या कोवळ्या मनाच्या मुलांमध्ये फार भीती, असुरक्षिततेची भावना होती. रात्री-अपरात्री मुले घाबरून पळत सुटायची. त्यांना वाटायचे, राहातो ती इमारत पण पडली तर काय होईल? म्हणून ते रात्री झोपायचेच नाहीत. तर भूकंप झाला म्हणून काहीजण अफवा उठवायचे. काही मुले घरी पळून जाण्याचा प्रयत्न करायचे. इथल्या वातावरणाशी मिळते-जुळते घ्यायला, मानसिक धक्क्यातून सावरायला या मुलांना फार वेळ लागला. त्यामुळे त्यांना समजावून सांगण्यात, भीती घालवण्यात शिक्षकांनी, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना वेळ द्यावा लागे.

अशा परिस्थितीत संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या मनात, श्री. मुथांच्या मनात अस्वस्थता निर्माण होई. द्विधा मन:स्थिती निर्माण होई की, आपण केले ते बरोबर की चूक? अशीच परिस्थिती राहिली तर पुढील दहा वर्षांपर्यंत मुलांचे शिक्षण कसे

पार पाडणार? शिक्षण ही ऐच्छिक बाब आहे. मारून मुटकून, धाक दाखवून शिक्षणात गोडी निर्माण होऊ शकत नाही. या मुलांचा सर्व खर्च भारतीय जैन संघटनेतर्फे केला जात होता, खरे तर जैनसमाजाचा एकही विद्यार्थी या प्रकल्पाचा लाभार्थी नव्हता, त्यामुळे काहींकडून अशीही विचारणा होऊ लागली की, एवढे वर्षे संघटनेच्या मदतीवर अशाच परिस्थितीत राहणार का?

या सर्व गोष्टींनी, विचारांनी श्री. मुथा नाउमेद व्हायचे, पण हिंमत खचून चालणार नव्हती. पुढचा मार्ग आखणे, याही अडथळ्यातून मार्ग काढणे गरजेचे होते. झाडाची पानगळती झाली म्हणून उभे झाड कोलमडून पडत नाही! नव्या पालवीची, नव्या आशेने वाट पाहाते! प्रत्येक वेळ निभावून निघायला काही काळ जावा लागतो! श्री. मुथा यांनी या गोष्टीवर एक तोडगा काढला. त्यांनी बी.जे. मेडिकलच्या मानसशास्त्र विभागाला विनंती केली की मुलांच्या मानसिक पुनर्वसनासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची गरज आहे. त्यांच्या विनंतीला मान देऊन डॉ. अलका पवार, डॉ. मोहन आगाशे यांनी शाळेत येऊन मुलांशी संवाद साधायला सुरुवात केली. त्यांचे काऊन्सेलिंग केले. जबरदस्त मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी, मुलांचे मन रमविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. यातून त्यांना नक्कीच यश आले.

शैक्षणिक पुनर्विकास प्रकल्पाच्या यशाचा हा पहिला टप्पा होता. त्यानंतर पुण्याच्या बाहेर वाघोली येथे दहा एकर जमीन श्री. मुथा यांनी विकत घेतली. या जमिनीवर शैक्षणिक पुनर्विकास प्रकल्पाची उभारणी करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे ३ लाख स्के. फीटचा आराखडा करण्यात आला. वर्ल्ड बँक आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम करण्यास महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली. त्याप्रमाणे या प्रकल्पाचे

संपूर्ण बांधकाम सरकारने आपला कॉन्ट्रॅक्टर नेमून केले व ते श्री. मुथा यांचेकडे हस्तांतरित केले.

वाघोली येथे स्थलांतर :

याला वाघोली शैक्षणिक व पुनर्विकास केंद्र (WERC) असे नाव देण्यात आले व पिंपरी चिंचवड मधील मुलांची, राहण्या-खाण्या-पिण्याची व शाळेची सोय येथे करण्यात आली.

येथे मुलांना मोकळे प्रांगण, वेगळे वातावरण व प्रशस्त शाळा मिळाली. हळूहळू मुले पुण्यातील शिक्षणाला, वास्तव्याला रुळले. घरच्यासारखे जेवण, आपुलकीचे, प्रेमळ शिक्षक पाहून मुलांचे मन शाळेत रमले. यातील काही मुलांनी घरी पत्र पाठवून कळविले की, "आई, आमची काही काळजी करू नको." राहुल हा विद्यार्थी लिहीतो, "नेताजी व्यवस्थित राहत आहे. पण त्याला लेवायला (घालायला) कपडे नाहीत. कपडे मिळणार आहेत, पण ते पाच-सहा दिवसांनी. काही काळजी करू नका."

तर अनेकांनी आपल्या पत्रात उल्लेख केला की, "दसऱ्याच्या दिवशी आम्ही मुख्यमंत्री शरद पवार यांच्या घरी मुक्कामाला होतो." तर दत्ता अडगळे या विद्यार्थ्याने आपल्या छोट्या भावाची खुशाली कळविताना म्हटले आहे, "छोट्या तानूची कसल्यास प्रकारची चिंता करू नका, मी तानूला चांगल्या प्रकारे सांभाळत आहे."

भूकंपामुळे या अल्पवयीन विद्यार्थ्यांना मानसिक प्रौढत्व आल्याचेच त्यांच्या पत्रावरून जाणवत होते.

"इथं आलो तवा वाटलं की, ही बिल्डींग बी पडती का काय?" तावशीगड येथून आलेला सिकपाल राजपूत सांगत होता. आन्मनगरमधील मोठमोठ्या इमारती पाहून तो बावरला होता. या दुर्दैवी सिकपालचे आई व वडील दोन्हीही भूकंपात गेले होते, त्याचे दु:ख त्याच्या डोळ्यांत तरळत होते.

ही मुले पाचवी ते पदवीपर्यंत WERC मध्ये राहून शिकले. संघटना त्यांना दर दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुटीत स्वखर्चाने त्यांना त्यांच्या गावी ने-आण करीत असे.

लातूर भूकंपपीडिताचे यश :

वाघोलीच्या शाळेत त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला, गुणवत्ताआधारित शिक्षण मिळाले, व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला. बाहेरच्या व्यावहारिक जगाशी ओळख तर झालीच पण एक नाते जोडले गेले. भावनांना, संवेदनांना वाट मिळाल्यामुळे दु:खाची धार बोथट झाली. आपल्यापेक्षा जास्त दु:ख या जगात आहे याचीही जाणीव जागृती झाली आणि त्यांना मदतीचा हात देण्यासाठी, उभारी देण्यासाठी साथ देण्याची शिकवण घेऊनच ते संस्थेतून बाहेर पडले. स्वत:च्या पायावर उभे राहिले, अर्थार्जनाच्या वाटा शोधल्या, आपल्या गावाकडे सुधारणा घडवून आणल्या.

लातूर भूकंपग्रस्त मुलांना तेथून पुण्याला घेऊन येण्यापासून ते इथे त्यांचे मानसिक पुनर्वसन घडवून आणून शिक्षण देण्यापर्यंतचा प्रवास हा संघटनेच्या दृष्टीने कठीण तर होताच, पण प्रत्येक वेळी नवनवीन अडचणींना, प्रश्नांना सामोरे जावे लागले. या अनुभवातून शिकून भारतीय जैन संघटनेने अशा आपत्तींसंदर्भात एक नियोजनबद्ध, सुसूत्रपद्धतीचा आराखडा तयार केला. की जेणेकरून आपत्ती आल्यानंतर फारसा वेळ न दवडता त्वरित सर्व यंत्रणा हाताशी असावी व प्रत्यक्ष कार्याची अंमलबजावणी सुरळीतपणे पार पडावी.

जबलपूर भूकंप :

याचा प्रत्यय पुढे १९९७ मध्ये झालेल्या जबलपूर भूकंपावेळी आला. जबलपूरचा भूकंप लातूरएवढा मोठा नव्हता तरी हानी मोठ्या प्रमाणावर झाली होती.

भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते अवघ्या भारतभर विखुरलेले आहेत. अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून ते एकमेकांच्या संपर्कात असतात. त्यामुळे जबलपूरला भूकंप झाल्यानंतर काही तासातच संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी भूकंपग्रस्त भागात जाऊन पोहोचले.

आपत्तीग्रस्तांना मदतकार्य पुरविण्याचे काम इथेही खूप जलदगतीने सुरू केले. पण त्याबरोबरच लोकांमध्ये मिसळून, त्यांच्याशी संवाद साधणेही सुरू केले. यातूनच आपत्तीत सापडलेल्या लहान मुलांची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. शाळा उद्ध्वस्त झाल्या आहेत, त्या गावांमध्ये जाऊन मुलांच्या पालकांशी, शिक्षकांशी, नातेवाईकांशी संपर्क-संवाद साधले. आपत्तीग्रस्त मुलांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून त्यांना पुण्याला पाठविण्याची विनंती करण्यात आली. ते तयार झाल्यानंतर एकंदरीत सर्वेक्षणातून ५० मुलांची निवड पुण्यामध्ये वास्तव्यासाठी व शिक्षणासाठी करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे जवळपास ५० मुले जबलपूरहून पुण्याच्या WERC कडे रवाना झाले.

परंतु जबलपूरच्या विद्यार्थ्यांच्या अडचणी वेगळ्या होत्या. तिथे त्यांचे शिक्षणाचे माध्यम हिंदी होते तर पुण्यातील माध्यम मराठी येथील अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके वेगळी. त्यामुळे येथील अभ्यासक्रमात सामावून घेणे शक्य नव्हते. या अडचणीवर मात करण्यासाठी भारतीय जैन संघटनेच्या श्री. मुथा यांनी निर्णय घेतला की, त्यांना हिंदी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेऊन द्यायचा. त्याप्रमाणे त्यांची येण्या-जाण्याची सोय बसने करण्यात आली. तसेच वसतिगृहातून निघताना जेवणाचा डबा, नास्त्याचा डबा बरोबर दिला जाई.

या अनुभवातून संघटनेला खूप शिकण्यास मिळाले, की परराज्यातून आपल्याइथे मुले आणताना त्यांच्या खाण्या-पिण्याच्या आवडी, राहणीमानाच्या पद्धती, मातृभाषा, शिक्षणाचे माध्यम या सर्व गोष्टींचाही साकल्याने विचार झाला पाहिजे. बहुतांशी राज्याराज्यांमध्ये खाण्याच्या बाबतीत वैविध्य आढळते, मुले हे बदल पटकन स्वीकारू शकत नाहीत, त्यामुळे त्यांना नवीन शाळेशी इथल्या वातावरणाशी एकरूप व्हायला वेळ लागतो. पण याही अनुभवातून शिकून पुढे जात, संस्थेने मुलांचे पदवीपर्यंतचे शिक्षण पार पाडले. अर्थात, अनुभव ही काही बाजारात विकत मिळण्याची गोष्ट नाही! त्यामुळे बऱ्या-वाईट अनुभवांतून शिकतच पुढची आव्हाने स्वीकारणे गरजेचे असते.

वाघोली येथील पुनर्वसन प्रकल्पाची उभारणी म्हणजे अडथळ्यांची, आव्हानांची शर्यतच होय! याचा पुन:प्रत्यय जम्मू आणि काश्मीरमध्ये, २००५ मध्ये, भूकंप झाला त्यावेळी आला. परंतु आत्तापर्यंतच्या प्रत्येक कार्यामुळे भारतीय जैन संघटना सर्व प्रकारची आव्हाने स्वीकारायला तयार होती.

जम्मू-काश्मीरमध्ये भूकंप :

८ ऑक्टोबर २००५ रोजी जम्मू काश्मीरमध्ये ७.६ रिइटर स्केलचा तीव्र भूकंप झाला. या भूकंपामुळे भारत व पाकिस्तानमधील अनेक गावे उद्ध्वस्त झाली. ८० हजार लोक मृत्युमुखी पडले. २ लाख लोक अधू-अपंग झाले तर ४ लाखांहून अधिक बेघर बनले. भारतातील पोरी, मुसफ्फराबाद, बारामुल्ला, उरी, तंगधार हे जिल्हे भूकंपामुळे बेचिराख झाले.

सगळीकडच्या शाळा उद्ध्वस्त झाल्या. शाळांबरोबरच मुलांची मनेही उद्ध्वस्त झाली, विखुरली गेली. पत्त्यांच्या घराप्रमाणे कोसळणाऱ्या इमारती पाहून मुलांची मनेही कोसळली.

इमारती कोसळल्या तर एकवेळ परत बांधता येतात पण कोसळलेली मने सावरणे फार फार कठीण! या मुलांना सावरण्यासाठी भारतीय जैन संघटनेने कंबर कसली.

परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न, विचारविनिमय सुरू झाले. हवामान अत्यंत प्रतिकूल एकीकडे उंच डोंगर तर दुसरीकडे खोल दऱ्या. अशा परिस्थितीत तेथील शाळांची पुनर्बांधणी करणे फार कठीण होते.

जम्मू-काश्मीर सरकार व भारतीय जैन संघटनेच्या वतीने निर्णय घेण्यात आला की, येथील मुलांची रवानगी पुण्याला करायची आणि त्यांचे पुढील शिक्षण सुरू ठेवायचे. जबलपूरच्या मुलांबाबतीतील अनुभवावरून मात्र यावेळी ठरविले की, जम्मू-काश्मीरमधील मुलांचे तेथील शाळेतील प्रवेश रद्द करायचे नाहीत. त्यामुळे बोर्ड, अभ्यासक्रम बदलणार नाहीत. या मुलांना त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण द्यायचे. त्यासाठी त्यांच्याबरोबर उर्दू शिक्षक पाठविण्याचे ठरविण्यात आले.

मुलांची निवड करण्यासाठी भारतीय जैन संघटनेने दहा सदस्यांची टीम श्रीनगरला पाठवली. भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय सेक्रेटरी श्री. प्रफुल्ल पटेल यांनी शालीमार येथे भेट दिली. दहा सदस्यांपैकी, प्रत्येकी पाच पाच जण कुँपवारा व बारामुल्ला जिल्ह्याला भेट देऊन आले. या सर्व प्रयत्नाअंती अनाथ मुलांची, शिक्षकांची एक यादी तयार करण्यात आली. ही यादी घेऊन संघटनेचे कार्यकर्ते मुख्यमंत्री श्री. गुलाब नवी आझाद यांच्याकडे गेले आणि या सर्व मुलांना पुण्याला पाठविण्याचे निश्चित झाले. या मुलांबरोबर दहा शिक्षक व सहा सोशल वर्कर्सचाही समावेश करण्यात आला.

शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडलेले जम्मू काश्मीरमधील शिक्षक

१. श्री. इरफाक अहमद
२. श्री. पीरझादा इलियास
६. श्री. मोहद् अन्वर
७. श्री. मोहम्मद इक्बाल लोन

३. श्री. जावेद अहमद
४. श्री. मोहद् रफी
५. श्री. कौंसर अहमद
८. श्री. रियाज हुसैन शाह
९. श्री. मुनीर गौहार
१०. श्री. मोहम्मद इलियास

११ डिसेंबर २००५ रोजी दहा बसेस श्रीनगर मधून रस्तावाहतुकीद्वारे मुलांना जम्मूपर्यंत आणण्यासाठी तयार होत्या. श्रीमती सोनिया गांधी व श्री. गुलाम नबी आझाद यांच्या उपस्थितीत बसेस्ना हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

जम्मूनंतर झेलम एक्सप्रेसने मुले पुण्याला रवाना झाली. पुण्यात त्यांचे स्वागत झाले.

जिल्हावार-वर्गवार काश्मीर विद्यार्थ्यांचे माहितीपत्रक

वर्ग	जिल्हे							
	कुपवारा	बारा-मुल्ला	बुरगाँव	श्रीनगर	पुलवामा	अनंतनाग	कारगील	एकूण
५ वी	१	२		२				५
६ वी	४५	४	१	६				५६
७ वी	४४	३	२	३	२	१		५५
८ वी	५२	३	२	३	१			६१
९ वी	६५	१७	२	५	१			९०
१० वी	६७	१७	१	१			१	८७
११ वी	८	१					१	१०
१२ वी	१०	५	१					१६
प्रथम-वर्ष	१					१		२
एकूण	२९३	५२	९	२०	४	२	२	३८२

जिल्हावार-वर्गवार जम्मू विद्यार्थ्यांचे माहितीपत्रक

वर्ग	जिल्हे						
	दोडा	उधम-पूर	राजौरी	पूँछ	जम्मू	कथुआँ	एकूण
५ वी	२०	१२					३२
६ वी	८	४	४				१६
७ वी	११	२	६	५		२	२६
८ वी	११	१	५	१		२	२०
९ वी	६	४	५	१			१६
१० वी	५	१	२	४			१२
११ वी	५		१				६
१२ वी							
प्रथम-वर्ष							
एकूण	६६	२४	२३	११		४	१२८

त्यांच्यासाठी वेगळे वर्ग, कपडे, खाणे, राहणे सर्व सोय केली. त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी उर्दू शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे भाषेचा प्रश्न निकाली निघाला. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके बदलली नाहीत.

इथे त्यांना शाकाहारी जेवण दिले जाई. आतापर्यंतच्या भारतीय जैन संघटनेच्या अनुभवातून हे निदर्शनास आले की, परराज्यातून मुलांना इथे आणून स्थिरस्थावर करणे हे जिकीरीचे कठीण काम असते. प्रत्येक राज्यातील खाण्या-पिण्याच्या आवडी, सवयी, वेगवेगळे असते की, आधीच मानसिकदृष्ट्या खचलेल्या मुलांसाठी, अशा संपूर्ण नवीन वातावरणात मिसळायला वेळ लागतो. शिवाय संस्थेलाही त्यांच्याप्रती वेगवेगळे उपाय, प्रयोग

करावे लागतात. या मुलांनी जिल्ह्याचे ठिकाण प्रथमच पाहिले, तर ९०% पेक्षा जास्त मुलांनी रेल्वे पहिल्यांदाच पाहिली. यामध्ये कुपवारा जिल्ह्यातील मुले जास्ती प्रमाणात होती, त्यांच्या घरच्यांचा त्यांना एवढ्या दूर पाठविण्यासाठी प्रथम विरोध होता, पण नंतर तो मावळला.

शाळेत दाखल झाल्यानंतर मुलांचे आयडेंटीटी कार्ड तयार केले, फोटो काढले, आरोग्य तपासणी केली, विमा उतरविला. यातील बहुतांशी मुले ५ ते १० किंवा ११ वी, १२ वीतील होते. काहींचे वय १२ वी पेक्षाही जास्त होते. अशांना मात्र परत पाठविण्यात आले. कारण संस्थेत फक्त १२ वी पर्यंतच्याच मुलांना प्रवेश देणे बंधनकारक होते.

या मुलांना इथे जरी शाकाहारी जेवणाची सक्ती होती तरी त्यांच्या नमाजची मात्र वेगळी सोय वसतिगृहात केली होती. तसेच ठराविक दिवशी मशिदमध्ये जाण्याची परवानगीही होती. त्यांचे ईद, मोहरम सारखे सण सर्व मिळून संस्थेत साजरे केले जात.

या सर्व व्यवस्थेनंतरही मुलांच्या बाबतीतील एक महत्त्वाचा प्रश्न अजूनही अनुत्तरीत होतो तो म्हणजे सायकौलॉजिकल काऊन्सेलिंग. त्यांना मानसिक धक्क्यातून सावरणे सोपे जावे व शैक्षणिक विकासाबरोबरच मानसिक पुनर्वसनही लवकर व योग्य रीतीने व्हावे यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल टेन्स व डिपार्टमेंट ऑफ सायकॉलॉजी बी.जे. मेडिकल कॉलेज, पुणे यांच्याबरोबर करार करण्यात आला.

त्याप्रमाणे सौ. अलका पवार, श्री. कमलाम व श्री. एम. नारायण यांनी वाघोलीच्या शैक्षणिक पुनर्विकास केंद्राला भेट दिली. मुलांशी व्यक्तिगतरीत्या संवाद साधला. त्यांचे प्रश्न, अडचणी समजावून घेतल्या. त्यांच्या मनाला उभारी दिली. पण त्यातूनही ज्यांना

अधिक काउन्सेलिंगची गरज आहे, अशा ४० एक मुलांची निवड करण्यात आली. व त्यांना विशेष साहाय्य केले.

याशिवाय केंद्रात या मुलांची कल चाचणी घेण्यात आली, योगा, व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे राबविण्यात आली. मुलांना घरची आठवण नाही आली पाहिजे, याप्रकारे त्यांचे मन शाळेत इतर ॲक्टिव्हिटिजमध्ये रमेल याची वेळोवेळी दक्षता घेण्यात आली.



वर्षभराचे वेळापत्रक अगदी भरगच्च असे शालेय शिक्षणाबरोबरच, खेळांमध्ये वैविध्यपूर्ण प्रकार, वक्तृत्व स्पर्धा, स्पर्धापरीक्षा, व्यक्तिगत विकास शिबिरांमध्ये मुलांचा वेळ निघून जाई. त्यांच्या परीक्षा तिकडे फेब्रुवारीमध्ये असत. त्यामुळे परीक्षेच्या वेळी सर्वांना त्यांच्या राज्यांत पाठविले जाई व सुट्टी संपली की परत इकडे. हा सर्व खर्च संघटनेचा असे.

काही वेळा प्रवासामुळे, हवामान बदलामुळे मुले आजारी पडत. त्यामुळे भारतीय जैन संघटनेने सिद्धार्थ हॉस्पिटलशी सामंजस्य करार केला. वसतिगृहातील मुलांची आजारपणात देखभाल करण्यासाठी एम.बी.बी.एस. डॉक्टर व नर्सेसची नेमणूक केली. इथे मुलांची सर्व प्रकारे फार काळजी घेतली जाई. असे असूनही जम्मू काश्मीरमधील अशासकीय संस्थांनी मुलांना राज्याबाहेर

पाठविण्यास सक्त विरोध केला. एवढेच नाही तर, राज्य सरकार व भारतीय जैन संघटनेच्या विरुद्ध हायकोर्टात रिट पिटीशन दाखल केले. खूप विरोध केला. प्रसारमाध्यमे व पेपरवाल्यांनी मिळून कांगावा करण्यास सुरुवात केली की मुलांचे स्मगलिंग होत आहे. मिळेल ती माहिती छापण्यास आली.

खरे तर, हा फक्त विरोधासाठी विरोध होता. तथ्य काहीच नव्हते! मुलांना बीजेएसमार्फत जम्मू-काश्मीरला परीक्षेसाठी पाठविल्यानंतर सरकारने मुलांना परत बीजेएस बरोबर पाठविले नाही. कारण केसचा निकाल बीजेएसच्या बाजूने लागला नाही.

पर्वताला ऊन, वाऱ्याला घाबरून चालत नाही! वादळाच्या तडाख्यांनी विचलित होऊन चालत नाही! पावसाचे ढग अडवून पावसाला अंगाखांद्यावर खेळविण्याचे नित्याचे कर्तव्य त्याला चुकवायचे नसते! कर्तव्य आणि भावनांच्या संघर्षात कर्मकर्तव्य जाणणारे कर्तव्यालाच जास्त महत्त्व देतात!

वाघोली शैक्षणिक पुनर्विकास केंद्राचे यश :

वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प केंद्रातील शाळा कॉलेजमध्ये मुलांना देखील प्रवेश दिला जातो. त्यामुळे आपत्तीग्रस्त मुलांचे शिक्षण या मुलांबरोबर होत असते. प्रथमपासूनच सर्व मुले घरगुती वातावरणात राहतात. भारतीय जैन संघटना या सर्वांच्या राहण्याचा, शैक्षणिक साहित्याचा, खाण्याचा, कपड्यालत्यांचा खर्च उचलते.

मुलांच्या पालकांकडून एक रुपयाचेही डोनेशन घेतले जात नाही. शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकास, प्रगती, व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी मिळाल्यामुळे मुले निर्भिड, कणखर बनतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भयानक आपत्तीच्या मानसिक धक्क्यातून इथे आल्यानंतर ते बावरतात. त्यांना प्रेमाने, मायेने इथे आपलेसे केले जाते. हेच या प्रकल्पाचे सर्वांत मोठे यश आहे.

आणि या यशाची पताका घेऊनच ते आपल्या गावी, तिथली सुधारणा विकास घडविण्यासाठी परततात.

वाघोली शैक्षणिक व पुनर्वसन केंद्राला आतापर्यंत महत्त्वाच्या व्यक्तींनी भेट दिली आहे, पाहणी केली आहे. येथील नियोजन, शिक्षणाची पद्धत, कामकाजपद्धत समजून घेतली आहे. भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम प्रकल्प पाहून इतके भारावले की, त्यांनी याठिकाणी स्वत:च्या खात्यातील चेक मदत म्हणून दिला.

माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव, श्री. व्ही.पी.सिंग, श्री. जॉर्ज फर्नांडीस, श्रीमती सोनिया गांधी या सर्वांनी भारतीय जैन संघटनेच्या कार्याचे भरभरून कौतुक केले आहे. त्याचप्रमाणे श्री. अटलबिहारी वाजपेयी, माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील, श्री. जनार्दन रेड्डी, वीरप्पा मोईली यांनी वेळोवेळी संघटनेच्या शैक्षणिक कार्याची प्रशंसा केली आहे.

श्री. शिवराज पाटील पिंपरी येथील शाळेच्या प्रथम वर्धापनदिनी उपस्थित होते. तर श्री. शरद पवार यांचे प्रकल्प उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर, प्रत्येक वळणावर वेळोवेळी सहकार्य, मार्गदर्शन राहिले आहे. त्यांनी संघटनेच्या सामाजिक कार्यासाठी वेगळी इमारत असावी असे सूचित केले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव श्री. दिनेश अफझलपूरकर यांनी भारतीय जैन संघटनेच्या शैक्षणिक पुनर्वसन केंद्राला भेट दिल्यानंतर भावोद्‌गार काढले की, “अशासकीय संस्था सामाजिक, शैक्षणिक आणि पुनर्वसन क्षेत्रात शासनापेक्षा किती अवाढव्य कार्य करू शकतात, हे या भारतीय जैन संघटनेच्या कार्यावरून लक्षात येते.” माजी निवडणूक आयुक्त श्री. टी.एन्. शेषन यांनी वाघोली येथे भेट दिली व आपल्या मातोश्री सीतालक्ष्मींच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी आदर्श विद्यार्थ्यांसाठी रुपये दोन हजाराचे पारितोषिक जाहीर केले.

आजची लहान मुले हा उद्याचा भारताचा भविष्यकाळ आहे. भारतीय जैन संघटनेने महाराष्ट्र, जबलपूर, जम्मू-काश्मीरमधील

आपत्तीग्रस्त लहान मुलांना शैक्षणिक सुविधा देऊन, त्यांचे मानसिक पुनर्वसन करून उज्ज्वल भवितव्याचा मार्ग दाखवला, त्यांच्या जीवनाला दिशा दिली. हीच पिढी उद्या आपल्या बांधवांचे, समाजाचे, भारताचे भविष्य उज्ज्वल करणार आहे! वाघोली शैक्षणिक व पुनर्विकास केंद्राच्या उभारणीचे संपूर्ण यश या पिढ्यांच्या देदिप्यमान व उज्ज्वल कारकिर्दीत सामावले गेले आहे!

☆☆☆

५. मेळघाटचे कुपोषणाला सामोरे जाताना

वाघोली येथील WERC प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट दिल्यावर तेथील मुलांमध्ये प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट होती ती म्हणजे आत्मविश्वास व निर्भिडता. सुटीचा दिवस होता, त्यामुळे मुलांशी छानपैकी बोलायला मिळाले.

त्यांना विचारले कोठून आलात? गाव कोणते तुमचे? तर कोणाचे उत्तर होते हीरा, कोणाचे गोलखेडा, कोणी पाथरपूरचे तर कोणी रोहणीखेड्याचे.

"इथे तुम्हांला काय काय आवडते?"-मी.

"आम्हांला इथले जेवण आवडते, शिक्षक छान आहेत. खेळायला खूप मिळते."-मुले.

पण सर्वांचे एक उत्तर मात्र सारखे होते. ते म्हणजे "इथली असेंब्ली आम्हांला खूप आवडते."- मुले.

"का?"-मी.

"कारण त्यामध्ये आमची कला, वक्तृत्व, कविता, खेळ असे विविध गुणांना सादर करण्याची रोज संधी मिळते."

"किती वाजता असते असेंब्ली"-मी,

"रोज संध्याकाळी ६ ते ७ असते."-मुले.

"दिवसभराचे नियोजन कसे असते?"- मी,

"पहाटे ५ वा. उठून, आवरून, प्रार्थनेसाठी हजर राहावे लागते. त्यानंतर व्यायाम, दूध-नाष्टा घेऊन शाळेत जायचे. मधल्या वेळी जेवण, शाळा सुटल्यानंतर दोन तास अभ्यास, नाष्टा-दूध. थोडा वेळ खेळ, मग असेंब्ली. रात्रीचे जेवण, अभ्यास व झोप." -मुले

या मुलांबरोबर अशा छानशा गप्पा मारीत आम्हीही तिथले चविष्ट जेवण घेत होतो. स्वयंपाकघरातील स्वच्छता, धान्याची, डाळींची, कडधान्यांची प्रत उत्तम तर होतीच, पण स्वच्छताही. खूप मुले शिस्तीत येऊन जेवण स्वत:च्या हाताने घेत होती.

"आईवडिलांची आठवण येते कां?" -मी.

"हो, कधीकधी. पण आम्हांला संस्थेचे शिक्षक मोठ्या म्हणजे दिवाळीच्या/ उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये घरी घेऊन जातात आणि परत आणायला येतात." -मुले.

वाघोलीच्या WERC प्रकल्पामध्ये मुलांच्या शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासही केला जातो. मुलांच्या आत्मविश्वासाचा प्रत्यय आम्ही निघताना आला. आम्ही जसे त्यांना प्रश्न विचारले, तसेच त्यांनीही आम्हांला विचारले की, "तुम्ही कोण आहात? कशासाठी इथे आलात? काय करता? वगैरे."

हे ऐकून तर खरोखरी कौतुकमिश्रित आनंदाने आम्ही भारावून गेलो. इवल्यांशा रोपट्याला योग्य हवा, पाणी, खत मिळाले की ते कसे टवटवीत, ताजेतवाने राहून फुलत जाते! सर्वांचे लक्ष तर वेधून घेतेच पण मनाला उल्हासित करते! याचाच प्रत्यय मी अनुभवीत होते.

मुलांचा आताचा सर्वांगीण विकास व प्रगती पाहून मन ९७ सालामध्ये रमले.

भारतीय जैन संघटनेतर्फे इथे आणण्यात आलेली मुले मेळघाट परिसरातील आहेत. आतापर्यंत सामुदायिक विवाह तसेच मराठवाड्यातील भूकंपग्रस्तांच्या मुलांच्या शैक्षणिक पुनर्वसनाचे

कार्य हाती घेतलेल्या भारतीय जैन संघटनेने मेळघाट परिसरातील कुपोषणग्रस्त भागातील तीनशेअठ्ठावीस मुलांच्या संपूर्ण शैक्षणिक जबाबदारीचा महत्त्वांकाक्षी उपक्रम हाती घेतला.

मेळघाट हे सातपुडा पर्वतरांगेमध्ये वसलेले अमरावतीच्या उत्तरेकडचे गाव आहे. इथले आदिवासी प्रामुख्याने कोरकू जमातीचे आहेत. मुलांच्या कुपोषण समस्येबाबत मेळघाट सर्वांना परिचित आहे. पण त्याही पलीकडची ओळख म्हणजे मेळघाटला भारताचे सोमालिया म्हटले जाते. या परिसरात आदिवासींच्या कुपोषणाची समस्या दरवर्षी उद्‌भवते, म्हणून संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या भागाचा प्रत्यक्ष अभ्यास केला.

यासाठी सर्वप्रथम भारतीय जैन संघटना व कस्तुरबा गांधी ट्रस्टने एकत्र येऊन आदिवासींचे एक सम्मेलन भरवले. त्यामध्ये त्यांनी बालविवाह पद्धतीला आळा घालण्यासाठी सामुदायिक विवाहाचे आयोजन करण्याचे ठरवले, पण एका अटीवर, मुलीचे वय अठरा वर्षांपेक्षा जास्त तर मुलाचे वय एकवीस वर्षांपेक्षा जास्त हवे.

सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन, पालकांचे संमेलन व अभ्यास दौरा याद्वारे कुपोषण समस्येविरुद्ध संघटनेने एक चळवळच सुरू केली. अभ्यास दौरा वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन पार पाडला. त्यामध्ये बरीच कारणे दडलेली त्यांना जाणवले.

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी ते म्हणजे परिसरात असलेली अत्यंत गरिबी, अशिक्षितपणा, अस्वच्छता, बालविवाह, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि कुटुंबनियोजनाचा अभाव.

परंपरागत व वर्षानुवर्षे ही जमात पाड्यांवर, दारिद्र्यात खितपत पडलेली आहे. बाह्य विकसित जगाशी यांचा दुरान्वयानेही कधी संबंध आला नाही. त्यामुळे आधुनिकता, विकास, प्रगती, शिक्षण, आरोग्य या गोष्टी त्यांच्या गावीही नाहीत. विकसित जगाच्या प्रवाहात सामील होण्याची त्यांना कधीच संधी मिळाली नाही,

दुष्काळी, दुर्गम भागातील, डोंगर परिसरातील त्यांचे जिणे त्यामुळे अतिशय अविकसित, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले व परंपरागत रूढी-परांपरा, अंधश्रद्धांमध्येच खितपत पडले होते. त्यामुळे दरवर्षी साधारणत: एक हजार मुलांचा मृत्यू कुपोषणामुळे होतो.

या परिस्थितीचा संपूर्ण अभ्यास केल्यानंतर संघटनेने घेतलेला निर्णय हा खरोखरीच खूप वेगळा व आदर्श निर्माण करणारा ठरला. त्यांनी ठरविले की, इथे नुसते पैसे, गरजू साहित्य किंवा निवारा देऊन चालणार नाही तर दीर्घकाळासाठी सुसूत्र धोरण अवलंबिण्याची गरज आहे. संपूर्ण परिस्थितीमध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याची निकड सर्वांना जाणवू लागली. मूलभूत शिक्षण हाच कुपोषणाच्या समस्येचा उपाय असल्याने मूलभूत व दर्जेदार शिक्षणासाठी भरीव कामगिरी करण्याचे ठरविण्यात आले. प्रत्यक्ष पाहणीमध्ये संघटनेच्या कार्यकर्त्यांना असे आढळले की, येथील शाळांची दुरावस्था झालेली आहे, धारणी तालुक्यातील तर शाळा पावसाळ्यामध्ये बंदच ठेवल्या जातात. एवढी या शाळांच्या इमारतींची वाईट स्थिती आहे.

घरापासून दूर असणाऱ्या शाळा, रस्त्यांची दुरावस्था, वर्षानुवर्षे शाळेच्या इमारतींची देखभाल दुरुस्ती नाही, त्यामुळे याच भागात उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था करणे फार जिकीरीचे काम होते. येथील सामाजिक स्थिती, राहणीमान, अंधश्रद्धा, दारिद्र्य या सगळ्यामुळे शिक्षणाच्या दर्जावर विपरीत परिणाम होत होता. त्यामुळे विकसित भागातील शिक्षणाचा दर्जा, विचारांची पद्धती, व्यक्तिमत्त्व विकास या सर्व गोष्टींपासून ही मुले कायमची वंचित राहिली आहेत. पण हेच जर विकसित भागातील गुणवत्तेच्या दर्जानुसार शिक्षणाची संधी या मुलांना मिळाली, तर ही मुले प्रतिभावान, शिक्षित तर होतीलच पण पुन्हा आपल्या परिसरामध्ये

येऊन येथील बांधवांच्या, नातेवाईकांच्या जीवनात, आचार-विचार, राहणीमानात मूलभूत बदल घडवतील. हा आशावाद मनात बाळगून संघटनेच्या श्री. शांतीलाल मुथा यांनी मुलांचे शैक्षणिक पुनर्वसन करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

मुलांना बाहेरच्या जगाचे ज्ञान व्हावे, बाह्य विकसित भागातील घडामोडींचे आकलन व्हावे हा उद्देश प्रामुख्याने शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाची आखणी करताना ठरवला. गुणवत्ता, कौशल्यवाढीचे शिक्षण, त्यांच्या मूळ संस्कृतीला धक्का न लावता त्यांच्या विचारपद्धतीमध्ये बदल घडवून आणणे, फक्त पाठ्यपुस्तकी शिक्षणाची सोय न करता त्यांच्यावर योग्य पद्धतीचे संस्कार कसे रुजविले जातील, व्यवसायाभिमुख प्रशिक्षण, उच्च शिक्षण यांकडे त्यांचा कल वाढविणे आणि एकंदरीतच त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठीची पायाभरणी करणे या उद्दिष्टांनी शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाची आखणी करण्यात आली. त्यासाठी भारतीय जैन संघटनेने या मुलांच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शैक्षणिक साहित्य या सर्व मूलभूत गोष्टींची पुढील दहा वर्षांपर्यंत म्हणजे मुलांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची काळजी घेण्याचे ठरविले.

दिव्याची एक ज्योत सभोवतालचा अंधार नष्ट करायला मदत करते, ज्योतीने ज्योत पेटवली तर असंख्य दिपज्योती अवघा आसमंत उजळून टाकतात, प्रकाशमय करतात.

शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचा धाडसी निर्णय घेऊन मेळघाटसारख्या कुपोषणग्रस्त भागातील अंधकारमय जीवनात दिव्याने दिवा पेटवून आसमंत प्रकाशमय करण्याची किमया भारतीय जैन संघटनेने केली. त्यासाठी त्वरित अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली.

मार्च महिन्यात महाराष्ट्राच्या सर्व भागातील ४८ वृत्तपत्रांमध्ये मोठ्या मथळ्याच्या जाहिराती देऊन अशा मुलांचे अर्ज मागविण्यात आले. परंतु या माध्यमातून विशेष प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून संघटनेने गावा-गावामध्ये पोहोचण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला. श्री. हेमंत नहाटा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जैन संघटनेच्या सहा वेगवेगळ्या तुकड्या निर्माण करण्यात आल्या. त्यांनी तीन वेळा जिल्ह्यांचे दौरे केले. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील मुख्याध्यापक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अनेक सरपंच, आदर्श गावातील कार्यकर्ते, वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्था यांना पत्रे लिहून या कामी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तीन महिन्यापर्यंत हे परिश्रम सातत्याने करून ज्या मुलांचे अर्ज मागविले. त्यांच्या त्या त्या जिल्ह्यांमध्ये जाऊन मुलाखती घेण्यात आल्या. पालकांशी संवाद साधून त्यांना आपली भूमिका संघटनेच्या कार्यकर्त्यांनी समजावून सांगितली. या पालकांशी संवाद साधण्यासाठी जिल्हाधिकारी शामलाल गोयल, प्रकल्प अधिकारी गरड, कस्तुरबा गांधी ट्रस्ट, आमदार पटल्या गुरुजी या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले. एवढ्या दूर मुलांना पाठविण्यासाठी तेव्हा तर पालक तयार नव्हते, हळूहळू तयार होत गेले.

संघटनेने मुलांची निवड करताना काही निकष लावले होते. यामध्ये तीन किंवा चार मुले प्रत्येक गावातून व ज्या मुलांना शाळेत जाण्यासाठी दूरपर्यंत पायी जावे लागते, अशांची मुख्यत: निवड करण्यात आली.

एकूण तीनशेअठ्ठावीस मुलांची निवड पहिल्या वर्षी करण्यात आली व पिढ्यान्‌पिढ्या दारिद्र्य, अज्ञान आणि अंधश्रद्धेच्या काळोखात खितपत पडलेल्या या बालकांना क्रांतिदिनाच्या पर्वावर राज्याची

सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे नगरीकडे रवाना करण्यासाठी सज्ज करण्यात आले.

यावेळी श्री. शांतीलाल मुथा यांनी मुलांना निरोप देण्यासाठी आलेल्या पालकांसमोर व नातेवाईकांसमोर भावोद्‌गार काढले की, "मी या मुलांचा आता पिता आहे, यांची संपूर्ण जबाबदारी आता माझ्यावर असून त्यांना पूर्णपणे उच्चशिक्षित करून मी मेळघाटच्या विकासासाठी पाठवीन. त्यासोबतच पुण्याच्या वातावरणात त्यांची कोरकु संस्कृती हरवू देणार नाही." पुणे येथे शिक्षणासाठी रवाना होत असलेल्या मुलांना कुंकवाचा टिळा लावून व दही साखर खाऊ घालून, पारंपरिक आदिवासी नृत्याच्या साथीत निरोप देण्यात आला. सात वातानुकूलित बसमध्ये बसून ही मुले आपल्या मातापित्याचा आशीर्वाद घेत पुण्याकरिता रवाना झाली.

पुण्यात आल्यानंतर या मुलांच्या वास्तव्याची सोय पिंपरी-चिंचवडमधील संघटनेच्या वसतिगृहात करण्यात आली.

वाघोली येथील नवीन वास्तूचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, काही महिन्यांतच मुलांची राहण्याची, खाण्यापिण्याची व शाळेची सोय वाघोली येथील प्रशस्त कँपस्‌मध्ये करण्यात आली.

आता या शाळेमध्ये मुले रमून गेली आहेत. येथील वातावरण अगदी घरच्यासारखे आहे, त्यामुळे मुलांमध्ये मोकळेपणा आला आहे. पण सुरुवातीच्या दिवसांमध्ये मात्र या मुलांना तयार करणे फार जिकीरीचे होते.

श्री. अशोक पवार सरांसारख्या मायेच्या, प्रेमळ वागण्याने मुलांमधला बुजरेपणा नष्ट झाला. येथे त्यांना मराठी, हिंदी, इंग्लिश बरोबरच कोरकू भाषाही शिकवली जाऊ लागली. त्यांच्याशी व्यक्तिगतरीत्या पवारसरांनी संवाद साधून बोलते केले, त्यांच्या इथल्या अडचणी समजून घेतल्या. वातावरणात मिसळताना वाटणारा संकोच घालवला. आत्मविश्वास, जिद्द,

निर्भयता, शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवले. पारंपरिक अनिष्ट रूढी, परंपरांचा, अंधश्रद्धांचा त्यांच्यावर असणारा पगडा घालवण्यासाठी सर वेळोवेळी त्यांच्याशी संवाद साधत राहिले, पण हे कार्य वाटते तितके सोपे मुळीच नव्हते. वर्षानुवर्षे मुख्य प्रवाहापासून वेगळे पडलेल्या, विकासापासून, प्रगतीपासून वंचित असलेल्या एका विशिष्ट जमातीला त्यांच्या कलाने घेत मुख्य प्रवाहात सामील करून घेणे हे अतिशय कठीण व जिकीरीचे कार्य होते.

त्यांची संस्कृती, भाषा, धार्मिक रूढी या इतरांपेक्षा वेगळ्या आहेत आणि ते आपली संस्कृती किंवा रूढी परंपरेतून बाहेर पडायला सहजासहजी तयार होत नाहीत. आदिवासींवर समाजाकडून सातत्याने अन्याय होत आल्याने त्यांच्या मनात एक असुरक्षिततेची भावना कायम दडलेली असते. त्यातच आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक योजनांची व त्या राबविणाऱ्या लाखो लोकांची नोंदणी सरकार दप्तरी जमा आहे! याचा परिणाम असा झाला आहे की, खऱ्या अर्थाने, तळमळीने, प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्यांकडेही लोक साशंक नजरेने पाहू लागले आहेत! त्यामुळे प्रकल्प उभारणीनंतरचा सुरुवातीचा काळ हा आदिवासींचा, लोकांचा, समाजाचा, सरकारचा विश्वास संपादन करण्यात गेला. प्रत्यक्षातील कार्याचे फळ येईपर्यंतचा काळ नक्कीच कठीण होता!

पावसाच्या पाण्याला सुरुवातीला डोंगरदऱ्यातून, जंगलवाटांतून, दगडा-काट्याकुट्यांतूनच वळणे घेत वाहात राहावे लागते, प्रवाहाच्या अथक प्रवाहीपणानंतरच पुढे विशाल नदी रूप साकारू लागते. प्रवाहाला मागे वळून चालत नाही तर सतत प्रवाही राहण्यासाठी मनही हिम्मतबंद असावे लागते!

मुलांच्या मनामध्ये परिवर्तन घडून येऊ लागले, तसतसे ते इथल्या शिक्षणामध्ये रस घेऊ लागले. ही मुले मूळची चिवट, चपळ

असतात. खेळांमध्ये तर ते विशेष प्राविण्य दाखवितातच पण बहुतांशी एकपाठी आहेत. विलक्षण बुद्धिमत्तेची देणगी काहींना आहे. तर काही मुलांमध्ये उपजतच फार सुंदर कला आहेत. चित्रकला, संगीत यात ते त्यांना विशेष गती आहे.

पण आदिवासी भागात राहिल्याने शिक्षणामध्ये त्यांचा मूळ पाया मात्र कच्चा असतो. ते पुढच्या वर्गात जात राहतात पण बाराखडी, मूळाक्षरांची देखील ओळख सातवी, आठवीच्या मुलांना नसते. त्यामुळे त्यांच्यासाठी वेगळे व जादाचे तास घेतले जातात. एखादा मुलगा सहावीत असला तरी जादा तासांमध्ये तो दुसरीचे शिक्षण घेत असतो, अशी अवस्था बऱ्याचदा अनुभवास येते. तेही त्यांच्या बोलीभाषेत व त्यांच्या कलाने समजवावे लागते. आदिवासींच्या जीवनावर आधारित गोष्टीरूप छोटी छोटी पुस्तके किंवा कथा कादंबऱ्यांचा वेगळा संग्रह WERC मध्ये करण्यात आलेला आहे. अभ्यासाची त्यांना गोडी असेल तरच पुढे शिकण्याची आवड निर्माण होते व आवडीनुसार विषयांत रस घेऊन ते त्यात पुढे प्रावीण्य संपादन करू शकतात.

तेथील एका मुलाबाबतचा अनुभव मात्र फार वेगळा आहे. त्याला शिक्षणात किंवा खेळातही फारशी गती, आवड नव्हती. त्याच्याशी हरतऱ्हेने संवाद साधूनही त्याचा कल कोणत्या क्षेत्राकडे आहे हे लक्षात येत नव्हते. गोडाऊनमध्ये काही काम्प्युटर्स दुरुस्तीसाठी ठेवले होते. तो मुलगा त्या कॉम्प्युटर दुरुस्ती जोडणीमध्ये मात्र कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किंवा प्रशिक्षणाव्यतिरिक्त रमला. त्याने ते कॉम्प्युटर्स उत्तमरीत्या दुरुस्त तर केलेच, पण सर्वांची वाहवा मिळवली. याच प्रकारच्या व्यवसायासाठी संस्थेने त्याला हरतऱ्हेची मदत केली.

या मुलांना येथे आवडणारी गोष्ट म्हणजे असेंब्ली. असेंब्लीमध्ये त्यांना कलागुण सादर करण्याची संधी मिळते. वक्तृत्व, वाचन, गाणे शिकवले जाते.

एकंदरीतच संस्थेमध्ये सर्व मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर देतानाच, शिक्षण, खेळ, आरोग्य यांकडेही लक्ष दिले जाते. आजपर्यंत मेळघाट, ठाणे परिसरातील कित्येक मुले येऊन येथे शिक्षण घेऊन पुन्हा आपल्या भागामध्ये गेले आहेत. यातील कोणी डॉक्टर, कोणी शिक्षक, कोणी व्यावसायिक तर कोणी नोकरदार बनून आपल्या परिसरामध्ये सुधारणा घडवून आणीत आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये आमूलाग्र बदल होत आहे.

होय परिवर्तन क्रांती होय, यालाच दृश्य परिणाम असा आहे की, आता इथले लोक फेब्रुवारी, मार्च महिन्याची वाट पाहतात. आम्हांलापण पुण्याला शिकायला यायचे म्हणून विनंती करतात. आता संघटनेच्या कार्यकर्त्यांमुळे पेच निर्माण होतो की सर्वच मुले पुण्याला यायला तयार आहेत! सर नेमकी कोणाची निवड करायची? त्यासाठी फेब्रुवारीपासून तेथे चाचणी परीक्षा ठेवली जाते आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांची निवड केली जाते.

पुण्यातून पदवीधर होऊन आपल्या गावी गेलेली मुले इथल्या शिक्षणाचे, संस्कारांचे बीज नव्या उमेदीने, उत्साहाने आपल्या मातीमध्ये रुजवीत आहेत. ह्या बीजांकुरातून फोफावलेले रोपटे इथल्या मनामनांत आकांक्षेचे, प्रगतीचे, आशेचे, उज्ज्वल भवितव्याचे धुमारे जगवताहेत, फुलवताहेत.

भारतीय जैन संघटनेने कुपोषणाच्या समस्येकडे केवळ प्रश्न, समस्या म्हणून न पाहता, वरवरची, तात्पुरती मलमपट्टी करून समस्येचे निराकरण न करता, मूळापासून समस्या सोडविण्यावर भर दिला. कुपोषणाच्या समस्येबरोबरच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अडचणी ध्यानात घेतल्या, कोणाकडूनही एक रुपयाचेही डोनेशन न घेता गुणवत्ताप्रधान शिक्षणाची हमी दिली. सर्वांगीण शिक्षण देतानाच त्यांच्यामध्ये आत्मभान, आत्मविश्वास जागृत केला, त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेतले. याचाच दृश्य परिणाम म्हणजे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये आमूलाग्र

बदलाची, परिवर्तनाची क्रांती तेथे घडून आली. आधुनिक, विकसित समाजाशी ओळख झाली, नवनवे विचार अंगिकारले.

विकसित समाज आणि आदिवासी बांधव यांच्यातील दुवा बनून भारतीय जैन संघटनेने केलेली कुपोषणाच्या समस्येवरची मात ही परिवर्तनाची क्रांती होय!

☆☆☆

६. पुन्हा भूकंप : गुजरातची हाक

गुजरात हे भारतातील प्रगत राज्य आहे. वाढते औद्योदिकीकरण, व्यापार यामुळे गुजरातला `उद्यमनगरी' म्हणून संबोधले जाते, नावाजले जाते. गुजरातचे भौगोलिक स्थान, समुद्रकिनारा, बंदर या सर्वांमुळे व्यापार व उद्योगाला पोषक वातावरण येथे आहे. पण नियतीला २६ जानेवारी २००१ रोजी, निष्पाप जिवांशी एक खेळ खेळावासा वाटला. २६ जानेवारी भारताचा प्रजासत्ताक दिन आणि याच दिवशी सुमारे ७.६ रिश्टर स्केल एवढा प्रचंड भूकंप गुजरातमध्ये झाला. साधारणपणे १३,८११ लोक एका वेळी मृत्युमुखी पडले. भूजमध्ये एकही इमारत उभी राहिलेली दिसत नव्हती. घरे, दुकाने, शाळा, ऑफिसेस सर्व काही उद्ध्वस्त झाले. भूकंपाची तीव्रता एवढी जबरदस्त होती की, आर्थिक नुकसान तर झालेच, पण जीवितहानी मोठ्या प्रमाणावर झाली. कच्छ, राजकोट, सुरेंद्रनगर, जामनगर या जिल्ह्यांमध्ये व तेथील गावांमध्ये प्रचंड नुकसान झाले. या जबरदस्त धक्क्यातून सावरणे मोठे कठीण होते. गुजरातमध्ये भूकंपामुळे निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणणे, हे मोठे आव्हान होते.

एका अत्यंत दुर्दैवी घटनेने भारताचा प्रजासत्ताक दिन काळवंडला गेला. प्रजासत्ताक दिन साजरा करताना या दुर्दैवी घटनेच्या

वेदना पुढील काळातही जाणवल्याशिवाय राहणार नाहीत.

भूकंपाची बातमी कानी पडताच अध्यक्ष श्री. मुथा व कार्यकर्त्यांनी वाघोली येथील WERC मध्ये बैठक घेतली. WERC मध्ये लातूर भूकंपग्रस्तांच्या शिक्षणाची सोय केलेली होती. श्री. मुथांनी ठरविले की, यातील काही मुलांना बरोबर घेऊन गुजरातमध्ये मदतकार्य उभारायचे. यापाठीमागचा उद्देश असा की, एक भूकंपग्रस्त दुसऱ्या भूकंपग्रस्ताच्या वेदना जास्त समजून घेऊ शकतो, जाणू शकतो. स्वत: वेदना सहन केल्यामुळे दुसऱ्याचे अश्रू पुसू शकतो.
ठरल्याप्रमाणे ४०० कार्यकर्ते गुजरातकडे अन्न पाकिटे, अन्नधान्य, औषधे व जीवनावश्यक साहित्य घेऊन निघाले. तसेच मलकापूर, सिलोड, औरंगाबाद, हिंगणघाट, नांदेड, संगमनेर या ठिकाणाहूनही कार्यकर्ते मदतकार्यासाठी गुजरातकडे रवाना झाले. श्री. मुथा यांनी मुंबईच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सशी संपर्क साधला व अन्न, पाणी, कपडे, दूध पावडर, चप्पल, इतर जीवनावश्यक वस्तू पाठविण्याची मागणी केली.
भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते गुजरातमध्ये पोहोचल्यानंतर त्यांना सामखियाटी व बछाव येथे आपले कँप उभारले. अध्यक्ष श्री. मुथा स्वत: बछाव कँपमध्ये राहात होते. एकावेळी तीस हजार जणांना अन्नपुरवठा करता येईल अशी व्यवस्था करण्यात आली. रोज सकाळी-संध्याकाळी सर्वजणांच्या खाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्याचबरोबर कपडे, निवारा, औषधोपचार, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप यांद्वारे वेगाने मदतकार्य सुरू झाले. मृतदेहांची विल्हेवाट लावणे, हे फार जिकीरीचे काम आपत्तीच्या ठिकाणी असते. तसेच औषधोपचार हॉस्पिटल्सची तीव्रतेने गरज भासते. वसवाडला डॉ. छोटूभाई अजमेरा यांनी ८० बेडचे हॉस्पिटल सुरू केले. भारतीय जैन संघटनेने पुण्याहून डॉक्टर्स वसवाडला पाठविले. रक्तदान शिबिराचे आयोजन केले.
आपत्तीग्रस्तांसाठी मदत कार्य, सुटका व त्यांचे पुनर्वसन या गोष्टी नियोजनबद्ध, सुसूत्ररीत्या जोमाने सुरू होत्या. त्यामुळे

श्री. मुथा यांनी आपले लक्ष शाळांची उभारणी, आवश्यक तेथे पुनर्बांधणी यावर केंद्रित केले.

गुजरातमधील भूकंपप्रवण भाग :

क्र .	जिल्हे	तालुका	गावांची संख्या
१.	कच्छ	बछाव	७६
२.		भूज	७५
३.		अंजर	७६
४.		रापर	५१
५.		मांडवी	१६
६.		मुंद्रा	३१
७.		नलिया	०२
८.		नखलाना	१८
९.		गांधीधाम	०३
१०.	राजकोट	मलिया	४६
११.		मोर्बी	४५
१२.		तंकारा	०५
१३.	सुरेंद्रनगर	हलवाड	०२
१४.		लिम्डी	०१
१५.	जामनगर	जोडीया	२२
		एकूण	४६९

भारतीय जैन संघटनेचा शाळा उभारणीचा उपक्रम :

लातूरच्या अनुभवाप्रमाणे, मुलांना सुरक्षित वातावरण ठेवण्यासाठी, मानसिक ताण-तणावातून बाहेर काढण्यासाठी शाळेची पुनर्उभारणी करणे महत्त्वाचे आहे, असे श्री. मुथा यांनी ठरविले.

सामखियारी शाळांच्या इमारतींची पाहणी त्यांनी केली आणि त्वरित पुनर्बांधणीच्या कार्याला प्रारंभ केला. श्री. धनराज चोप्रा आणि श्री. तेजमल गांधी यांच्या सहकार्याने कामकाज हाती घेतले. बांधकामाचे साहित्य अहमदाबादहून आणणे गरजेचे होते. त्याचबरोबर श्री. मुथा यांनी मुलांच्या पालकांबरोबर, गावकऱ्यांबरोबर चर्चा सुरू केली व मुलांना शाळेत पाठविण्याची विनंती केली. जेणेकरून मुलांना मानसिक धक्क्यातून बाहेर येऊन शाळेतील अभ्यास, खेळ व इतर गोष्टींवर लक्ष केंद्रित होईल.

आपत्तीनंतर तेराव्या दिवशी सामखियारी येथील शाळा सुरू करण्यात आली. हिंदू परंपरांप्रमाणे घरात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर बारा दिवस दुखवटा पाळला जातो. पण तेराव्या दिवसापासून सर्व कामकाज पूर्ववत सुरू करण्यात येते.

या शाळेच्या उद्घाटनासाठी महाराष्ट्रातून श्री. सुरेशदादा जैन यांना पाचारण करण्यात आले. श्री. सुरेशदादा जैन यांनी श्री. मुथा यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा तर केलीच पण, ५०० शाळा उभारणीसाठी मदत करण्याचे जाहीर केले. त्यासाठी त्यांनी "जळगाव-खानदेश शैक्षणिक पुनर्वसन ट्रस्ट" ची स्थापना केली. आणि सुमारे ४ कोटीच्या आसपास मदत त्यांनी शाळा उभारणीसाठी दिली.

लातूरमध्ये भूकंप झाल्यानंतर तेथील मुलांना पुण्यात आणून त्यांचे शैक्षणिक पुनर्वसनाचा मोठा प्रकल्प वाघोली येथे आणून भारतीय जैन संघटनेने राबविला. परंतु गुजरातमधून मुलांना पुण्याला हलविणे शक्य नव्हते. कारण वेळ खूप लागणार होता.

त्यापेक्षा गुजरातमधील शाळांचे सर्वेक्षण करून, आवश्यकतेनुसार इमारत बांधणीचा आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्याचे ठरविण्यात आले.

६२६ गावांमध्ये कार्यकर्ते पोचले, तेथील सर्व शाळांचे परीक्षण केले. कोणत्या गावातील किती शाळा पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत.

भारतीय जैन संघटनेच्या शाळांमुळे गुजरातची भावी पिढी उभी राहिली.

गुजरातमध्ये सर्व्हे करण्यात आला की, किती गावातल्या शाळा पूर्ण पडलेल्या आहेत व त्या शाळेमधल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, तिथली परिस्थिती कशी आहे. मुख्याध्यापक, शिक्षक कोण आहेत, किती आहेत अशा सर्व प्रकारच्या माहितीचा एक तक्ता तयार करण्यात आला होता. गुजरातच्या भूकंपात पाच-सहाशे गावं आपद्ग्रस्त होती. त्याची भयानकता इतकी मोठी होती की विचार करणेही अतिशय अवघड होते. जेव्हा श्री. शांतिलाल मुथा यांनी सर्व गावातील माहिती एकत्र करून त्यातून निष्कर्ष, अनुमान काढले, तेव्हा असे ध्यानात आले की, जवळपास पाचशे गावामधल्या शाळा पडलेल्या आहेत. हा अहवाल पुस्तकरूपात छापून घेतला. जवळपास दीड-दोन लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी त्यामुळे शाळेपासून वंचित राहणार होते. त्यांच्या शाळा पूर्णपणे पडल्या होत्या. ही संख्या इतकी मोठी होती की यांना पुणे येथे घेऊन जाणे शक्य नव्हते.

जबलपूरमध्ये भूकंप झाल्यानंतर तेथील मुलांना महाराष्ट्रातील बीजेएसच्या WERC येथील शैक्षणिक पुनर्वसन केंद्रात आणण्यात आले होते. परंतु परराज्यातील शिक्षण पद्धती, भाषा, पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रम यामध्ये व महाराष्ट्रातील क्रमिक पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रम, भाषा यांमध्ये फार फरक होता. त्यामुळे

परराज्यातून मुलांना आणून शिक्षण देण्यामध्ये त्यांच्या राहण्या-खाण्या पिण्याच्या आवडींपासून सर्वच गोष्टींमध्ये फार अडचणी उभ्या ठाकतात असा अनुभव होता.

या अनुभवामुळे गुजरातची मुले पुण्याला आणणे अशक्य आहे असे वाटत होते. शिवाय त्यांची संख्याही खूप मोठी होती.

गुजरात सरकारचा शाळा बंद करण्याचा निर्णय :

गुजरात सरकारने, तत्कालिन मुख्यमंत्री श्री. केशुभाई पटेल यांनी गुजरातमधील भूकंपग्रस्त भागातील सर्व शाळा बंद करण्याचा व सर्व मुलांना पुढच्या वर्गात पाठविण्याचा निर्णय घेतला.

साधारणपणे सहा-सात महिने शाळा बंद राहणार होत्या. यातून मुलांचे किती नुकसान होणार होते, याची चिंता श्री. शांतीलाल मुथांव्यतिरिक्त कोणीही केली नाही.

गुजरातमध्ये शाळा उभारणीचा महत्त्वाकांक्षी निर्णय :

मुलांबद्दलच्या काळजीतून शांतीलाल मुथांनी सर्व शाळा उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. त्याप्रमाणे ६१४ प्राथमिक व माध्यमिक शाळा उभारणीची गरज असल्याचे लक्षात आले. १४६८ खोल्या व १,३२,३३९ विद्यार्थ्यांची सोय होणे गरजेचे होते. भूकंपनिरोधक व वादळविरोधक बांधकाम करण्याचे बीजेएसने ठरविले होते. आर्किटेक्ट श्री.बी.व्ही. जोशी, केशव देसाई आणि श्री. शिरीष बर्वे यांनी शाळांच्या इमारतींचा आराखडा तयार करून दिला. हा आराखडा एका विशिष्ट पद्धतीने बनविला होता की, इमारत भूकंपनिरोधक, लाईटवेट व चक्रीवादळ रेजिस्टंट असेल.

Word of praise for Bharatiya Jain Sanghatana by

Shri. Atal Bihari Vajpayee

Speech of Shri. Atal Bihari Vajpayee on the occasion of handing over 368 schools constructed by Bharatiya Jain Sanghatana in the earthquake stricken of Gujarat in 2001. *"I would like to congratulate Bharatiya Jain Sanghatana on this occasion. In this situation after the massive earthquake, they have organized all required resources and have done an excellent job only with a view to provide social service. They have constructed 368 schools and handed them over to the people. You can now see these schools coming up but still there is a lot of work to be done. I am sure that you will continue with this job with the same dedication. Please accept my best wishes and many thanks for this accomplishment."*

भारताचे तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. अटल बिहारी वाजपायी यांच्या शब्दात बी.जे.एस्.चे काम

Parliament discusses activities of BJS in LOK SABHA

LOK SABHA

SYNOPSIS of DEBATES
(Proceedings other than Questions & Answers)

Monday, November 28, 2005 / Agrahayana 7, 1927 (Saka)

REFERENCE BY SPEAKER

STATEMENT BY THE MINISTER OF STATE IN THE MINISTRY OF HOME AFFAIRS

(EXCERPTS)

(i) Re: Relief and rehabilitation in the aftermath of Jammu and Kashmir earthquake

The Non Governmental Organization have also rendered support in providing shelter to the earthquake affected persons of J&K. Bhartiya Jain Sangathan (BJS) has donated 870 prefabricated structures which are to be erected in the earthquake affected areas of J&K, particularly in Uri and Tangdhar. The first consignment of 245 pre-fabricated structures was delivered to the State Government of Jammu on 12th November, 2005 and has already been transported by the State Government to Tangdhar. The second consignment of 277 pre fabricated strictures was delivered at Jammu on 21-11-2005 and the third consignment of the remaining 348 pre fabricated structures will be dispatched to the State Government by 30th November 2005. These pre-fabricated structures will be erected at four locations in Tangdhar and one location in Uri where households were required to be relocated because of their vulnerability to landslides/avalanches.

F. No. BJS/QIP/Edn/05/

अण्डमान तथा निकोबार प्रशासन

ANDAMAN AND NICOBAR ADMINISTRATION

शिक्षा निदेशालय

Directorate of Education

MEMORANDUM OF UNDERSTANDING

This Memorandum of Understanding is signed on this day of 18th July, 2005 between the Department of Education, Andaman & Nicobar Administration *(hereinafter referred to as ED-AN)* situated at VIP Road, Port Blair.

AND

Bharatiya Jain Sanghatana, an NGO *(hereinafter referred to as BJS)* having its head office at 106/1-A, Senapati Bapat Road, Pune 411016.

Preamble:

The Tsunami disaster occurred on the 26th December 2004 left behind indelible marks of destruction and devastation in terms of lives and property in the Andaman and Nicobar Islands.

Many national and international NGOs have shown interest in extending assistance in the tasks of rapid rehabilitation and reconstruction of the damaged school buildings and have started their works of construction.

The statistics show that the literacy rate in Andaman & Nicobar is quite high at around 81%, but the Department of Education still intends to enhance the literacy rate and more specially, raising the level of quality of education.

WHEREAS, B.J.S., an NGO of great repute, having credible experience, engaged in the disaster management of Andaman & Nicobar Islands has focused its attention in the construction of schools and is also intending to

For Bharatiya Jain Sanghatana

President

शिक्षा निदेशक
DIRECTOR OF EDUCATION
अ० तथा नि० प्रशासन
A & N ADMINISTRATION
पोर्ट ब्लेयर
PORT BLAIR

अंदमान निकोबार प्रशासनाबरोबरचा बी.जे.एस्.चा सामंजस्य करार

भूकंपग्रस्त भागाची पाहणी करताना श्री. मुथ्था व श्री. पारख

Smt. Sonia Gandhi at the flag-off ceremony of
500 boys from J&K to Pune 2005

भूकंपग्रस्त ५०० मुलांना जम्मु काश्मिर मधून
श्रीमती सोनिया गांधी निरोप देताना





जम्मु-काश्मिरमधील भूकंपानंतर मुलांचे स्थलांतर वाघोली शैक्षणिक केंद्रात होताना

जम्मु-काश्मिर प्रशासनाबरोबर चर्चा, पुनर्वसनाची तयारी
व शाळाबांधणीची पूर्तता





अंदमान निकोबारमधील त्सुनामीनंतरचे मदतकार्य
प्रमुख आयोजक 'श्री. प्रफुल्ल पारख'







मा. चंद्रशेखर यांची लातूर भूकंपग्रस्त मदतकेंद्रास भेट



लातूर भूकंपानंतर आपत्तीग्रस्त मुलांचे वाघोली शैक्षणिक पुनर्वसन केंद्रात आगमन



श्री. शांतीलाल मुथ्था मान्यवरांशी चर्चा व ३६८ शाळांचे हस्तांतरण करताना

अपेक्षित खर्च :

प्रत्येक खोली ३८४ स्के. फूटाची व तिचा खर्च ९९,८००/- त्यामुळे संपूर्ण "गुजरात शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचा खर्च" १४ कोटी अपेक्षित होता.

नो-ऑब्जेक्शन सर्टिफिकेट :

स्थानिक गावकरी, सरपंच, शिक्षक, मुख्याध्यापकांच्या सहकार्याने व पालकांच्या संमतीने शाळा उभारणीची परवानगी बीजेएसने मिळवली आणि एक लेखी नो-ऑब्जेक्शन सर्टिफिकेट त्यांच्याकडून घेतले की गुजरातमधील शाळांचे जेव्हा पक्के बांधकाम पूर्ण होईल तेव्हा बीजेएसचे शाळांचे तात्पुरते बांधकाम बीजेएसला परत द्यावे.

अर्थसाहाय्य उभारणी :

एवढ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला तात्काळ अर्थसाहाय्याची गरज भासणे अगदी अपरिहार्य होते. त्यामुळे बीजेएसने आपल्या समाजाकडे वर्ग, शाळा, स्पॉन्सर करण्याविषयी विनंती केली. त्या त्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तेथे दानशूर व्यक्तीचे, स्पॉन्सररचे नाव देण्यात येई. बीजेएसच्या आवाहनाला वृत्तपत्रे व राजकीय पक्षांकडून अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. शरद पवार यांनी बछाव येथे भेट दिली. जवळपास ४ तास चर्चा करून त्यांनी बीजेएसच्या कार्याची व प्रकल्पाची माहिती घेतली. बीजेएसच्या शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाच्या माहितीने त्यांना अतिशय चांगले वाटले व त्यांनी गरवारे क्लबचे वतीने ५० लाखाची मदत जाहीर केली.

प्रत्यक्ष बांधकामासाठी आवश्यक असणारी ४४ जणांची टीम प्रमोटर्स आणि बिल्डर्स असोसिएशन पुणे येथून पाठविण्यात

आली. पुणे, मुंबई व जळगावहून कंत्राटदार व मजुरांचा गट पाठविण्यात आला.

याप्रकारे अतिशय कठीण परिस्थितीमध्ये, अडचणींमध्ये ३६८ शाळांची उभारणी बीजेएसने श्री. शांतिलाल मुथांच्या अध्यक्षतेखाली केली, तेही अवघ्या ९० दिवसांमध्ये!

शाळांची पुनर्बांधणी म्हणजे मुलांच्या भविष्याची उभारणी

हेच ध्येय शांतीलालजींनी आपल्या उराशी बाळगले होते व ते पूर्ण करून, यशस्वी करून दाखवले. त्यासाठी ते सहा महिने एका साध्या टेन्टमध्ये राहिले. आंघोळीसाठी एक कि.मी. अंतर चालत जावे लागे. अत्यंत सर्वसामान्य पद्धतीने राहून त्यांनी गुजरातमध्ये शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिदर्शी, दूरदर्शी, धोरणात्मक पाऊल उचलले. आपत्तीसारख्या कठीण प्रसंगी अतुलनीय धैर्याने उचललेले पाऊल, पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात आणून दाखविले, ही खरोखरीच इतिहासात नोंद घेण्याजोगी गोष्ट आहे.

सकाळ, सामना, लोकमत अशा सर्वच वर्तमानपत्रांनी त्यांचे निधी भारतीय जैन संघटनेला देऊ केले. सर्व कार्याची पाहणी करून काही शाळांचे उद्घाटन श्री. शरद पवार साहेबांच्या हस्ते झाले. काही शाळांचे उद्घाटन श्री. उद्धव ठाकरेंच्या हस्ते झाले. तीन महिन्यात ३६८ शाळा उभ्या करून १००५ वर्गखोल्यांमध्ये एक लाख वीस हजार मुलांना शाळेत बसविण्याचं स्वप्न प्रत्यक्षात साकार झालेले होते.

शाळांचे हस्तांतरण :

भारताचे तत्कालिन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी व श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी भूकंपग्रस्त भागाचा दौरा केला. त्या दौऱ्यामध्ये ३६८ शाळा गुजरात सरकारकडे हस्तांतरित करण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला. बच्छाव येथे झालेल्या या भव्य कार्यक्रमात ३६८ शाळांची कागदपत्रे पंतप्रधानांच्या हस्ते

मुख्यमंत्र्यांना सुपुर्द करण्यात आली. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या भाषणात बीजेएसच्या कार्याचा खूपच गौरव केला.

गुजरात आपत्तीतून मिळालेले धडे :

गुजरात सरकारने सहा-सात महिन्यांची सुटी जाहीर करताना कोणतीही धोरणात्मक बाजू ध्यानात घेतली नाही. मुलांच्या मानसिकतेवर, शैक्षणिक दर्जाविषयी कोणते नुकसान होऊ शकते व ते टाळणे कसे आवश्यक आहे, त्यासाठी वेगवेगळ्या पर्यायांची चाचपणी करणे तर दूर पण शाळाच बंद करून मुलांचे मोठे नुकसान होणार होते. बीजेएसने या निर्णयाला विरोध करून, शाळांची त्वरित पुनर्बांधणी केली. अवघ्या तेराव्या दिवशी शाळा सुरू केली, तेव्हा शाळेतील मुलांची संख्या होती पाचशे! सरकारचा निर्णय, धोरण किती चुकीचे होते हे बीजेएसने प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.

कोणत्याही मदतकार्यामध्ये किंवा प्रकल्पांमध्ये शासन व अशासकीय संस्थांचे ५०-५०% सहभाग असणे गरजेचे आहे. पैशाच्या स्वरूपात आपत्तीग्रस्तांना मदत दिली जाते. पण त्या पैशाचा विनियोग योग्य कारणासाठी होत आहे ना, याची देखरेख मात्र कोणी करीत नाही. अशा वेळी सरकारने प्रत्यक्ष पैशाची मदत गरजेपुरती करून घरे, साहित्य, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा योग्य प्रकारे करण्यात यावा. कधी कधी गावांतील लोकसंख्या आपत्तीनंतर अचानक वाढते. त्यामुळे गावकऱ्यांव्यतिरिक्त, आपत्तीग्रस्तांव्यतिरिक्त दुसरेच लोक येऊन मदतीचा फायदा मिळवतात.

गुजरात सरकारने असे जाहीर आश्वासन दिले की, अशासकीय संस्थेबरोबर ५०-५०% भागीदारी करून पडलेल्या शाळांचे बांधकाम पूर्ण करू. ठरल्यानुसार बीजेएसने सर्व शाळांचे

बांधकाम सुरु केले. त्यानुसार मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री व अर्थमंत्री म्हणाले होते की, ५०% पैसे बीजेएसला देण्यात येतील. पंतप्रधानांच्या हस्ते शाळा हस्तांतरणाचा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमातही मुख्यमंत्र्यांनी या गोष्टीचा पुनरुच्चार केला. तरीही सरकारने बीजेएसला पैसे दिले नाहीत!

यापेक्षाही मोठी चूक सरकारने केली, ती म्हणजे, जेथे जेथे बीजेएसने शाळा बांधल्या, सरकारला हस्तांतरित केल्या, तेथे शाळा बांधण्यासाठी सरकारने वृत्तपत्रांत जाहिरात देऊन टेंडर मागविले. याचा अर्थ ते कंत्राटदाराला १००% पैसे देणार, बीजेएसने सरकारच्या नियमित आराखड्यानुसार, प्रीफॅब्रीकेटेड मटेरिअलनुसार, सरकारी नियमानुसार, कोणतेही पैसे न घेता शाळा बांधूनही तेथे पुन्हा शाळा बांधण्याचा सरकार प्रस्ताव मांडते! यासर्वांविरुद्ध बीजेएसने हायकोर्टात रिटपिटीशन दिले. हायकोर्टात ही केस काही वर्षांपर्यंत चालली. हायकोर्टाने पुन्हा सरकारकडे केस पाठविली. सरकारपुढे पुन्हा प्रेझेंटेशन झाले. ती केस अजूनही पेंडींग आहे.

बीजेएससारख्या एवढ्या मोठ्या, अनुभवी व भारतभर कार्यरत असणाऱ्या संघटित संस्थेला अशा अनुभवांना तोंड द्यावे लागावे ही निश्चितच विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

वटवृक्षाकडे थकले भागले वाटसरू आधार म्हणून आश्रय घेतात, सर्वच वाटसरूंना सावलीचा आधार नको असतो, काहींना त्याच्या फांद्या स्वत:च्या स्वार्थासाठी तोडायच्या असतात. वटवृक्ष मात्र या सर्व प्रकारच्या वाटसरूंचे तटस्थतेने निरीक्षण करीत, ऊन, पाऊस, वादळवारा सहन करीत, आपले कर्तव्य बजावीत असतो! आपत्तीनंतर कोणकोणती पाऊले उचलली पाहिजेत? कशाप्रकारे नियोजन असावे?

आपत्तीच्या वेळी एक खिडकी योजना राबवली पाहिजे व निर्णय प्रक्रियेतील दिरंगाई टाळली पाहिजे. रेव्हेन्यू डिपार्टमेंटमध्ये कागदपत्रे पूर्ततेसाठी व निर्णयप्रक्रियेसाठी विशिष्ट स्टाफ राखीव असला पाहिजे, प्रशिक्षित असला पाहिजे. आपत्ती जेव्हा येईल, तेव्हा या प्रशिक्षित स्टाफला सरकार व अशासकीय संस्थांबरोबर काम करण्यासाठीचे आदेश असले पाहिजेत.

बीडब्ल्यूडी, अर्थविभाग, आरोग्य विभाग, रेव्हेन्यू डिपार्टमेंट यांच्यामध्ये आपत्ती दरम्यान होत असलेल्या मदतकार्याविषयी कोणतेही सामंजस्य नव्हते. या सर्व विभागांचे सामंजस्य, सहकार्य, तत्परता, दिरंगाई टाळणे या गोष्टींची मदतकार्य जोमाने होण्यासाठी गरज आहे.

वेगवेगळ्या अशासकीय संस्थांना कोणकोणती कामे दिली गेली पाहिजेत, त्यांच्याकडून कोणत्या वेळी कोणती मदत घेतली पाहिजे या सर्व गोष्टींची आपत्तीसाठी म्हणून सरकारकडे एक वेगळी नियमावली तयार असली पाहिजे.

आपत्तीनंतर पाऊस येतो, वादळे होतात, काहीही होऊ शकते. संसर्गजन्य रोग फैलावण्याची शक्यता असते. अशा रोगांना वेळीच आटोक्यात आणणे फार गरजेचे असते. रोग प्रतिबंधक औषधांची फवारणी करणे अतिशय गरजेचे असते. त्याचप्रमाणे मेडिकल कँपस्ची सर्वात जास्त गरज असते. आपत्तीग्रस्तांसाठी औषधोपचार, हॉस्पिटल्सची सुविधा त्वरेने मिळणे फार गरजेचे असते. त्यासाठी आपत्ती कोसळलेल्या गावांमध्ये त्वरित अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज दवाखाना किंवा हॉस्पिटल्सची तात्पुरती उभारणी करून, डॉक्टर्सची नेमणूक करून लोकांना

वेळीच उपचार दिले पाहिजेत. ॲम्ब्युलन्सची सोय उपलब्ध करून दिली पाहिजे.

भारतातील बऱ्याचशा विमानतळांवर नाईट लँडींगची सोय नाही, अशा कठीण काळात या सोयी असणे गरजेचे आहे. एखाद्या ठिकाणी दोन गावांना जोडणारा पूल कोसळला तर दुसरा कोणता मार्ग उपलब्ध करून देता येईल, अशा गोष्टींचा अभ्यास, नियोजन यामध्ये होणे गरजेचे आहे.

मोबाईल, फॅक्स, प्रिंटर, कॉम्प्युटर, इंटरनेट या अत्याधुनिक सुविधांच्या साहाय्याने त्वरित दळणवळण व संपर्क साधला गेला पाहिजे. त्यासाठी या सर्व सुविधांची उपलब्धी असणे गरजेचे आहे. बीजेएसने एक अशासकीय संस्था असूनही संपूर्ण नियोजन, सुसूत्रतता, अत्याधुनिक यंत्रणा व गावोगावच्या संपर्कमाध्यमातून आपत्तीनिवारणाचे, अवाढव्य मदतकार्याचे फार मोठे आव्हान पेलले. अनेक अडचणींना तोंड दिले.

शाळांचे बांधकाम करताना मजूर उपलब्ध नसायचे. बांधकामाचे साहित्य उपलब्ध नव्हते. त्यामुळे बीजेएसला पुण्याहून बांधकाम साहित्य व मजुरांना न्यावे लागले. बांधकामासाठी मशिनरी उपलब्ध नव्हत्या. रात्रीच्या वेळी साहित्य चोरी होत असे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाणी व विजेची सोय बांधकामाच्या ठिकाणी नव्हती. बीजेएसला जनरेटर विकत घ्यावे लागले. खरे तर, सरकारने पाणी व विजेसारखी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असते पण मदतप्रसंगी सरकारने दुर्लक्षच केल्याचे हे एक उदाहरण आहे.

अशाही परिस्थितीत बीजेएसने ३६८ शाळांचे केवळ ९० दिवसांमध्ये बांधकाम करून त्या सर्व शाळा सरकारकडे हस्तांतरित केल्या.

सव्वा लाख मुलांच्या शाळा सुरू झाल्या. मुले आपत्तीसारख्या कठीण परिस्थितीतून, मानसिक धक्क्यातून सावरून शाळेत येऊन बसू लागली. या लहान लहान बालकांचे पुन्हा शाळांमध्ये येणे, खेळणे, अभ्यास करणे, गोंगाट, मस्ती करणे, हसणे, बागडणे पाहून बीजेएसच्या सर्व कार्यकर्त्यांचे, श्री. शांतीलाल मुथांचे मन आनंदाने, उत्साहाने, अभिमानाने भरून आले.

मुलांच्या डोळ्यांमध्ये अश्रूंच्या जागी पाहिलेल्या हसूच्या फुलांमध्ये गुजरातच्या संपूर्ण कार्याचे यश सामावलेले आहे. एवढेच नव्हे तर एका संपूर्ण पिढीचे भवितव्य बीजेएसने आपल्या कार्यातून घडविले आहे. श्री. शांतीलाल मुथा यांचे करारी धोरण, दूरदृष्टी व चिकाटीने कार्य करण्याची वृत्ती ही मुलांचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्यासाठी कारणीभूत ठरली, हेच या यशातून सिद्ध होते.

बीजेएसच्या कार्याचा गौरव :

भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे हस्ते ३६८ शाळांचे केवळ ९० दिवसांमध्ये गुजरात सरकारकडे हस्तांतरण.

पंतप्रधानांचे मुक्त कंठाने बीजेएसच्या कार्याबद्दल प्रशंसोद्‌गार.

युनिसेफचे मुख्य श्री. पिटर यांनी म्हटले की, "बीजेएसचे कार्य म्हणजे केवळ चमत्कार होय! बच्छावमध्ये बीजेएसने अत्यंत मोलाचे कार्य केले आहे." राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री. शरद पवार शैक्षणिक पुनर्वसनाच्या कार्याबद्दल अतिशय समाधानी व आनंदी होते. त्यांनी या कार्यासाठी पैशाच्या रूपाने मदत जाहीर केली.

आनंदीबेन पटेल, गुजरात शिक्षणमंत्री, यांनी बीजेएसने केलेल्या मदतकार्याबद्दल व शैक्षणिक प्रकल्पाविषयी अतिशय प्रशंसा केली.

गुजरात भूकंपादरम्यान ज्या कार्यकर्त्यांनी मदत केली त्यांची नावे :

अ. क्र.	कार्यकर्त्याचे नाव	अ-क्र.	कार्यकर्त्याचे नाव
१.	श्री. शांतीलालजी मुथा	१३.	श्री. नीलमचंदजी पुंगलिया
२.	श्री. प्रकाशचंदजी सुराना	१४.	श्री. प्रदीपजी जैन
३.	श्री. सुदर्शनजी जैन	१५.	श्री. सुभाषजी आँचलिया
४.	श्री. महेशजी कोठारी	१६.	श्री. अजित पाटील
५.	डॉ. पारसजी बोरा	१७.	श्री. अरविंद पाटील
६.	श्री. चंदनमलजी बाफना	१८.	श्री. घोडके
७.	श्री. गौतमचंदजी संचेती	१९.	श्री. भारगंडे
८.	श्री. हस्तीमलजी बम्ब	२०.	श्री. वाय. टी. भोसले
९.	श्री. अभयजी सेठीया	२१.	श्री. ए.जे. यादवाडकर
१०.	श्री. दीपकजी पारेख	२२.	श्री. एल.बी. गिरी
११.	श्री. कांतीलालजी ओसवाल	२३.	श्री. जी. के. वाढे
१२.	श्री. लालचंदजी चोरडीया	२४.	श्री. आर.एम. इंगळे

बांधकाम पूर्ण केलेल्या शाळांचा तक्ता :

क्र.	तालुका	गावांची संख्या	शाळांची संख्या	खोल्यांची संख्या	विद्यार्थी संख्या
१.	बच्छाव	१४	३४	११०	८७४९
२.	भूज	३५	६२	२०६	१८७७४
३.	अंजर	१३	४२	१२२	४५२५
४.	रापर	०६	१३	३०	३११९
५.	मांडवी	११	१९	३४	२१०६
६.	मुंद्रा	१८	४७	५८	६५१०
७.	नलिया	०२	०७	१२	१०५६
८.	मखयाना	१०	१५	२८	२६९६
९.	गांधीधाम	०२	२३	१६२	१४३९८
१०.	मलिया	३०	४५	१०८	९०११
११.	मोर्बी	२६	५३	९०	९५३२
१२.	लिम्डी	०१	०८	४४	३७२५
	एकूण	१६८	३६८	१००४	८४२०१

☆☆☆

७. त्सुनामीचे तांडव: तामिळनाडू, अंदमान-निकोबारमध्ये धाव

त्सुनामीचे भयप्रद तांडव :

२६ डिसेंबर २००४ रोजी इंडोनेशियातील सुमात्राबेटाजवळ ९.० रिश्टर स्केलचा प्रचंड भूकंप झाला. समुद्रतळाशी झालेल्या भूकंपाने ताशी ५०० ते १००० कि.मी. वेगाने प्रचंड लाटा उसळल्या. अवघ्या काही तासांतच त्सुनामी लाटांमुळे भारत, इंडोनेशिया, श्रीलंका, थायलंड, मलेशिया, मालदीव, म्यानमार, बांगलादेश, सोमालिया, टांझानिया आणि केनियाचे समुद्रकिनारे गिळंकृत केले. घरेदारे, वृक्षवल्ली सर्व काही उद्ध्वस्त झाले. सुमारे तीन लाख लोक मृत्युमुखी पडले.

त्सुनामीचा प्रहार भारताच्या पूर्व किनाऱ्यावर जास्त होता. त्यात अंदमान-निकोबारची ३८ निसर्गरम्य बेटे, तमिळनाडू, पाँडेचरी, केरळ व काही प्रमाणात आंध्रप्रदेशचा समावेश होतो. काय होते आहे हे समजण्याच्या आत, सर्व उद्ध्वस्त होत गेले. समुद्रकिनारी असलेले लोक वेगाने समुद्रात ओढले जात होते. ज्यांना शक्य होते, ते जीव वाचविण्यासाठी टेकडीकडे पळत सुटले. भराभर

सगळीकडे त्सुनामीतून निर्माण झालेल्या भयंकर आपत्तीच्या बातम्या प्रसृत व्हायला लागल्या. भारतीय जैन संघटनेच्या पुणे येथील मुख्यालयातही श्री. शांतीलालजी मुथा यांच्यापर्यंत बातमी पोहोचली. त्यांनी तात्काळ भारतातील जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधला आणि मदतकार्यासाठी तिकडे जाण्याची योजना आखली.

भारतीय जैन संघटनेचे कार्य :

श्री. शांतीलाल मुथा व सहकारी कार्यकर्ते त्वरित चेन्नईला रवाना झाले. घटनेची तीव्रता इतकी प्रचंड होती की, विचार करायलादेखील उसंत नव्हती. आपत्तीग्रस्तांची सुटका, पुनर्वसन व मदतकार्य करण्यासाठी सर्वप्रथम सहा ठिकाणी तेथील स्थानीक जैन लोकांनी तंबू ठोकलेले होते. सिरकाली, चिदंबरम्, कराईकल, कुंभकोनम्, कुड्लोर, पाँडेचरी. यातील सिरकाली हे ठिकाणी इतर एकवीस गावांसाठीचे मध्यवर्ती मदत केंद्र म्हणून निवडले गेले. आपत्तीग्रस्तांना अन्न पाकिटे, पिण्याचे पाणी पुरवण्याचे कार्य प्रथम सुरू केले. औषधोपचार, अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा, अन्न बनविण्यासाठी जागेची पाहणी करण्यात आली. निवाऱ्यासाठी दोनशे तंबूंची त्वरित उभारणी केली. याशिवाय झोपडी बांधण्यासाठी आर्थिक मदत कार्यकर्त्यांनी दिली. कामाची व्याप्ती प्रचंड होती. जीवितहानी जास्त झाल्यामुळे घटनेची तीव्रता वाढली होती. मृतदेहांची विल्हेवाट लावणे हे सर्वांत महत्त्वाचे काम होते. पण त्याबरोबरच जंतूसंसर्ग, संसर्गजन्य रोग रोखण्यासाठी प्रयत्न करणेही गरजेचे होते. त्यासाठी ब्लिचिंग पावडरची फवारणी करण्यात आली.

अन्न बनवून अन्नपुरवठा करण्यासंबंधीची सर्व व्यवस्था जैन समाजाच्यावतीने करण्यात आली. वीस वर्षातील संघटनेच्या अनुभवातून, सर्व साहित्यसामुग्री उपलब्ध असल्याने, संघटनेतर्फे

या गोष्टींची त्वरित अंमलबजावणी केली गेली. जीवनावश्यक वस्तूंचे साहित्य एकत्र करून किट तयार करण्यात आले, यात भांडी, मेणबत्ती, अंथरुण पांघरुण, कपडे, काडेपेटी, साखर, चहापावडर, अन्नधान्य व हे किट वाटप करण्यात आले.

शाळा उभारणीसाठी प्रयत्न :

५०० मुलांचे व त्यांच्या पालकांचे शाळा सुरू करण्याबाबतचे संमतीपत्र, त्यांच्याच भाषेत, संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मिळवले. मदत वाटपाचे काम सुरळीतपणे सुरू झाल्यानंतर श्री. मुथा यांनी लहान मुलांच्या शाळेच्या प्रश्नाकडे आपले लक्ष केंद्रित केले. त्याप्रमाणे त्यांनी श्री. प्रफुल्ल पारेख यांना चेन्नईला बोलावून घेतले व पुढच्या कार्याच्यादृष्टीने आखणी सुरू केली. संपूर्ण उद्ध्वस्त झालेल्या शाळा किती, काही प्रमाणात उद्ध्वस्त झालेल्या शाळा किती व दुरुस्तीच्या शाळा किती याचा पाहणी अहवाल तयार केला.

५०० मुले शाळा पुन्हा सुरू करण्यात याव्यात यासाठी तयार होते. अशा प्रकारे शाळांचा पाहणी अहवाल, ५०० मुलांचे संमतीपत्र व संघटनेतर्फे केल्या जाणाऱ्या कार्यासंबंधीची बारकाईने माहिती, अशी सर्व कागदपत्रे तमिळनाडूसरकारकडे, शाळा बांधणीचा प्रस्ताव म्हणून सादर करण्यात आली. यासाठी चेन्नईतील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचीही संमती होती, इतकेच नव्हे तर जैन संघटनेने चेन्नईमध्ये शाळेसाठी जमीनही देण्याचे मान्य केले होते. जयललितांशी भेट श्री. शरद पवारसाहेबांनी घडवून आणली. या सर्व गोष्टींसंबंधी विस्तृत चर्चा तत्कालिन मुख्यमंत्री जयललितांशी करण्यात आली. परंतु त्यांनी "शाळा बांधण्याचा प्रस्ताव नाकारला." त्यांचे म्हणणे होते, "पैसे द्या. शाळा नको." श्री. शांतीलाल मुथा, श्री. प्रफुल्ल पारेख व कार्यकर्त्यांनी तरीही यासाठी प्रयत्न केले. पण तमिळनाडूसरकार आपल्या निर्णयावर

ठाम होते. शेवटी निराश स्थितीतच श्री. मुथा चेन्नई विमानतळावर, २० जानेवारी २००५ रोजी पुण्याच्या परतीच्या प्रवासासाठी आले.

जयललीतांची भेट पवारसाहेबांनीच घडवून आणली :

विमानतळावर श्री. मुथा यांची राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. शरद पवार व राज्यपाल श्री. राम कापसे यांची भेट झाली. श्री. पवारसाहेबांनी, "अंदमान-निकोबारही तेवढेच आपत्तीग्रस्त आहे व तेथेही मदतीची तात्काळ गरज आहे. तिथे तुम्ही शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी करा," असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी श्री. राम कापसे, तत्कालिन गव्हर्नर, अंदमान निकोबार यांना शाळांचा प्रस्ताव मान्य करण्यास सांगितले.

श्री. मुथा यांनी आपल्या पुढील कार्याची दिशा, अंदमान-निकोबार हीच ठरवली. भारतीय जैन संघटना इथून पुढच्या एक-दीड वर्षात अंदमान-निकोबारमधील शिक्षण व आरोग्यक्षेत्रात क्रांती घडवणार होती, हे नियतीलाही माहिती नसेल!

अंदमान-निकोबारमधील कार्य :

अंदमान-निकोबारमधील बेटांचा समूह हा भारताचा केंद्रशासित प्रदेश होय! इथे लोकनियुक्त प्रतिनिधींची सत्ता नाही, तर सरकारनियुक्त राज्यपाल व अधिकारी कामकाज पाहतात. त्यामुळे कोणतेही निर्णय इथे सरकारी पद्धतीनेच पार पडतात! अशासकीय संस्था सरकारी कार्यामध्ये मदत, सहकार्य करू शकतात, हेच इथल्या सरकारी अधिकाऱ्यांना आतापर्यंत माहित नव्हते! मुळातच एवढी मोठी आपत्ती कोसळण्याची ही पहिलीच वेळ! त्यातही अंदमान निकोबारमधील बेटे एकमेकांपासून दूर अंतरावर बराचसा प्रदेश आदिवासींच्या अंमलाखाली. सरकारव्यतिरिक्त इथे निर्णय होतात ते आदिवासी कौन्सिलमार्फत.

एकंदरीत अशा वातावरणात, मुख्यभूमीपासून दूर अंतरावर राहूनही मदतकार्य करणे, अन्नपुरवठा, कपडेवाटप, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करणे यासारख्या गोष्टी पार पाडल्या. पण मुख्य कार्य संघटनेला पार पाडायचे होते ते म्हणजे शाळांची उभारणी व प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी.

शाळा उभारणीमागील श्री. मुथा यांची भूमिका :

आपत्तीच्या वेळी सरकारची प्रमुख कामे म्हणजे रस्ते, पिण्याच्या-वापरण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज, अर्थ साहाय्य करणे, अन्नधान्य पुरवणे, निवाऱ्याची व्यवस्था करणे हे होत. याशिवाय आकडेवारी तयार करणे. जिल्हानिहाय, तालुकानिहाय, गावनिहाय आपत्तीग्रस्तांसंबंधीचा अहवाल, आकडेवारी सरकारदरबारी सादर करणे. त्याबरहुकूम निर्णय घेऊन प्रत्यक्ष मदतकार्याची, अन्नधान्य पुरवठ्याची, अर्थसाहाय्याची योजना आखून, प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे ही सर्व कामे प्रामुख्याने सरकारच्या अखत्यारित येतात. तर शाळांची उभारणी, औषधोपचारांचा पुरवठा, प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी, दवाखान्याची मदत या गोष्टी अशासकीय संस्था पार पाडू शकतात. कारण जिथे शाळा असतात, तिथे खेळांचे मैदान किंवा पटांगण असतेच त्यामुळे शाळेजवळच्या मोकळ्या जागेमध्येच नवीन इमारतीची उभारणी होऊ शकते. शिक्षकांना पगार सरकारकडून सुरू असतो, मुले असतात. इमारत बांधून पूर्ण करणे, एवढीच गोष्ट असते. पण यातून एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट साध्य होते, ती म्हणजे मुलांचे लक्ष दुसऱ्या गोष्टीवर केंद्रित होऊन त्यांच्या मनावरचा ताण कमी होऊन जातो. घडलेल्या घटनेमुळे मुलांना जबरदस्त मानसिक धक्का बसलेला असतो. या धक्क्यातून सावरून त्यांचे मानसिक दडपण घालवणे,

स्वस्थता निर्माण करणे, सुरक्षित वातावरण निर्मिती करणे त्यांच्यासाठी फार महत्त्वाचे असते.

याव्यतिरिक्तची दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सगळीकडून मदतीचा ओघ सुरू असतो. त्यामुळे मागण्याची, घेण्याची, परावलंबित्वाची व काही अंशी आयतेपणाची, आळशीपणाची सवय लागण्याची शक्यता असते. लहान वयात अशा प्रकारे मुलांवर संस्कार झाले तर त्यांच्या भवितव्याला हानीकारक आहे. त्यामुळेही पिढी वाचवणे एवढेच नाही तर ते सुसंस्कारित, स्वावलंबी करणे सर्वस्वी आपल्या हातात आहे.

त्याचप्रमाणे औषधोपचार, दवाखाना या गोष्टी आपत्तीच्यावेळी सर्वांत जास्त महत्त्वाच्या असतात. अपघातग्रस्तांना त्वरित डॉक्टरांची मदत मिळणे जरूरी असते. ऑपरेशन्स, तपासणी, औषधांची व्यवस्था तात्काळ होणे गरजेचे असते, संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी मेडिकल कँपची उभारणी विनाविलंब आपत्तीसाठी होणे गरजेचे असते. त्याशिवाय कायमस्वरूपीचे प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा दवाखाना उभारणेही जरुरीचे असते. या दोन्ही गोष्टींचे महत्त्व, निकड, गरज लक्षात घेऊन श्री. शांतीलाल मुथा आपत्तीकार्य, मदतकार्य सुरू असतानाच शाळा उभारणी व प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीकडे लक्ष केंद्रित करतात.

अंदमान-निकोबारमध्ये शाळा उभारणीसाठी प्रयत्न :

अंदमान-निकोबारच्या आतापर्यंतच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच एका अशासकीय संस्थेला काम करण्याची परवानगी मिळाली होती!

अंदमान-निकोबारमध्ये एकूण ५७२ बेटांचा समूह आहे. हिंदी महासागरात ते एकंदरीत ५०० मैल अंतरावर वसलेले आहे. बेटांवर जाणे फार मुश्किल काम होते. जेट्टी त्सुनामीमुळे उद्ध्वस्त

झालेल्या होत्या किंवा पाण्याखाली गेल्या होत्या. एकच सरकारी हेलिकॉप्टर होते, पण तेही गरजेच्या वेळी संघटनेच्या अध्यक्षांना किंवा कार्यकर्त्यांना वापरता येऊ शकले नाही, उपलब्ध झाले नाही. अशाही परिस्थितीत भारतीय जैन संघटनेने शाळा उभारणीचा निर्णय घेतला. एकंदरीत ४०० शाळांपैकी ९७ पूर्ण उद्ध्वस्त झाल्या होत्या. त्यातील २० शाळांच्या बांधकामासाठी संघटनेला तोंडी परवानगी मिळाली. सरकार व संघटनेमध्ये जो करार, चेण व्हायला अपेक्षित असते, त्यावर सही करण्यासाठी किंवा एकंदरीत कामाची जबाबदारी घेण्यासाठी सरकारी अधिकारी तयार नव्हते. त्यामुळे कागदपत्रांची पूर्तता होण्यासाठी फार विलंब लागत होता.

मुख्य कामावर लक्ष केंद्रित करण्याचे श्री. मुथा यांनी ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी श्री. प्रफुल्ल पारेख यांना चार्ज दिला. त्यादिवशी श्री. प्रफुल्ल पारेख नागपूरमध्ये होते. तेथून ते त्वरित पोर्टब्लेअरला रवाना होणार होते, त्यासाठी ते चेन्नईला आले, पण चेन्नई-पोर्टब्लेअर विमान चुकले व त्यांना चेन्नईमध्येच श्री. गोलेक्ष नावाच्या गृहस्थाकडे राहाणे भाग पडले. दुसऱ्या दिवशी पोर्टब्लेअरमध्ये गेल्यावर प्रफुल्लभाई श्री. नलिन गोलेक्ष यांच्या घरी गेले, ते तिथेच पुढचे दीड वर्ष राहिले.

प्रफुल्लभाईंनी सर्वप्रथम नलिनच्या साहाय्याने पोर्टब्लेअरमध्ये ऑफिस सुरू केले. शाळांसाठी जागेची पाहणी सुरू केली. परंतु अनेकविध अडचणींचा डोंगर उभा राहिला. त्यातील महत्त्वाचे म्हणजे मजूर मिळणे कठीण होते, आदिवासी भागात प्रवेश मिळणे कठीण होते, बांधकामाचे साहित्य हैद्राबाद, चेन्नई, विशाखापट्टणम्‌मार्गे आणावे लागणार होते.

आदिवासी कौंसिलची परवानगी घेणे आवश्यक होते, ती घेतली गेली. तेव्हाचे चेअरमन मि. अबर्डीन, कारनिकोबारमध्ये राहात होते. आर्किटेक्टची नेमणूक केली. इंजिनिअरची नेमणूक केली.

कॉम्प्युटर इंजिनिअर, ऑफिसमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची नेमणूक केली. एपीडब्ल्युडी (APWD) कडून तोंडी मान्यता मिळवली.

एवढे करूनही अडथळे काही संपत नव्हते, सर्वांत महत्त्वाचा अडथळा समोर उभा ठाकला, तो म्हणजे सरकारी लालफितीचा, अंदमान निकोबार सर्वांत जास्त भूकंपप्रवण क्षेत्र म्हणजे सेस्मिकझोन ५ मध्ये येतो.

शाळांच्या बांधकामाचा आराखडा तयार केला तो, सेस्मिकझोन ५ नुसार, आय.एस. १८९३ च्या प्रमाणे. परंतु सरकारी अधिकाऱ्यांचे म्हणणे होते की या गोष्टीची गरज नाही. त्यामुळे आराखडा मंजूर करून घेताना खूपदा त्यांना समजावून सांगावे लागले.

आराखडा मंजूर करून घेतला तर स्थानिक कंत्राटदार तयार नाहीत, मजूर नाहीत. यासाठी कारणे वेगवेगळी होती- कोणाचे ऑफिसेस उद्ध्वस्त होते, कोणी मानसिक धक्क्यातून सावरले नव्हते. त्यामुळे कामावर जाण्याची, उभारी घेण्याची मानसिकता नव्हती. त्यासाठी संघटनेतर्फे जाहिरात दिली. तर जाहिरातीला एकही प्रतिसाद नाही. मग सरकारी यादीतील कंत्राटदारांशी प्रत्येकी संपर्क केला असता समजले की, ते फक्त सरकारीच कामे घेतात. बाहेरची घेत नाहीत. सरकारी कामातून ४०-५०% मार्जिन सुटते शिवाय कामाच्या पूर्ततेविषयी, क्वालिटीविषयी अधिकारी व कंत्राटदार एकमेकांना सांभाळून घेतात! हीच गोष्ट मजुरांविषयीही अनुभवायला मिळाली. मजूर का उपलब्ध नाहीत तर, कोणाचे नातेवाईक मृत्युमुखी, कोणी घटनेच्या धक्क्यातून सावरू शकले नाही, कोणाला कामाची इच्छा नसते, कोणाला १००-२०० रु. रोजंदारीवर कामाची लाज वाटते. त्यापेक्षा सरकार/ अशासकीय संस्थांकडून बरीचशी मदत मिळते. मदतीचा ओघ

सगळीकडून एवढा सुरू असतो की, कामातून पैसे मिळविण्याची तेव्हा तरी गरज नसते आणि त्यामुळे रांगेत उभा राहायचे की कामावर जायचे?

एकीकडे आंतरराष्ट्रीय संस्था/ स्वयंसेवी संस्था बोलत असतात की स्थानिक लोकांचा सहभाग पुनर्निर्माण कार्यात करून घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात घटनास्थळीची स्थिती मात्र अत्यंत वेगळी असते. अर्थात् वातानुकूलित यंत्रणेमध्ये बसून कॉफी पिताना महत्त्वाची धोरणे ठरवणे केव्हाही सोपे असते त्यामुळेच प्रत्यक्षात घटनास्थळी कार्य करणाऱ्यांच्या कार्यपद्धतींमध्ये, धोरण अंमलबजावणीमध्ये व वातानुकूलीत यंत्रणेतील धोरण मसुद्यांमधील फरक फक्त शाब्दिक आहे!

अशावेळी भारतीय जैन संघटनेने धोरण ठरविले की, पाच दहा टक्के जास्ती घालविले तरी चालतील पण काम वर्ष-दोन वर्ष थकले नाही पाहिजे. त्यासाठी आगाऊ पैसे देऊन कामाला सुरुवात केली. बांधकाम साहित्य तयार करण्यासाठी हैद्राबादच्या कंपनीला कंत्राट दिले. हे साहित्य फॅक्टरीतून लोड होऊन चेन्नईला यायचे, तेथे ते उतरवले जायचे. तेथून जहाजात चढवून विशाखापट्टणम्ला उतरविले जायचे व विशाखापट्टणम् येथे पुन्हा चढवून पोर्टब्लेअरला उतरविले जायचे. अशा प्रकारे ते पुन्हा पुन्हा चढवून-उतरवून, मालाची ने-आण करण्यात पुष्कळ वेळ खर्च होत असे. सगळीकडे मनुष्यबळाची गरज भासत असे. पोर्टब्लेअरमधून ते वेगवेगळ्या बेटांवर पोहोचते करावे लागे. कारण शाळांची ठिकाणे वेगवेगळी होती.

प्रफुल्लनगरमध्ये शाळेची उभारणी करताना आलेला अनुभव तर फारच वेगळा आहे. येथे जाताना एक नदी लागते. ती नागमोडी वळणे घेत वाहाते. पाणी कमरेइतके असेल, पण तिला बरोबर दहा वेळा ओलांडूनच पुढे जाणे शक्य होते अशा प्रकारे डोक्यावर

साहित्य व दहा वेळा पायी नदी ओलांडूत ते साहित्य घेऊन, शाळेपर्यंत जावे लागले व मगच बांधकाम करता आले.

जिद्द, आकांक्षा, मेहनतीची तयारी असेल तर अशक्य गोष्टीही प्रत्यक्षात येतात, हेच केवळ यातून प्रतीत होते. भगीरथ प्रयत्न करून एक एक बांधकाम पूर्ण केले, ही नक्कीच वाखाणण्यासारखी गोष्ट आहे.

अशा सर्व अडचणींमधून, अडथळ्यांमधून जात. भारतीय जैन संघटनेने एक वर्षाच्या आत ११ शाळांची उभारणी केली. जिथे सर्वांत जास्त अडथळा, तिथे सर्वांत जास्त उत्साहाने कार्य, हेच सूत्र संघटनेच्या कार्यात कायम महत्त्वाचे ठरले आहे.

भारतीय जैन संघटनेने देणगीदारांना प्रत्येक शाळेला किंवा आरोग्य केंद्राला येणारा खर्चाचा आकडा सांगितला, त्याप्रमाणे शाळा किंवा आरोग्य केंद्राचा खर्च ज्यांनी दिला, त्या देणगीदाराच्या नावाचा "बोर्ड" त्या शाळेच्या किंवा आरोग्य केंद्राच्या ठिकाणी लावण्यात आला आहे.

सर्व शाळांचे हस्तांतरण करण्यात आले, तेही ठरविलेल्या वेळेच्या आधी! साठ टक्के शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले. ज्या ज्या शाळांमध्ये कॉम्प्युटर उपलब्ध होते तेथे कॉम्प्युटरबद्दल प्रशिक्षण देण्यात आले. BJS-EDUQIP हा प्रयोग येथे राबविण्यात आला. त्याद्वारे पुढच्या पिढ्यांसाठी सर्वांत चांगल्या पद्धतीचे शिक्षण, मुलांना सक्षम बनविणे, स्वावलंबी बनविणे, आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडीत शिक्षणाचा पाया पक्का करणे यासारख्या गोष्टींचा BJS-EDUQIP मध्ये समावेश करण्यात आला.

अंदमान-निकोबारसारख्या दुर्गम, अतिदूर व सागरी बेटांवर जाऊन, शिक्षणाची पताका वादळवाऱ्याशी झुंज देत, फडकावण्याचे महाकठीण कार्य भारतीय जैन संघटनेने, श्री. मुथा यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडले.

प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी :

कोणत्याही भागामध्ये औषधोपचार, दवाखाना या गोष्टींची गरज तर असतेच. आपत्तीग्रस्त ठिकाणी तर फार आवश्यकता भासत असते. अंदमान-निकोबार हा बराचसा आदिवासी भाग आहे. अत्याधुनिक सोयी-सुविधांच्या उपलब्धतेतीची गरज इथे निश्चित आहे, हा दृष्टिकोन मनात ठेवून भारतीय जैन संघटनेच्या श्री. मुथा व श्री. पारेख यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व सब केंद्रांच्या वेगवेगळ्या ठिकाणी, उभारणीचा, निर्णय घेतला.

९ मार्च ००५ रोजी आरोग्य सचिवांकडून त्यांना एकूण ३४ आरोग्य केंद्रांची उभारणी करण्याची परवानगी मिळाली. त्यामध्ये ४ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३०उप केंद्रांचा समावेश होता.

शाळेच्या बांधकामाप्रमाणेच याही बांधकामासाठी नियोजन केले. आर्किटेक्ट, इंजिनिअर, कंत्राटदार, मजुरांची नेमणूक केली. बांधकामाचे साहित्यही हैद्राबादहून मागविले जात होते. इथेही सर्व प्रकारचे अडथळे, अडचणींचे डोंगर पार करीत कार्य आखले व प्रत्यक्षात आणले.

क्रियाशक्ती, इच्छाशक्ती व ज्ञानशक्ती यांचा त्रिवेणी संगम ज्याठिकाणी होतो तिथेच पवित्रता असते, त्यातूनच यश मिळते. भारतीय जैन संघटनेचे कार्य म्हणजे या त्रिशक्तींचे एकत्रिकरणच होय!

प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी करताना वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे अनुभव येत गेले. खूपदा ये-जा करावी लागायची, वाहतुकीची सोय उपलब्ध नव्हती. बेटांवर संपर्क माध्यम नसायचे.

नानकवरी ग्रुप ऑफ आयलंडवरील अडचणी :

येथील कमोर्टा येथे १४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची उभारणी करण्यात आली. या बेटांपर्यंत पोहोचण्यासाठी केवळ एकच जहाज उपलब्ध होते. तेही पंधरा दिवसांतून एकदा! पोर्टब्लेअरवरून

निघालेले जहाज कमोर्टाला येणार तेथून पुढे जायला दोन दिवस आणि याच परतणाऱ्या जहाजाने पोर्टब्लेअरला पुन्हा जाणे शक्य असे. त्यामुळे एकदा नानकवरी किंवा कमोर्टाला आलेली व्यक्ती पंधरा दिवसांनीच पोर्टब्लेअरला येई किंवा बांधकामातील कोणतेही छोटे मोठे साहित्यही पोर्टब्लेअरवरून आणण्यासाठी पंधरा दिवस वाट पाहावी लागे! तसेच बांधकामाचे साहित्य हैद्राबादहून चेन्नई, विशाखापट्टणम् मार्गे पोर्टब्लेअरला आल्यानंतर तेथून वेगवेगळ्या बेटांवर पाठविण्यासाठी फारच कसरत करावी लागे. मोठमोठे शीटस् अक्षरश: डोक्यावर घेऊन जहाजामध्ये चढवून पुन्हा नेमक्या ठिकाणी उतरवून घ्यावे लागत. अशा सर्व कसरतींतून कमोटा बेटांवर १४ उपकेंद्रे स्थापन केली. पण तपाँग या ठिकाणी मात्र वेगळीच अडचण होती. इथे आरोग्य केंद्राचे ठिकाण उंच टेकडीवर होते व त्या ठिकाणापर्यंत साहित्य नेणे कठिण होते.

श्री. प्रफुल्ल पारेख यांच्या देखरेखीखाली आरोग्य केंद्रांच्या उभारणीचे कार्य पार पडत होते. ते आठवड्यातून एकदा संपूर्ण कामाच्या संदर्भातील आढावा सरकारला सादर करीत. सरकारच्या दृष्टीने हा अगदीच वेगळा अनुभव होता, हा भाग अलग होता! त्यामुळे सरकारदरबारी केवळ आश्चर्यच व्यक्त होई, कारण आतापर्यंत सरकारतर्फे एकाही इमारतीचे भूमिपूजनही झाले नव्हते की या बेटांपर्यंत कोणी पोहोचलेही नव्हते. त्यांच्या कामाच्या आढाव्यात दोन-तीनदा तपाँगचे काम राहिले आहे, असा उल्लेख होता. तर एका व्यक्तीने त्यांना सांगितले, ते साहित्य लवकर उचलून बांधकामासाठी नाही वापरले तर खराब होईल कारण त्या भागात खाऱ्या जमिनीचे/ खाऱ्यापाण्याचे प्रमाण जास्त आहे. त्याप्रमाणे श्री. पारेख पोर्टब्लेअरवरून तपाँगला आले. स्वत: टेकडी पायी चढून गेले.

पाया तयार झालेला होता. पलीकडे वस्ती होती, पण केवळ साहित्य त्या जागेपर्यंत, वरपर्यंत आणण्यापासून पूर्ण बांधकाम थांबलेले होते.

त्यानुसार प्रफुल्लभाईंनी स्थानिक मजुरांना विनंती केली पण ते काही तयार होईनात. मग सरकारकडे काही मजूर व स्थानिक मजूर मिळून अडतीस जणांना ५०० रु. रोज ठरवून ते साहित्य वरपर्यंत नेण्यास त्यांनी कसेबसे तयार केले ते स्वत: त्यांच्याबरोबर चालत राहिले आणि सामान पोहोचवून घेतले, बांधकाम केले व आरोग्य केंद्राची उभारणी केली.

एका एका शाळेसाठी एक कंत्राटदार किंवा एका आरोग्य केंद्रासाठी एक कंत्राटदार अशी विभागणी करून काम केले.

इंदिरा पॉईंट- भारताचे सर्वांत शेवटचे टोक, याला इंदिरा पॉईंट म्हणतात, येथे १० वर्गांची एक शाळा व तीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची उभारणी केली.

प्रत्येक आरोग्य केंद्राची उभारणी झाल्यानंतर हस्तांतरणाचा एक कार्यक्रम ठेवण्यात येई. सर्व आरोग्य केंद्रांच्या उभारणीनंतर हस्तांतरणाचा कार्यक्रम भारतीय जैन संघटनेने आखला. तेथील सचिव दर्जाचे अधिकारी, आदिवासी कौन्सिलचे अध्यक्ष, सदस्य यांनाही निमंत्रित केले. कार्यक्रम ठरला पण अचानकपणे प्रफुल्ल पारेखांना निरोप आला की, "आपण भारतीय जैन संघटनेचा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी ठेवू." श्री. पारेख यांनी विचारणा केली की,"का बदल होत आहे?" तर उत्तर आले की, "त्याच दिवशी पंतप्रधानांच्या हस्ते एक भूमिपूजनाचा कार्यक्रम आहे!"

अशासकीय संस्था ज्यादिवशी संपूर्ण बांधकाम करून सरकारला हस्तांतरण करू इच्छित होती, त्या दिवशी सरकार मात्र बांधकाम सुरू करण्याचा विचार करणार होते!

सरकारी कार्यपद्धतीचा एक नमुना :

अंदमान-निकोबार प्रशासन व भारतीय जैन संघटनेमध्ये असे ठरले की, सर्व आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक असणाऱ्या सुविधा उदा. खुर्च्या, टेबल, स्टेटोस्कोप, एक्सरे मशिन वगैरे वगैरे अमेरिकेच्या डायरेक्ट इंटरनॅशनल रिलिफ संस्थेकडून मागविण्यात याव्यात. हे सर्व साहित्य अमेरिकेहून सरकारच्या नावे बंदरात येईल, म्हणजे माल उतरवताना, सोडवताना कस्टम ड्युटी, एक्साईज ड्युटी, सर्व्हिस चार्ज, ऑक्ट्रॉय भारतीय जैन संघटनेला भरावा लागणार नाही. पण बाकी सर्व खर्च संघटना करेल. सरकारला एकही रुपया खर्च करावा लागणार नाही. याविषयी आरोग्य सचिव व बीजेएस यांच्यामध्ये खूप भेटीगाठीअंती निर्णय झाला की, सर्व साहित्य अमेरिकेहून हेल्थ डायरेक्टरच्या नावाने येईल, जेणेकडून बाकी खर्च वाचेल व कागदपत्रांची पूर्तता करण्याचा वेळ वाचेल.

त्याप्रमाणे अमेरिकेहून सर्व साहित्य चेन्नई पोर्टला आले. परंतु तेथून ते साहित्य ताब्यात घेण्यास सरकारी अधिकाऱ्यांनी सात-आठ महिने घालविले. कागदपत्रांच्या जंजाळात, लालफितीत ते सर्व साहित्य व महत्त्वाचे औषधे सात-आठ महिने बंदरातच पडून होते. औषधांसारख्या गोष्टींबाबत वारंवार विनंती करूनही एवढी दिरंगाई केली जावी, ही खरोखर दु:खद आणि दुर्दैवी गोष्ट आहे.

आपत्तीच्या वेळी सरकारने कोणत्या वेळी काय निर्णय घ्यावेत याबद्दल विशेष नियमावली असावी, एवढाच निष्कर्ष आपण यातून काढू शकतो!

सगळ्या शाळांच्या व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींचा विमा भारतीय जैन संघटनेने उतरविला आहे. दूरदृष्टी व असामान्य धोरण याचाच हा उत्कृष्ट नमुना होय.

भारतीय जैन संघटनेला आलेल्या सरकारविषयीच्या अनुभवातून पुढील आपत्तीविषयी धोरणात्मक निर्णय प्रक्रिया राबविण्यात

यावी, त्यासाठी काही मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहेत ते म्हणजे-

अंदमान निकोबारमध्ये बांधलेल्या सर्व शाळेच्या इमारतींचा आराखडा सरकारने तोंडी मंजूर केला आहे. पण अजूनही कागदोपत्री मंजूर झालेला नाही. बांधकाम पूर्ण होऊन, त्याचे हस्तांतरण सरकारकडे झाले. शाळा सुरू होऊन, मुले शाळेत जायला लागली, तरीही मंजूरी दिलेली नाही!

भारतीय जैन संघटना ही एक स्वयंसेवी संस्था आहे. सर्व थरांतील लोक मिळून आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी पैसा उभा करतात. सरकारकडून पैसा घेतला जात नाही, सार्वजनिक पैशातून या इमारती, सुविधा उभ्या राहतात. एक सामाजिक बांधिलकी म्हणून हे सर्व कार्य होत असते. पण सरकारी मंडळी या कार्याकडे अशाच दृष्टीने पाहतात असे नाही. तसेच बांधकामाच्या कामासाठी स्थानिक मजूर, काम करणारे लोक मिळत नाहीत. मिळाले तरी ते फार पैशांची मागणी करतात. अशा वेळी त्यांनीही सामाजिक कार्य करावे, असा संघटनेचा उद्देश नाही. पण स्वयंसेवी संस्थांची, मदतीचा हात देणाऱ्यांची आपण लूट तर करीत नाही ना? याचाही कुठेतरी विचार होणे निश्चितपणे जरूरी आहे.

कोणतेही कार्य सरकारच्या परवानगीशिवाय पार पाडू शकत नाही. त्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांबरोबर वारंवार बैठका घेऊन निर्णय घ्यावे लागतात. निर्णय जरी चांगले घेतले तरी शेवटी त्याचे फळ कसे असायला हवे? काय अडचणी येतील? त्यातून कोणते मार्ग निघू शकतील? या सर्व गोष्टींविषयी आधीच विचारविनिमय झाला असेल तर वेळ, पैसा खर्च करूनही पश्चात्ताप पावण्याची वेळ येत नाही.

उदा. मागे सांगितल्याप्रमाणे अमेरिकेहून औषध व साहित्य येऊनही सरकारी अधिकाऱ्यांच्या दिरंगाई धोरणामुळे सात-आठ

महिने ते बंदरातच पडून होते.

पारदर्शकतेचा अभाव, एक हाती निर्णय प्रक्रिया नाही, प्रशासनातील नियमांमध्ये, कामकाज पद्धतींमध्ये त्रुटी, तज्ज्ञांची कमतरता, पुढे जाऊन नेमके काय करायचे आहे? याविषयीचे सुसूत्र धोरण नाही. यामुळे कोणतेही काम वेळेत पूर्ण होऊच शकत नाही.

विजेची उपलब्धतता त्वरित करून देणे, हे खरे तर सरकारचे सर्वांत प्रथम कर्तव्य व महत्त्वाचे काम होय. पण तेही वेळेवर होऊ शकत नाही.

अंदमान-निकोबारमधील, दूरवरच्या बेटांवर बांधकाम सुरू होते, तेव्हा जनरेटरच्या साहाय्याने कार्य केले जाई. पण डिझेलसाठी, जनरेटरमध्ये काही बिघाड झाल्यास दुरुस्तीसाठी पोर्टब्लेअरला यावे लागे. त्यासाठी किमान पंधरा दिवस थांबावे लागे कारण जहाज पंधरा दिवसातून एकदाच सुटत असे. म्हणजे पंधरा दिवस सर्व कामकाज ठप्प होऊन राहात असे.

केंद्रशासित प्रदेशांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाची एक वेगळीच नियमावली असावयास हवी. सरकार, अशासकीय संस्था व जनतेमध्ये निश्चित स्वरूपाचे सहकार्य असणे आवश्यक आहे.

प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले पाहिजे प्रशिक्षित अधिकारी एखाद्या आपत्तीग्रस्त ठिकाणी नेमल्यानंतर त्याची बदली व्हावयास नको. दुसऱ्या अधिकाऱ्याने येऊन संपूर्ण प्रक्रिया समजावून घेऊन कामाला सुरुवात करेपर्यंत वेळेचा अपव्य होत राहातो.

अशासकीय संस्था व सरकारमध्ये होत असलेल्या साखळी चे मुद्दे तयार करायला व फाईलवर सगळीकडून सह्या होऊन यायला सहा महिने लागतात ते सर्व मुद्दे एका विशिष्ट नियमांद्वारे सरकारकडे सर्व राज्यांसाठी तयार असावेत.

भूकंपप्रवण क्षेत्राप्रमाणे म्हणजे झोन १ ते ५ प्रमाणे, बांधकामाचा, विशिष्ट प्रकारचा आराखडा सरकारकडे तयार असावा.

आपत्तीग्रस्त भागासाठी सरकारकडून त्वरित वाहतुकीची सोय केलेली असली पाहिजे. काही प्रमाणात अशासकीय संस्थांची मदत घेतली जावी. पण वाहतूक व्यवस्था सुरळीत असेल तर आपत्तीग्रस्तांसाठी वेळेवर मदत पोचविणे सुलभ होऊन जाते.

प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या उभारणीवेळी संघटनेच्या कामगारांना खूप वेळा प्रवास, ये-जा करावी लागे. वाहतुकीची सोय नव्हती, जेट्टी पाण्याखाली गेले होते. कामगारांना कामावर पाठविले की त्यांच्याशी संपर्क होऊ शकत नसे. त्यामुळे पुढील कार्यक्रमाविषयी काहीच माहिती मिळत नसे.

पण तेथील प्रशासन जेव्हा एकत्र बैठक बोलवत असे, तेव्हा मात्र, काम कुठपर्यंत आले? व कधी पूर्ण होणार म्हणून विचारणा होई. कधी कधी पत्रे येत, "कामाला उशिर होत आहे आणि आपण काम का ठप्प ठेवले आहे, याची कारणे द्या?"

नानकवरी ग्रुप ऑफ आयलंडमध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणीचे कार्य सुरू होते. प्री फॅब्रीकेटेड साहित्य फॅक्टरीतून बंदरात येऊन पोहोचले होते. पण वाहतुकीच्या प्रश्नामुळे सर्व साहित्य बंदरात पडून होते. ज्या ठिकाणी केंद्रांची उभारणी करायची तेथपर्यंत कोणीही पोहोचू शकत नव्हते.

अगदी सरकारचे लोकदेखील! प्रचंड प्रतिकूल हवामान, पाऊस, समुद्र खवळलेला आणि त्यात भूकंपाचे छोटे-मोठे धक्के बसत. अशा कठीण परिस्थितीतही संघटनेचे कार्यकर्ते, अध्यक्ष दिवसरात्र झटून काम पार पाडीत होते. तरीसुद्धा काम पूर्ण का नाही केले म्हणून अशासकीय संस्थेला सरकारने विचारणे म्हणजे अशोभनीय!

कारनिकोबारमध्ये दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या उभारणीचे कार्य सुरू होते. आठ पैकी सहाचे बांधकाम पूर्ण करून सरकारकडे हस्तांतरण केले होते. दोनचे बांधकाम सुरू होते तर दोनपर्यंत पोहोचण्यासाठी जागाच नव्हती. तिथेपर्यंत साहित्य पोचवायचे कसे म्हणून विचारविनिमय सुरू होता. खऱ्या अर्थाने दोनच बांधकामाविना बाकी होते, तर सरकार विचारते की, "कामाला का उशिर होत आहे?"

भारतीय जैन संघटनेने केलेल्या या प्रचंड कार्याची प्रशंसा डायरेक्ट रिलीफ इंटरनॅशनल या संस्थेने केली आहे. ते म्हणतात, "जिथे सरकारही पोहचू शकत नव्हते, कोणीही पोहचू शकत नव्हते, दुर्गम प्रदेश, आदिवासी भाग आणि अत्यंत कठीण परिस्थिती असूनही भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते तिथे पोहचले व त्यांनी अत्यंत निष्ठेने आपले कार्य पार पाडले." अशाप्रकारे जगभरातून संघटनेच्या कार्याची दखल घेतली गेली. परंतु भारत सरकारचा सर्वच कारभार दप्तर दिरंगाईने व्याप्त असल्याने संघटनेच्या कार्याची दखलही त्यांनी दिरंगाईनेच घेतली!

८ ऑक्टोबर २००५ रोजी अंदमान-निकोबार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे हस्तांतरणाचा कार्यक्रम चेन्नई येथे, तत्कालिन राज्यपाल श्री. सुरजितसिंग बर्नाला यांच्या उपस्थितीत आयोजित केला होता. याच व्यासपीठावर श्री. शांतीलाल मुथा व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असतानाच जम्मू-काश्मीरमधील भूकंपाची बातमी आली. एका भूकंपाची जबाबदारी संपते न संपते तोच दुसरी समोर आली.

भारतीय जैन संघटनेने पुनर्वसन केलेल्या शाळांची यादी :

क्र.	प्राथमिक आरोग्य केंद्राचे नाव	गाव	ठिकाण
१.	हट्बे	हट्बे	छोटे अंदमान
२.	कट्छाल	कट्छाल	कट्छाल
३.	तेरेसा	तेरेसा	तेरेसा
४.	गांधीनगर	ग्रेट निकोबार	ग्रेट निकोबार

भारतीय जैन संघटनेने पुनर्विकास केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची यादी :

क्र.	प्राथमिक आरोग्य केंद्राचे नाव	गाव	ठिकाण
१.	हट्बे	हट्बे	छोटे अंदमान
२.	कट्छाल	कट्छाल	कट्छाल
३.	तेरेसा	तेरेसा	तेरेसा
४.	गांधीनगर	ग्रेट निकोबार	ग्रेट निकोबार

पुनर्विकास केलेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची यादी :

क्र .	प्राथमिक आरोग्य उपकेंद्र	ठिकाण	बांधकाम क्षेत्र
१.	स्मॉल लॅपथी	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
२.	अराँग	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
३.	सावल	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
४.	किनयुका	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
५.	मुस	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
६.	टी-टॉप	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
७.	बीग लॅपथी	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
८.	टॅपोईमिंग + चुकचुचा	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
९.	मलाका + काकाना	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
१०.	किमस	कार निकोबार	७७५ स्क्वे.फूट
११.	जपान टेकरी	कट्छाल	७७५ स्क्वे.फूट
१२.	मिनाची रामनगर	कट्छाल	७७५ स्क्वे.फूट
१३.	ईवॉल कपांगा	कट्छाल	७७५ स्क्वे.फूट
१४.	अल्युरंग	टेरासा	७७५ स्क्वे.फूट
१५.	चॅम्पिन	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट

क्र .	प्राथमिक आरोग्य उपकेंद्र	ठिकाण	बांधकाम क्षेत्र
१६.	डारिंग	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
१७.	काकाना	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
१८.	तपोंग	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
१९.	मुनाक	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२०.	लाफुल (विकासनगर)	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२१.	हितुई	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२२.	चंगुआ	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२३.	बंदर खाडी	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२४.	बंबुका	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२५.	पिलप्लिओ	कामोत्रा	७७५ स्क्वे.फूट
२६.	राजीवनगर -१	ग्रेट निकोबार	७७५ स्क्वे.फूट
२७.	राजीवनगर -२	ग्रेट निकोबार	७७५ स्क्वे.फूट
२८.	जोगिंदरनगर	ग्रेट निकोबार	७७५ स्क्वे.फूट
२९.	कॅम्पबेल बे फी जवळ	ग्रेट निकोबार	७७५ स्क्वे.फूट
३०.	हुटबे	हुटबे	७७५ स्क्वे.फूट

भारतीय जैन संघटनेच्या कार्याची प्रशंसा विविध स्तरांतून झाली. मा. राष्ट्रपती श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी पोर्टब्लेअरला भेट देऊन संघटनेच्या कार्याची प्रशंसा केली. राज्यपाल श्री. राम कापसे यांनी कार्याची वेळोवेळी दखल घेतली.

श्री. उद्दिप्ता रे, सचिव, यांनी भारतीय जैन संघटनेच्या नियोजनबद्ध कार्याची प्रशंसा तर केलीच पण BJS-EDUQIP सारखी शिक्षणप्रणाली राबविल्याबद्दल फार गौरव केला.

श्री. राजेंद्रकुमार यांनी प्रशंसोद्‌गार काढले की भारतीय जैन संघटनेने अतिशय उत्कृष्ट कार्य करून, अंदमान निकोबारमधील जनतेच्या भविष्यकाळासाठी फार मोठे योगदान दिले आहे. त्यांचे कार्य म्हणजे मानवतेची निस्वार्थीपणे केलेली सेवाच होय!

श्री. डी. एस. वेगी व श्री. ई. एस. राजेश यांनीही कमी वेळात उत्कृष्ट दर्जाचे, नियोजनबद्ध कार्य केल्याबद्दल प्रशंसा केली.

श्री. एल. एम. संघवी, हेग येथील न्यायालयाचे सदस्य यांनी भारतीय जैन संघटना व श्री. मुथा यांच्या प्रामाणिकपणाबद्दल, तळमळीच्या कार्याबद्दल व मानवतावादी विचारसरणीबद्दल फार गौरव केला.

तमिळनाडू-अंदमान निकोबार भूकंपादरम्यान ज्या कार्यकर्त्यांनी मदत केली त्यांची नावे :

श्री. शांतीलालजी मुथा
श्री. प्रफुल्लजी पारेख
श्री. डी.बी. घांटे
श्री. सोनावणे एम्.यू.
डॉ. पवार ए.जी.

☆☆☆

८. भूकंप व टोकाचे हवामान : जम्मू-काश्मीरचे अनुभव

अंदमान निकोबार येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे हस्तांतरण सरकारला करण्याचा कार्यक्रम ८ ऑक्टोबर २००५ रोजी चेन्नईमध्ये सुरू होता. राज्यपाल श्री. सुरजितसिंग बर्नाला यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम सुरू होता. व्यासपीठावर असतानाच श्री. शांतीलाल मुथा यांना समजले की जम्मू काश्मीरमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर भूकंप झाला आहे. एवढेच नव्हे तर वित्त व मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. एका आपत्तीचे कार्य पूर्ण होते न् होते तोच दुसऱ्या आपत्तीचं आव्हान समोर ठाकणं हा खरोखरी विचित्र योगायोग होता. लातूर, जबलपूर, गुजरात, अंदमान निकोबार आणि आता जम्मू काश्मीर! आपत्तींची आव्हानं आणि सकारात्मक दृष्टिकोनातून पार पाडलेली कार्य हे जणू शांतीलालजीच्या आयुष्याचे ध्येय ठरले गेले. मानवतावादी व उदार धोरणाने, प्रांजळमनाने दूर दूर जाऊन शांतीलालजींनी आपत्तीनिवारण्याची कार्ये पार पाडली.

ऑक्टोबर २००५ रोजी सकाळी ८.५० वा. ७.६ रिइटर स्केलचा भारत आणि पाक व्याप्त काश्मीरमध्ये प्रचंड भूकंप झाला. ८०००० लोक मृत्युमुखी, २ लाख अपघातग्रस्त आणि ४ लाख लोक बेघर झाले. मुख्य भूकंपानंतरही जवळपास ९७८ भूकंपाचे धक्के २७ ऑक्टोबरपर्यंत जाणवत होते. ऐतिहासिक वास्तूंची पडझड झाली. चरार-ए-शरीफ मधील शेख्रर नूर-उद्द-दीन-नूरानी आणि श्रीनगरमधील जामा मशिदीला भूकंपामुळे तडे गेले. अनंतनाग, बारामुल्ला, जम्मू, कुपवाडा, पूँछ, राजौरी, उधमपूर येथील इमारतींचे प्रचंड नुकसान झाले.

ठिकाण	घरे उद्ध्वस्त
श्रीनगर	३१८०९
जम्मू	९१४
एकूण	३२७२३

हवामानाची प्रतिकूलता :

जम्मू काश्मीरमध्ये भूकंपानंतर थंडी वाढत होती. नोव्हेंबर ते मार्च या दरम्यान इकडचे रस्ते बंद होऊन जातात. बर्फ पडायला लागतो व इकडे काहीच कार्य करणे शक्य होऊ शकत नाही.

नॅशनल डिजॅस्टर मॅनेजमेंट ॲथॉरिटीची श्री. मुथांना विनंती-

भारत सरकारची नॅशनल डिजॅस्टर मॅनेजमेंट ॲथॉरिटी (एन.डी.एम.ए.), राष्ट्रीय आपत्ती निवारण मंडळ, ही मोठी संस्था आपत्तीनिवारण कार्यासाठी स्थापन करण्यात आली आहे.

या संस्थेचे अध्यक्ष स्वत: पंतप्रधान असतात. या संस्थेचे उपाध्यक्ष यांना केंद्रीय कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा तर सदस्यांना केंद्रीय राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्यात येतो. एन्.डी.एम्.ए.च्या दोन

सदस्यांचा श्री. मेनन व श्री. के.एम.सिंग यांचा शांतीलालजींना फोन आला. जम्मू-काश्मीरच्या भूकंपात काम करण्यासाठी दिल्लीला एक बैठक बोलाविली होती, या बैठकीला शांतीलालजींना निमंत्रित करण्यात आले. शांतीलालजींचे लातूर, गुजरात, अंदमान-निकोबारमधील नियोजनबद्ध कार्य सर्वांना माहिती होतेच. आग्रह त्यांनी धरला. त्याप्रमाणे भारताचे गृहमंत्री श्री. शिवराज पाटील, एन.डी.एम.ए.चे उपाध्यक्ष जनरल विज, सदस्य के.एम.सिंग व श्री. मेनन हे सर्व सरकारतर्फे आणि श्री. शांतीलालजी मुथा व श्री. प्रफुल्ल पारेख हे भारतीय जैन संघटना या अशासकीय संस्थेतर्फे बैठकीला उपस्थित होते.

त्यावेळी सरकारतर्फे श्री. मुथांना सांगण्यात आले की, "काश्मीरच्या खोऱ्यामध्ये पाकिस्तान सरहद्दीवर भूकंप मोठ्या प्रमाणात झाला आहे, घरांची पडझड, इमारती-शाळा मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाल्या आहेत. ही घरे लवकर बांधणे शक्य नाही. त्यात तिकडे डिसेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर बर्फ पडतो, रस्ते बंद होतात व कोणतेही काम करणे शक्य होत नाही. घरांसाठी लागणारे साहित्यही नेता-आणता येत नाही. त्यामुळे लोकांचे थंडीने खूप हाल होतील, आता तात्पुरते निवारे सरकारतर्फे उभारण्यात आले आहेत. पण थंडीपासून या निवाऱ्यांमध्ये संरक्षण होणे शक्य नाही. त्यामुळे भूकंपात जेवढे लोक मेले आहेत, त्यापेक्षा जास्त लोक थंडीने मरतील." त्यासाठी सर्वांनी श्री. शांतीलाल मुथांना विनंती केली की, "तुमची आपत्तीनिवारण कार्यातील अनुभवाची व्याप्ती ध्यानात घेता, याही ठिकाणी सरकारला मदत करावी. जम्मू-काश्मीरमध्ये भूकंपग्रस्तांसाठीचे मदतकार्य तुम्ही कशा पद्धतीने व कार्य करू शकाल? याचे नियोजन करून भारत सरकारकडे द्यावे व एन.डी.एम.ए. ला सहकार्य करावे."

हे सर्व ऐकून शांतीलालजी क्षणभर स्तब्ध झाले. त्यांनी व श्री. प्रफुल्ल पारेखनी विचार केला की, "हे आव्हान स्वीकारले पाहिजे, लोकांना त्वरित निवाऱ्याची गरज आहे, थंडीपासून त्यांचा बचाव केला पाहिजे, आणि त्यासाठी आपण काही मार्ग आखले पाहिजेत ते आपले कर्तव्य आहे."

बीजेएसचे बचाव कार्य :

जम्मूमध्ये तीन जैन शैक्षणिक संस्था आधीपासूनच होत्या. त्यामुळे साहित्य, मनुष्यबळ व इतर सुविधा उपलब्ध होऊ शकल्या. पुण्यातून श्री. विजय सेठीया यांच्या अध्यक्षतेखाली "मेडिकल रिलीफ वर्क"साठी एक टीम रवाना झाली. त्यांनी मदतकार्याबरोबरच, एक सर्व्हे केला की किती जणांना औषधोपचार, हॉस्पिटल्सची गरज आहे. तर त्यांना असे आढळले की, यापेक्षा जास्त जरुरी लोकांना निवारा मिळण्याची आहे.

पुनर्वसनासाठी प्रयत्न :

प्राथमिक परीक्षणानंतर बीजेएसच्या लक्षात आले की, तेथे टेन्टस् कमी आहेत व पुष्कळसे आपत्तीग्रस्त विनानिवारा, विना सहारा दिवस रात्र काढीत आहेत. तात्पुरते टेंट वापरून थंडीपासून संरक्षण होणे शक्य नाही तर, कायमस्वरूपी घरांची तेथे जास्ती गरज आहे, हे सर्वांच्या ध्यानी आले. भारत सरकारने १५ हजारापेक्षा जास्त टेन्टस् पाठविले, पण तरीही ३५००० टेन्टस्ची तिथे गरज होती. भारत सरकारने रुपये एक लाखाची मदत घरांच्या पुनर्बांधणीसाठी तर दहा हजार ते चाळीस हजार अशी मदत घरांच्या दुरुस्तीसाठी जाहीर केली. परंतु या तुटपुंज्या मदतीमुळे लोकांच्या सर्व गरजा भागणे शक्य नव्हते.

भारतीय जैन संघटनेचे नियोजन :

या कठीण प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी एक अभिनव व वेगळी योजना आखली. गुजरात भूकंपाच्या वेळी ज्या शाळा बांधण्यात

आल्या होत्या, त्या शाळा प्रीफॅब्रीकेटेड असल्यामुळे व त्याचे बांधकाम करताना, त्याचा वापर दुसऱ्या नैसर्गिक आपत्तीमध्येही होऊ शकेल अशा प्रकारचं नियोजन गुजरातमध्ये सुरुवातीपासूनच केले होते. प्रत्येक मुख्याध्यापकाकडून त्यांची पक्की शाळा बांधून झाल्यावर हे सर्व साहित्य बीजेएस परत घेऊन जाईल अशी संमतीपत्रे घेतली होती.

शांतीलालजींच्या दूरदृष्टी व समयसूचकतेचा हा उत्कृष्ट नमुना होय. प्रसंगावधान राखून कार्य करण्याची त्यांची विलक्षण हातोटी या प्रसंगी उपयोगी आली हे निश्चित.

त्याप्रमाणे गुजरातमधल्या शाळांचं साहित्य जम्मू-काश्मीरमधल्या लोकांना राहण्यासाठी वापरता येईल व त्यांचे थंडीपासून संरक्षण होईल, असे नियोजन शांतीलालजींनी केले. त्याप्रमाणे एन.डी.एम.ए. समोर बीजेएसने सर्व नियोजन सादर केले.

जम्मू-काश्मीर सरकारच्या रस्ते व इमारत बांधणी विभागाकडून प्रीफॅब्रीकेटेड स्ट्रक्चरच्या पुनर्वापरासंबंधीचा परीक्षण अहवाल:

२७ ऑक्टोबरला श्री. जाकेर इकबाल पांचोरी व श्री. एजाज अहमद भूजकडे रवाना झाले. श्री. अशोक पवार यांच्या नेतृत्वाखाली बीजेएसची टीम गुजरातमध्ये कार्यरत होती. त्यांनी अहवाला सरकारला सादर केला की, "हे सर्व साहित्य, प्रीफॅब्रीकेटेड मटेरिअल, ॲस्बेस्टॉस शीटस् उत्तम अवस्थेत असून, या सर्व साहित्याचा थंडीपासून बचाव करण्यासाठी निश्चितच वापर करता येईल."

राष्ट्रीय आपत्ती नियोजन मंडळाबरोबर करार :

भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतीलाल मुथा आणि एनडीएमए च्या वतीने जनरल (निवृत्त) एन.सी.विज यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या. यात जम्मू काश्मीरमधील भूकंपग्रस्तांचे

पुनर्वसन तसेच कडाक्याची थंडी आणि पावसापासून बचावासाठी ८७० फॅब्रीकेटेड निवाऱ्याची व्यवस्था करणार आहे. याद्वारे ३ लाख ३४ हजार चौ.फूट जागा भूकंपग्रस्तांसाठी उपलब्ध होईल. एक महिन्यात १० ते १५ हजार लोकांसाठी निवारा उपलब्ध करून देण्याची कार्ययोजना आहे. यामुळे चहूबाजूने होणाऱ्या बर्फवृष्टीच्या काळात कडाक्याच्या थंडीपासून भूकंपग्रस्तांचा बचाव होऊ शकतो. हिमवृष्टीतही या निवाऱ्याच्या आतील तापमानाचा स्तर कायम राखण्याची पद्धत अवलंबिण्यात आल्याचे तर सरकारी चाचणीत निष्पन्न झाले होते. यातील प्रत्येक खोली ३८४ चौ.फूटांची असेल.

करारपत्रावरील स्वाक्षऱ्यानंतर शांतीलालजींच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या प्रतिनिधी मंडळाने गृहमंत्री शिवराज पाटील यांची भेट घेतली त्यांच्याकडे सामंजस्य कराराची प्रत देताना योजनेच्या अंमलबजावणीबाबतही यावेळी चर्चा झाली. त्याप्रमाणे भूकंपग्रस्त क्षेत्रात बनविण्यात येणाऱ्या निवाऱ्याचे २५० ढाचे गांधीधाम येथून जम्मूकडे रवाना करण्यात येतील व उर्वरित ढाचे १५ नोव्हेंबरला पाठविण्यात येतील, असे ठरले. पहिल्या टप्प्यात २५० खोल्या बांधण्यात येतील असे ठरले. भूकंपग्रस्त भाग हा पहाडी पर्वतीय प्रदेश असल्यामुळे खोल्या उभारण्यासाठी सपाट जागा मिळणे, ही सर्वात मोठी समस्या होती.

भारत सरकार व भारतीय जैन संघटनेच्या सामंजस्य करारातील महत्त्वाचे मुद्दे :

भारतीय जैन संघटना गुजरातमध्ये यंत्रणा लावून सर्व शाळा ज्या ज्या ठिकाणी पक्क्या बांधून झालेल्या आहेत, अशा ठिकाणचे प्री फॅब्रीकेटेड मटेरिअल काढून घेऊन, त्या त्या शाळेतून ते गांधीधाम रेल्वेस्टेशनपर्यंत कसे आणले जाईल याचे नियोजन करेल. गांधीधामपासून जम्मूपर्यंत एक महिन्याच्या आत हे सर्व

साहित्य पाठविण्यासाठी, भारत सरकारकडून तीन चार वेगळ्या दिवशी मालवाहतुकीच्या मोठ्या व स्पेशल ट्रेन उपलब्ध करून दिल्या जाव्यात. त्यानंतर जम्मू-काश्मीर सरकारच्या माध्यमाने जम्मूच्या रेल्वेस्टेशनवर ट्रेन आल्यावर ते संपूर्ण साहित्य काश्मीर व्हॅलीमध्ये वाहून नेण्यासाठी दोनशे ट्रक लागू शकतील. ते उपलब्ध करून दिले गेले पाहिजे.

त्याचबरोबर हेही ठरविण्यात आले की, सरकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून इरेक्शनचे काम करून घ्यावे कारण महाराष्ट्रातून जम्मू-काश्मीर मध्ये येऊन बीजेएसचे कार्यकर्ते हे काम करू शकत नाहीत. बीजेएसने सर्व साहित्याचा विमा, युनायटेड इन्शुअरन्स कंपनीच्या सहकार्याने उतरविला होता.

मुंबई, दिल्ली येथे बैठका होऊन बीजेएस, जम्मू-काश्मीर सरकार व एन.डी.एम.ए. ने कार्य केले पाहिजे यासंदर्भातील सर्व गोष्टी करारात अंतर्भूत करण्यात आल्या.

प्रत्यक्ष कार्याला सुरुवात :

बीजेएसकडून ठरल्याप्रमाणे शांतिलालजींनी अशोक पवार व त्यांच्या टीमला गुजरातमध्ये पाठवून सर्व शाळांचे प्री फॅब्रीकेटेड मटेरिअल काढण्यात आले. ७०-७५ ठिकाणीच्या शाळांच्या पक्क्या इमारती बांधून झाल्या नव्हत्या, त्यामुळे त्या शाळांचे साहित्य काढता आले नाही. ज्या शाळांच्या पक्क्या इमारती बांधून झाल्या होत्या त्याच शाळांचे साहित्य मुख्याध्यापकांची परवानगी घेऊन, काढून ट्रकमध्ये टाकून गांधीधामपर्यंत पाठविण्यात आले. अशा पद्धतीने १००४ वर्ग खोल्यापैकी जवळपास ७५० वर्गखोल्यांचे साहित्य काढून तीन वेगवेगळ्या मोठ्या स्पेशल ट्रेनने जम्मू काश्मीरकडे पाठविण्यात आले. काश्मीरमध्ये बर्फ पडण्याच्या अगोदर हे सर्व साहित्य तिकडे पाठविले गेले, ही सर्वांत मोठी गोष्ट झाली.

इरेक्शनच्या कार्याला सुरुवात :

संपूर्ण साहित्य पोचल्यानंतर जम्मू-काश्मीर सरकारच्या सहकार्याने इरेक्शनच्या कार्याला तत्परतेने सुरुवात झाली. पहिल्या व दुसऱ्या रेल्वेने आलेले सर्व साहित्य ट्रकने तंगधारला पोहोचते केले तर तिसऱ्या रेल्वेने आलेले सर्व साहित्य ऊरीला पोहोचते केले. बीजेएसच्या श्री. शांतीलाल मुथा व श्री. प्रफुल्ल पारेख यांनी जम्मू-काश्मीरच्या अधिकाऱ्यांसमवेत कंधार, डींगला आणि टीट्वाल येथे कार्याची पाहणी केली. सर्वजण गावकऱ्यांना भेटून कामकाजाविषयी माहिती देत होते.

बीजेएस तर्फे चार जणांची टेक्निकल टीमही पाठविण्यात आली होती. त्यात श्री. धर्मेंद्र आगारे, श्री. सुभाष सोनुने, श्री. गंगवाल आणि श्री. अशोक पवार यांचा समावेश होता. या सर्वांनी व जम्मू काश्मीरच्या रोड आणि बिल्डींग डिपार्टमेंटच्या टीमने संपूर्ण इरेक्शन प्रोजेक्टवर देखरेख करून, प्रत्यक्ष कार्य मार्गी लावले. या संपूर्ण खटाटोपानंतर, सर्वांच्या सहकार्याने व बीजेएसच्या देखरेखीखाली ८७० निवारा खोल्यांचे बांधकाम पार पडले. ३,३४,००० चौ. फूटांचे बांधकाम पन्नास दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले. पंधरा हजार जणांची निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली, या सर्वांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी आखलेल्या कार्यामध्ये भारतीय जैन संघटना पूर्णत: यशस्वी ठरली. भारतीय जैन संघटनेच्या यशामध्ये हा आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला.

मदत कार्यामध्ये भारतीय जैन संघटनेला आलेले अडथळे :

भारतीय जैन संघटना आपल्या नियोजनबद्ध आखणी व अंमलबजावणीविषयी सर्वत्र सुप्रसिद्ध आहे. प्रत्येक मिनिटाचे नीट नियोजन करूनच ते आपल्या कार्याला सुरुवात करतात व त्याप्रमाणे प्रत्यक्ष अंमलबजावणी करतात, तरीही त्यांना खडतर

अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यातील महत्त्वाचे म्हणजे, प्रतिकूल हवामान, वाहतुकीचा प्रश्न, राज्य प्रशासनातील कच्चे दुवे, धार्मिक, सांस्कृतिक व भाषिक अडचणी.

जम्मू-काश्मीर म्हणजे उंच-सखल, डोंगराळ पर्वतीय प्रदेश, एकीकडे खोल दऱ्या तर दुसरीकडे उंच पर्वत. अशा प्रदेशामधून वाहतूक करणे अत्यंत कठीण होते. मोठ्या भूकंपानंतर छोटे-मोठे धक्के बसतच होते, त्यामुळे कडेकोसळून वाहतूक खोळंबवण्याचे प्रकार, मोठमोठ्या रस्त्यांवर वारंवार घडत होते. थंड हवामानामुळे मदत कार्य पोहोचविण्यामध्ये बऱ्याचशा अडचणी होत्या. बऱ्याचशा नियोजनानंतर व काळजी घेऊनही साहित्याची वाहतूक करताना जवळपास ३०% साहित्य खराब झाले. आधीच्या राज्यांमधील प्रशासकीय कार्यपद्धतींच्या असहकार्य व अडथळ्यांच्या अनुभवसिद्धीपेक्षा जम्मूकाश्मीरमधील प्रशासनाने निर्माण केलेले अडथळे बऱ्याच प्रमाणात कमी होते.

बीजेएसने सर्व साहित्याचा विमा उतरविला होता. जे साहित्य खराब झाले होते, ते जम्मू रेल्वे स्टेशनवर वेगळे ठेवण्यात आले होते. तेव्हा बीजेएसला डॅमेज सर्टिफिकेट मिळवायला खूप अडचणी आल्या. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर. मेकॅनिकल विभाग, जम्मू यांचेकडून आलेले डॅमेज सर्टिफिकेट क्लेम सेटलमेंटसाठी पुरेसे नव्हते. यासंदर्भात बीजेएसला बऱ्याचदा पाठपुरावा करावा लागला, कारण इन्शुअरन्स संदर्भातील सर्व निर्णय नॉर्थर्न रेल्वे, पंजाब यांच्यामार्फत होतात. त्यामुळे पुण्यातून या गोष्टींचा पाठपुरावा करावा लागे, या सर्व गोष्टींमध्ये जवळपास आठ महिन्यांचा कालावधी व्यतीत झाला. सामाजिक बांधीलकी स्वीकारल्यानंतर व सर्व बांधवांना तत्परतेने मदतीचे ध्येय स्वीकारल्यानंतर शांतीलालजींना हे सर्व अडथळे मार्गातील काटेही फुलाप्रमाणे भासत होते, कारण त्यांना कार्यपूर्तीनंतर बांधवांना मिळणारे समाधान महत्त्वाचे होते.

समाजाचे आपण काही देणे लागतो आणि ते देणे संकटकाली मदतरूपाने काही प्रमाणात का होईना परत फेडता आले तर त्यासारखे भाग्य नाही, अशा भावनेतून, उदारतेतून, प्रांजळतेतूनच शांतीलालजींनी आपत्तीनिवारणाचे अवाढव्य कार्य सर्व राज्यांमध्ये पार पाडले आहे.

प्रत्येक राज्यातील अनुभव, धडे वेगवेगळे होते.

जम्मू-काश्मीरमधील कार्यातून मिळालेले धडे :

अशासकीय संस्थांना शासनाच्या परवानगीशिवाय कोणत्याही कार्याची उभारणी करणे शक्य नसते व त्यासाठी वेगवेगळ्या विभागांची, वेगवेगळी परवानगी घेणे आवश्यक असते. त्यामुळे एकच फाईल विविध टेबलवरून, इकडून तिकडे फिरत असते. आपत्तीच्या वेळी कार्याचे निर्णय, अंमलबजावणी वेळेत होणे गरजेचे असते, परराज्यातून आलेले कार्यकर्ते, अशासकीय संस्था किती काळ त्याठिकाणी राहणार? त्यामुळे निर्णय लवकर होणे गरजेचे असते. त्यासाठी सिंगल विंडो सिस्टिम आपत्तीदरम्यान अस्तित्वात असणे गरजेचे असते. सरकारी किंवा अशासकीय संस्थांच्या कार्यकर्त्यांना पद्धतशीर ट्रेनिंग देणे गरजेचे आहे.

इन्शुरन्स पॉलिसीमध्ये काही सूचक बदलांची आवश्यकता आहे.

जम्मू काश्मीरमधील प्रचंड हानीनंतर भारतीय जैन संघटनेने हाती घेतलेले मदत कार्य, एवढ्या दूरपर्यंत पोहोचून तेथील लोकांना दिलेला दिलासा व साहाय्य, खरोखरी कौतुकाची व अभिमानाचीच गोष्ट आहे. भारत सरकार, संघटना व जम्मू-काश्मीर सरकार यांच्या संमतीने व सहकार्याने भूकंपग्रस्तांची झालेली निवाऱ्याची सोय म्हणजे मानवतावादी कार्य पार पाडण्यासाठी सर्वांनी संघटितपणे केलेल्या प्रयत्नांचे यश होय!

कठीण वाहतूक समस्या, प्रतिकूल हवामान, कठीण डोंगराळ प्रदेश या सर्व समस्या पार करून भारतीय जैन संघटनेने केलेली

पंधरा हजार जणांची निवाऱ्याची सोय, ही इतिहासात नोंद ठेवण्यासारखी घटना होय. भारतीय जैन संघटना व तिचे अध्यक्ष श्री. शांतीलालजी मुथा यांचे अफाट नियोजन, कार्यपद्धती व सहकार्याची भावना लोकांसाठी नेहमीच कौतुकाचा विषय आहे.

जम्मू-काश्मीर भूकंपादरम्यान ज्या कार्यकर्त्यांनी मदत केली त्यांची नावे:

अ.-क्र.	कार्यकर्त्याचे नाव	अ.-क्र.	कार्यकर्त्याचे नाव
१.	श्री. शांतीलालजी मुथा	१०.	श्री. अरविंद पाटील
२.	श्री. प्रकाशचंदजी सुराना	११.	श्री. एस्.एस्. पवार
३.	श्री. प्रफुल्लजी पारेख	१२.	श्री. पी.एस. बनसोडे
४.	श्री. सुदर्शनजी जैन	१३.	श्री. कदम एस्.डी.
५.	श्री. दीपकजी पारेख	१४.	श्री. पवार ए.जी.
६.	श्री. कांतीलालजी ओसवाल	१५.	श्री. लोभे एस्.सी.
७.	श्री. प्रदीपजी जैन	१६.	श्री. नागमुळे डी.एल.
८.	श्री. कल्याण अहिवाळे	१७.	श्री. सायकर ए.एस्.
९.	श्री. वाघ सुभाष ☆☆☆		

९. मांढरदेवी दुर्घटना

२५ जानेवारी २००५ रोजी मांढरदेवी कानुबाई मंदिराभोवतीच्या दुकानांना आग लागली व ३४० भाविक मृत्युमुखी पडले.

महाराष्ट्रातील वाई तालुक्यात मांढरदेवीच्या डोंगरमाथ्यावर काळूबाईचे प्राचीन मंदिर आहे. अनेक भाविक येथे सातत्याने दर्शनाला येत असतात. महाराष्ट्रातील अनेक लोकांचे काळूबाई हे कुलदैवत आहे. त्यामुळे भक्तिभावाने लोक इथे दर्शनाला येतात. मंदिराला लागून अनेक दुकानांची रांग होती. एका दुकानाला आग लागताच, ती सर्वत्र वाऱ्याच्या वेगाने पसरली. त्याचबरोबर २५ एक गॅस सिलिंडरचा स्फोट झाला व अत्यंत वेगाने सगळीकडे आगीचा भडका उडाला. या घटनेने सगळीकडे हाहाकार माजला. शासकीय आकडेवाडीनुसार २५१ माणसे मृत्युमुखी पडली. त्यात १५७ स्त्रिया व ८८ पुरुषांचा समावेश आहे. सुमारे ५० दुकाने जळून भस्मसात झाली.

बीजेएसचे कार्य :

बीजेएसने दुर्घटनाग्रस्तांची त्वरित सुटका करण्याचे कार्य हाती घेतले. जखमींना औषधोपचारासाठी दवाखाना, हॉस्पिटल्समध्ये हालविण्यात आले. मृतांची ओळख पटविण्यासाठी पोलिसांना, अधिकाऱ्यांना सहकार्य केले. ताजे व स्वच्छ अन्न व पाण्याचा

पुरवठा करण्यात आला. जखमींसाठी तात्पुरते निवारास्थान उभारण्यात आले.

कार्यकर्ते दुर्घटनास्थळी रवाना :

दुर्घटना घडताक्षणीच सुमारे १२५ बीजेएसचे कार्यकर्ते मंदिराकडे रवाना झाले. डॉ. विजय सेठीयांच्या अध्यक्षतेखाली सुमारे २५ डॉक्टर्सची टीम तेथे पोहोचली.

बीजेएसच्या डॉक्टरांच्या टीमने त्वरित प्रथमोपचार करून त्यांना पुढील औषधोपचारांसाठी वाई येथील हॉस्पिटल्समध्ये पाठविण्यात आले.

अन्न पुरवठा :

श्री. अशोक पवार यांच्या नेतृत्वाखाली वाघोलीहून ५० कार्यकर्ते मदत कार्यासाठी मांढरदेवी मंदिराकडे रवाना झाले. WERC चे शिक्षक व विद्यार्थ्यांची ही टीम तयार अन्नाची पाकिटे व अन्न बनविण्याचे साहित्य घेऊन घटनास्थळी पोहोचली. अन्न व पाण्याचा पुरवठा या टीमने दुर्घटनाग्रस्तांना केला.

तात्पुरते निवारास्थान :

बीजेएसने भाविकांसाठी तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था केली. अन्य राज्यांतून आलेल्या भाविकांसाठी अन्न, निवारा व औषधोपचारांची सोय केली. श्री. बाळासाहेब धोका व श्री. रमेश नवलाखा यांनी जखमींसाठी वाई येथे चांगल्या प्रकारची व्यवस्था केली.

बीजेएसने केलेले सहकार्य हे सर्वांसाठी स्मरणात राहील. मंदिराच्या परिसरात नेहमीच फार वर्दळ असते. त्यात मांढरदेवीच्या मंदिराभोवती दुकानांनी खूप गर्दी झाली होती. भक्तिभाव आणि व्यवहार याचे विचित्र समीकरण आपल्याला सर्वत्र पाहावयास मिळते. दुर्घटना ओढवेपर्यंत लोक सुधारणा करीत नाहीत, हेच या दुर्घटनेतून दिसते. त्यातच हे मंदिर डोंगरमाथ्यावर व घाटरस्ता आहे. दुर्घटना घडल्यानंतर अनेक

कार्यकर्ते, राजकीय नेतेमंडळी, सर्वसामान्य जनता टुरिस्ट प्लेस पाहायला चालल्याप्रमाणे दुर्घटनाग्रस्त भागात भेट देत होते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत होती. त्यामुळे जे खऱ्या अर्थाने मदतकार्य पोहोचविण्यासाठी आलेले असतात, त्यांना अडथळा निर्माण होतो. पण आपत्तीच्या निवारणासमयी किंवा दुर्घटना घडल्यानंतर तेथील वातावरण कशा प्रकारे राखावे, याचे भान अजूनही सुशिक्षित जनतेला नाही. बीजेएस यासंदर्भात लोकांना आपल्या प्रत्यक्ष कृतीतून शिकवण देत आहे, हे मात्र निश्चित!

☆☆☆

१०. पूराचे थैमान: महाराष्ट्र व बिहारचे धडे आकडेवारीतून

महाराष्ट्रातील पूरस्थिती व भारतीय जैन संघटनेचे कार्य :

महाराष्ट्रामध्ये एकंदरीत तीन वेळा पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली. २००२ साली अकोल्यामध्ये, २००५ साली कोकण भागात आणि २००६ साली मध्य, उत्तर व पूर्व महाराष्ट्रातील एकूण चोवीस जिल्ह्यांत.

अकोल्यामध्ये अतिवृष्टीमुळे पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. यात अकोल्यातील जवळपास पंधरा गावांचा समावेश आहे, सुदैवाने फारशी जीवितहानी यामध्ये झाली नाही पण शेती, घरादाराचे नुकसान मात्र फार मोठ्या प्रमाणावर झाले.

२६ जुलै २००५ रोजी महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे परिसरात प्रचंड वृष्टी झाली. गेल्या १०० वर्षांमध्ये इतकी वृष्टी महाराष्ट्राने कधी अनुभवली नव्हती. जवळपास ९४४ मिमी. पावसाची नोंद १८ तासांमध्ये झाली. अतिपावसामुळे महाराष्ट्रातील इतर भागांतही, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, येथील धरणे भरली. त्यामुळे धरणांतून पाणी सोडावे लागले. या सर्वांचा परिणाम म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातच पूरस्थिती निर्माण झाली.

प्रभावित क्षेत्र :

मुंबईतील जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले. रस्ते, रेल्वेरुळ संपूर्ण जलमय होऊन गेले. रेल्वेसेवा ठप्प झाली. झोपडपट्ट्या, इमारतींचे तळघर सगळीकडे पाणी शिरले, वाहतूकसेवा पूर्णत: थांबली. याहीपलीकडे वाईट गोष्ट म्हणजे मुंबईतील गटारे तुंबली, घाणपाणी रस्त्यावर येऊ लागले व त्यातून रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झाली. १५० व्यक्तींना आपले जीव गमवावे लागले. ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, भिवंडी या भागातील पाण्याचा निचरा लवकर होत नसल्याने सगळीकडे पाणी साठून राहत होते. तर रायगड, रत्नागिरी, कोकण या भागातील बहुतांश गावे पाण्याखाली गेली. काही ठिकाणी घरांवर दरड कोसळून जीवितहानी झाली तर काही ठिकाणी वाहतूक पूर्णत: ठप्प झाली.

२००६ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे उभरी तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील वीस गावांतील नागरिकांचा पावसामुळे इतर गावांशी संपर्क तुटला होता. पुरामुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडले, शेतीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. त्यात बेलदारा, रहाटी (खुर्द), भायेगाव आणि बोळसा या गावांचा समावेश आहे.

भारतीय जैन संघटनेचे कार्य :

भारतीय जैन संघटना गेली वीसएक वर्षे, आपत्तीग्रस्तांना अन्न, कपडे, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करीत आहे. महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या पूरपरिस्थितीचे अवलोकन करून भारतीय जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी फार मोठ्या प्रमाणात मदतकार्य सुरू केले.

संघटनेचे अध्यक्ष स्वत: श्री. शांतीलाल मुथा आणि कार्यकर्ते त्या त्या भागात जाऊन पाहणी करून, कोणत्या स्वरूपातील मदतीची गरज तात्काळ दिली पाहिजे, हे अवलोकन करीत. आपत्तीग्रस्तांची

तात्काळ सुटका करणे, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविणे, अन्न पुरवठा, कपडे, गरजेच्या वस्तूंची मदत पुरवणे, अशा प्रकारच्या कार्याची आखणी करून त्वरित अंमलबजावणी केली जाई.

स्वत: एकदा श्री. शांतीलाल मुथा व त्यांचे सहकारी कार्यकर्ते पूरग्रस्तांच्या मदतीसाठी कार्य करीत असताना त्यांची गाडी भरपाण्यात रुतून बसली. दारे, खिडक्यांच्या काचा सर्व बंद होऊन गेले, पाणी तर वाढत होते. पलीकडच्या बाजूला उभ्या असलेल्या काही मंडळींच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी त्वरित पाण्यात शिरुन गाडी पाण्यातून बाहेर काढली.

वाघोली केंद्रामध्ये अन्न बनवून ते पाकिटांमध्ये व्यवस्थित पॅक करून, ट्रकमधून विविध ठिकाणी पाठविले जाई. अन्न बनविताना, पॅक करताना, पाठविताना पूर्णत: स्वच्छता व ताजेपणा राहील याची खबरदारी घेतली जात असे.

कोकण विभागामध्ये ज्या व्यापाऱ्यांची दुकाने व दुकानातील साहित्य पुरामुळे वाहून गेले, अशा व्यापाऱ्यांविषयी संघटनेने माहिती गोळा केली. भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते इन्शुरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना भेटले व न्यू इंडिया ॲश्युरन्स कं. आणि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना, व्यापाऱ्यांचे इन्शुरन्स रक्कम त्वरित मिळावी यासाठी विनंती केली. त्याप्रमाणे व्यापाऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई मिळवून दिली. अनेक ठिकाणी किटस् वाटण्यात आले.

सकाळ रिलीफ फंड व BJS :

जिल्हा	तालुका	गाव	किटस्‌चे वाटप
परभणी	सोनापेठ	लोहीग्राम, गोळेगाव, वाडी पिंपळगाव, वाघळगाव, विटा, शिरोरी, शिरसी	३००
	पारथी	नथारा	२००
	निफाड		१५०
नाशिक		चांदोरी	२४०
	सटाना		७०
कोल्हापूर	शिरोळ	बास्नवाड, धरणवाड, टाकळी, खिद्रापूर	५५०
नंदुरबार	शहादा	बुपकारी	५००
चंद्रपूर	कोर्पना	९ गावे	१०००
जळगाव	चोपडा		५००

मदतकार्य करतानादेखील कार्यकर्त्यांनादेखील अनेकविध अडचणींचा सामना करावा लागला. बेलदारापासून रहाटी (खुर्द) हे गाव बारा कि.मी. अंतरावर आहे. तेथे जात असताना उमरी-बेलदारा गावाला जोडणाऱ्या दोन लहान पुलांना पूर आल्याने मदतीसाठी गेलेल्या चमूला रस्त्याच्या कडेला अर्धा तास पाणी कमी होण्याची प्रतीक्षा करावी लागली, तर बोळसा गावापासून एक कि.मी. अंतरावर किट्स घेऊन जाणारा टेंपो चिखलात फसला हे पाहून पूरग्रस्त एक कि.मी.चे अंतर चिखल तुडवीत आले आणि

त्यांनी टेंपो काढण्यास मदत केली. पाऊस आणि चिखलात ४० कुटुंबीयांना किट्स देण्यात आले.

बिहारमधील पूरस्थिती व भारतीय जैन संघटनेचे कार्य :

१९ ऑगस्ट २००८ रोजी बिहारमध्ये प्रचंड प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाली. कोसी नदी, नेपाळमध्ये उगम पावून, बिहारमध्ये येते. परंतु कुशाहा, नेपाळ येथे कोसी नदीवर बांधलेला बंधारा फुटल्यामुळे शेकडो गावे पाण्याने वाहून गेली. गेल्या कित्येक वर्षातील ही बिहारमधील अत्यंत दुर्दैवी घटना होय. पाणी अत्यंत वेगाने वाहत होते की, पूर्ण गावे, घरे, उभी पिके तर वाहून गेलीच पण प्रचंड जीवितहानी झाली.

भारतातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेले राज्य म्हणजे बिहार, त्यामुळे पुरामुळे फार मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. २००४ मध्ये तमिळनाडू, अंदमान-निकोबारमध्ये त्सुनामीवेळी झालेल्या जीवितहानीपेक्षा कित्येक अधिक पटीने जास्त बिहारमध्ये झाली. भारत सरकारने ही राष्ट्रीय आपत्ती म्हणून जाहीर केली.

आपत्तीग्रस्त ठिकाणे :

आपत्तीग्रस्त ठिकाणे :	सुपौल, अरारिया, मधेपुरा आणि पुर्निया
आपत्तीग्रस्त लोक :	१.४ लाख लोक
वाहून गेलेल्या घरांची संख्या :	२,२५,०००

भारतीय जैन संघटनेचे मदतकार्य व सकाळ रिलीफ फंड :

बिहारमधील पूरस्थितीची बातमी ऐकताच भारतीय जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांची पहिली तुकडी मदतकार्यासाठी त्वरित

मधेपूराकडे रवाना झाली. सहसा या ठिकाणी ऑफिस सुरू करून, तिथून मदतकार्य, स्थितीची पाहणी, अंमलबजावणी सुरू झाली. वीस एक हजार लोकांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले.

त्यांना अन्नपाकिटे, कपडे, औषधोपचार पुरवठा करण्यास सुरुवात केली. संघटनेच्या कार्यकर्त्यांना मदतकार्य करताना अनेक अडचणींना, संकटांना तोंड द्यावे लागले. सहर्सा ते कुशावा असे ५० कि.मी.चे अंतर पार करून सर्व कार्यकर्त्यांना मदतकार्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागे. रस्ते अत्यंत खराब झाले होते, त्यामुळे ५० कि.मी. अंतर पार करण्यासाठी देखील ३ तास लागत असत. श्री. अशोक पवार सांगतात की, "प्रचंड पाऊस, प्रतिकूल हवामान त्यामुळे लोकांपर्यंत पोहोचणे फार कठीण असायचे. त्यातही सीतापूर आणि गीतापूर यादोन्ही गावांना जोडणारा पूल कोसळल्यामुळे संपर्क साधणे फार कठीण होते."

भारतीय जैन संघटनेने प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी नेपाळच्या सरहद्दीवर केली. साधारणपणे ३००० लोकांना अन्न आणि औषधांचा पुरवठा येथून करण्यात येत असे परंतु परिस्थिती इतकी भयंकर होती की, बाकीच्या स्वयंसेवी संस्थांनी तिथून काढता पाय घेतला. मात्र मधेपूर जिल्ह्यातील गावकऱ्यांनी संघटनेच्या कार्यकर्त्यांना विनंती केली की, "आम्हांला सोडून जाऊ नका, नाहीतर कोणाचाच आधार राहणार नाही."

औषधोपचार :

ऑक्टोबरनंतर अन्न, वस्त्र पुरवठ्याचे प्रमाण कमी झाले, परंतु तपासणी, आरोग्यतक्रारींचे प्रमाण वाढले. त्यामुळे औषधोपचार सुविधा, मेडिकल कँप स्थापन करावे लागले. पुण्यातून बरेच डॉक्टर्स तिथे जाऊन मदतकार्य करू लागले. ताजे व स्वच्छ अन्नपुरवठ्याबरोबरच संघटनेचे कार्यकर्ते दररोज ५००० जणांना

अन्नपाकिटे पुरवित असतात. यात अर्धा किलो चिवडा, १०० ग्रॅम साखर, फरसाण, कँडल्स, आगपेटींचा समावेश असे. त्याशिवाय पुण्यातील लोकांनी जवळपास १०००० लोकांना वाटता येईल, असे कापड दिले तर काहींनी बादली, भांडी, पांघरुण दिले.

केसर गुलाब मुनोत नेवासकर यांनी ॲम्ब्युलन्स दिली. दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये अन्न, वस्त्र, निवारा यांचे समाधानकारकरीत्या पुरवठा करण्यात आला. भारतीय जैन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या अत्यंत प्रतिकूल व गंभीर परिस्थितीमध्ये, धोकादायक स्थितीमध्ये पूर्वपदावर येण्यासाठी खरोखर अविरत कष्ट घेतले.

श्री. शांतिलाल मुथांची आपत्तीग्रस्तांशी भेट :

रिलीफ कँप आणि मेडिकल कँपला श्री. मुथा यांनी भेट दिली. संघटनेच्या कार्याची बिहार येथील वृत्तपत्रांनी फार मोठ्या प्रमाणावर दखल घेतली. श्री. नितीशकुमार, मुख्यमंत्री, बिहार राज्य यांनी कँपला भेट दिली. ज्या तेजीने मदतकार्य सुरू होते, त्याची त्यांनी भरभरून प्रशंसा केली. जनतादलाचे अध्यक्ष श्री. शरद यादव, आणि श्री. नरेंद्र यादव यांनी देखील कार्याची प्रशंसा केली. स्थानिक लोकांना या कार्यामुळे फार दिलासा मिळाला.

☆☆☆

११. संवेदनशीलतेने आपत्तीला सामोरे जाताना

आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रात कार्यरत असणारी भारतीय जैन संघटना, ही एक स्वयंसेवी संस्था आहे. आपत्तीग्रस्तांना त्वरित मदत मिळावी, जीवित व वित्तहानी कमी व्हावी या हेतूने ही संस्था आपत्ती निवारणाचे कार्य करते.

भारतीय जैन संघटनेचे आपत्ती निवारण कार्यातील ठळक बाबी-

- आपत्तीग्रस्तांची त्वरित सुटका व मदतकार्य पुरविणे.
- आपत्तीमुळे बसलेल्या मानसिक धक्क्यातून लहान मुलांना बाहेर काढणे.
- लहान मुलांचे शैक्षणिक पुनर्वसन करणे.
- प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करणे.

श्री. शांतीलाल मुथा यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झालेल्या भारतीय जैन संघटनेने देशभरामध्ये झालेल्या भूकंपादरम्यान आपत्ती निवारण व आपत्ती व्यवस्थापनाचे फार मोठे व प्रेरणादायी कार्य केले आहे. अत्यंत बारकाईने नियोजन करून, आपत्ती

व्यवस्थापनाचे कार्य त्यांनी पार पाडले आहे. आपत्तीची घटना घडलेली समजताच ते प्रथम वाघोली येथील WERC केंद्रावर सर्व कार्यकर्त्यांची बैठक घेतात व पुढील आराखडा ठरवितात.

१. मदत व सुटका: आपत्तीग्रस्तांची सुटका करणे, त्यांना सुरक्षितस्थळी हलविणे व प्रथमोपचार करणे या महत्त्वाच्या कार्याला बीजेएस प्रारंभ करते.

२. भूकंपग्रस्त भागाची कार्यकर्त्यांकडून पाहणी केली जाते. अहवाल बनविले जातात, कँप उभारले जातात. शासनाकडून मदतकार्यासाठी परवानगी घेतली जाते आणि इतर जणांशी संपर्क साधला जातो.

३. कार्यकर्त्यांची फळी तयार केली जाते. कामे विभागून दिली जातात. कामाचे व्यवस्थित वाटप होते.

४. कार्यकर्त्यांना जबाबदारी आखून दिली जाते. टीमलीडर निवडला जातो व प्रत्येक टीमकडे वेगवेगळ्या कामांच्या जबाबदाऱ्या सोपविल्या जातात.

५. आपत्तीच्या ठिकाणी कार्यकर्त्यांनादेखील फार कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागते. सर्व प्रकारच्या अडचणींतून मार्ग काढून मदतकार्य सुरू ठेवण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्याची, त्यांचे धैर्य वाढविण्याची गरज असते. अशा प्रशिक्षित कार्यकर्त्यांची टीम बीजेएसकडे आहे.

६. मदत कार्य करताना कार्यकर्त्यांनाही अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागते, उदा. वातावरणातील बदल, आवश्यक सोयीसुविधांचा अभाव, अवतीभोवती इतस्तत: पडलेले मृतदेह किंवा आजारी माणसे, संसर्गजन्य रोग फैलावण्याची शक्यता. स्वच्छतेचा अभाव यामुळे कार्यकर्त्यांकडे हे सर्व सहन करण्याची ताकद, क्षमता असणे खूप जरुरीचे आहे.

७. भारतीय जैन संघटना कार्यकर्त्यांची जशी फळी तयार ठेवते तसेच साहित्य वाटपाचे देखील सूत्रबद्धरीत्या नियोजन करते. यामध्ये अंथरुण-पांघरुण, आवश्यक ती भांडी, चहा, साखर, तांदूळ, डाळ, काडेपेटी, कपडे, स्टोव्ह, रॉकेल अशा सर्व साहित्याचे एक कीट तयार करून ते वाटप करणे.

८. रिलीफ कँपची उभारणी- भारतीय जैन संघटना आपत्तीग्रस्त ठिकाणी आपला रिलीफ कँप उभारते. या कँपची उभारणी शक्यतो मुख्य रस्त्याला लागून व गावापासून जवळच्या अंतरावर केली जाते. इलेक्ट्रीसिटी, दळणवळणाची साधने, कॉम्प्युटर्स, फॅक्स मशिनची साधने, जनरेटर अशा सर्व गोष्टींची उपलब्धता कँपवर केली जाते. याशिवाय पूर्वीच्या आपत्तीच्या ठिकाणी केलेल्या कामाचे अहवाल सर्वांच्या माहितीसीठी ठेवले जातात. भारतीय जैन संघटनेच्या नियोजनबद्ध कँपकडे सर्वांचेच लक्ष वेधले जाते. गावामध्ये एकंदरीतच वेगळे वातावरण तयार होते. त्यामुळे मदत साहित्य घेऊन येणारे लोकसुद्धा आपले साहित्य संघटनेच्या कँपवर उतरवितात. कारण संघटनेचे कार्यकर्ते ते साहित्य तपशिलवार वाटप करणार, याची सर्वांना खात्री असते.

९. वाहतूक व्यवस्था- आपत्तीच्या वेळी वाहतुकीच्या साधनांची फार गरज पडते. वाहतूक व्यवस्थेची गरज पडते. भूकंपामुळे बहुतांशी वेळा रस्त्यांचे नुकसान झालेले असते. भारतीय जैन संघटना स्वत:कडच्या वाहनांचा वापर करते, याशिवाय कार्यकर्त्यांच्या वाहनांचाही वेळच्यावेळी वापर केला जातो. बऱ्याचदा डिझेल, पेट्रोलचा खर्च बीजेएसकडूनच केला जातो, पण कधी कधी शासन डिझेल-पेट्रोलसाठी सहकार्य करते.

१०. आर्थिक नियोजन- भारतीय जैन संघटना आपत्तीग्रस्तांच्या सुटका व पुनर्वसनाचे कार्य श्री. शांतीलालजी मुथा यांच्या स्वत:च्या फंडस् व रिसोर्सेसमधून करते. मदत कार्य सुरू झाल्यानंतर वृत्तपत्र समूह, राजकीय नेते, मोठमोठ्या कंपन्या यांच्याद्वारे आर्थिक निधीचे संकलन केले जाते.

वृत्तपत्र समूह किंवा मोठमोठ्या कंपन्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर निधीचे संकलन होऊ शकते. पण या निधीचा योग्य प्रकारे विनियोग करण्याचे काम करण्यासाठी विश्वासार्ह संस्थेची निश्चितच गरज भासते. भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष श्री. शांतीलालजींनी याबाबतीत खूप चांगले नाव व विश्वास कमावला आहे. हाती घेतलेले कार्य अत्यंत तन्मयतेने तडीस नेले आहे. देणगीदारांना दिलेल्या देणगीचे चीज व्हावे, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट बीजेएस तर्फे पूर्ण केली जाते.

म्हणूनच आपत्तीग्रस्तांसाठी बीजेएसचे मदत कार्य हा फार मोठा दिलासा असतो.

बीजेएसतर्फे राबविल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष मदत कार्यामध्ये या बाबींचा नियोजनपूर्वक समावेश केला जातो :

१) आपत्तीग्रस्त भागाचा संपूर्ण सर्व्हे करून परीक्षण अहवाल तयार केला जातो.

२) आपत्तीग्रस्त भागाचा भौगोलिकदृष्ट्या अभ्यास करून त्याबरहूकूम अहवाल तयार केला जातो. या अभ्यासाअंती निष्कर्ष काढला जातो की, आपत्तीग्रस्त भाग IS Code १८९३ प्रमाणे कोणत्या सिस्मिक झोन खाली येतो.

३) आपत्तीग्रस्त भागामध्ये भारतीय जैन संघटना एक मदत केंद्र उभारते. संघटनेचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे. पण तत्कालिन कामासाठी त्या त्या भागात एका मदत केंद्राची आवश्यकता असते.

४) आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसन कार्यासंबंधी निर्णय घेताना संघटनेचे कार्यकर्ते व अध्यक्ष त्या त्या राज्यातील सरकार, जनता, गावकरी यांच्याशी विचारविनिमय करते.

५) आपत्तीग्रस्तांसाठीच्या पुनर्वसनासंबंधित इमारतींचा आराखडा तयार करण्यासाठी प्रख्यात वास्तुरचनाकारांची नेमणूक केली जाते.

६) कंत्राटदारांची नियुक्ती केली जाते.

७) शासन, वास्तुरचनाकार, कंत्राटदार, गावकरी व मदत मिळणारी व्यक्ती या सर्व व्यक्तींशी सतत चर्चा, विचारविनिमय करूनच संपूर्ण पुनर्वसनाचा आराखडा तयार केला जातो.

८) पुनर्वसनाचे कार्य हाती घेताना स्थानिक मंडळींना सहभागी करून घेतले जाते. ज्यामुळे त्यांना काही रोजगार संधी उपलब्ध होतील.

९) मजुरांना प्रशिक्षण दिले जाते. आपत्तीग्रस्त ठिकाणी केले जाणारे बांधकाम हे इतर बांधकामाहून निराळे असते. त्यामुळे अशा बांधकामावर काम करण्यासाठी कुशल मजुरांची गरज असते.

१०) आर्थिक निधीचे संकलन केले जाते व ज्यांच्याकडून आर्थिक निधी मिळवला आहे, त्या देणगीदारांना दर पंधरा दिवसांनी कार्यातील प्रगतीचा आढावा पुरविला जातो.

अशा प्रकारे प्रत्येक आपत्तीग्रस्त भागात मदतकार्य उभारून भारतीय जैन संघटनेने आपल्या प्रत्यक्ष कार्याचा डोंगर शांतीलालजींच्या अध्यक्षतेखाली उभारला आहे. त्यातील प्रमुखकार्य.

१) १९९२ च्या जातीय दंगलींनंतर शांती व सलोख्यासाठी शांतीयात्रेचे आयोजन.

२) WERC वाघोली येथे आपत्तीग्रस्त मुलांसाठी कायमस्वरूपी शैक्षणिक व पुनर्वसन केंद्राची स्थापना.

३) गुजरातमध्ये अवघ्या ९० दिवसांमध्ये ३६८ शाळांची उभारणी.

४) अंदमान-निकोबारमध्ये अडथळ्यांची शर्यत पार करीत, केवळ एका वर्षात ११ शाळा व ३४ प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी केली.

५) जम्मू काश्मीरमध्ये ८७० निवारागृहांची अवघ्या ४० दिवसांत उभारणी.

६) बिहारमध्ये दोन लाखांपेक्षा जास्त पूरग्रस्तांना सहा महिने मदतकार्य पुरवले.

७) मेळघाटमधील कुपोषणग्रस्त मुलांचे शिक्षणासाठी कार्यरत. मेळघाटमधील आदिवासींमध्ये शिक्षण व आरोग्यविषयी प्रबोधन व त्यातूनच क्रांतीकारी बदल घडवून आणले.

८) राज्यसभा व लोकसभा या भारताच्या दोन्ही सभागृहांमध्ये भारतीय जैन संघटनेच्या कार्याची वाखाणणी केली गेली.

९) आपत्ती व्यवस्थापनातील विश्वसनीय संस्था अशी शासन दरबारी बीजेएसची ख्याती झाली आहे.

१०) एका आपत्तीमध्ये वापरलेले साहित्य काढून दुसऱ्या आपत्तीमध्ये वापरण्याचे व वेळ व पैसा वाचविण्याची अत्यंत कल्पक योजना भारतीय जैन संघटनेने दिली आहे.

आपत्ती व्यवस्थापन कार्यामध्ये बीजेएसपुढे उभी ठाकलेली आव्हाने :

आकस्मित उद्‌भवलेल्या आपत्तींना सर्वतोपरी साहाय्य करणे, त्या संपूर्ण परिस्थितीला कडवा सामना करून धैर्याने झुंज देणे ही खरोखरच कठीण बाब आहे. पण भारतीय जैन संघटना व अध्यक्ष शांतीलालजी यांनी ज्या आत्मविश्वासाने, नियोजनबद्धरीत्या या कठीण परिस्थितीला तोंड दिले ते खरोखरी महद्‌आश्चर्यच होय!

आपत्ती एकटी येत नाही, ती संकटांची मालिकाच घेऊन येते. पण अशा वेळी फक्त भावनिक होऊन चालत नाही. भावना व प्रत्यक्ष अनुभव नेहमीच वेगळे असतात. समोर येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी आव्हाने पेलण्याची ताकद, क्षमता, धैर्य अंगी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच चिकाटी, असीम उत्साह व अमाप धैर्य बाळगून शांतीलालजींनी प्रत्येक आव्हानांचे रूपांतर यशात करून दाखविले.

अ) प्रशासकीय आव्हाने :

१) परवानगी, कागदपत्रांची पूर्तता व माहितीची गोळाबेरीज:

स्वयंसेवी संस्थांना काम करताना शासनाची परवानगी घ्यावी लागते. बऱ्याचदा निर्णयप्रक्रियेतील विलंब, नियोजनाचा अभाव, परिस्थितीचे स्वरूप, आपत्तीग्रस्त विभागाच्या नकाशाचा अभाव, या सर्व गोष्टींमध्ये सुसूत्रतता नसल्यामुळे स्वयंसेवी संस्थांना काम करताना अडचणी येतात. शासनाची मदत घ्यावयाची तर कागदपत्रांची पूर्तता, परवानगी अशा गोष्टी कराव्या लागतात. बऱ्याचदा स्वयंसेवी संस्थांना काम करण्यास

शासनाचा नकार असतो याशिवाय आपत्तीच्या ठिकाणी उभारण्यात आलेली शासकीय कार्यालये ही तात्पुरती असतात. अत्यावश्यक सोयी-सुविधांचा तेथे अभाव असतो.

२००४ मध्ये जेव्हा त्सुनामीचा तडाखा बसला तेव्हा, Direct Relief International या अमेरिकास्थित संस्थेशी संलग्न राहून बीजेएसने सुमारे दोन कोटी रुपयांची परदेशातून औषधे मागवली. परंतु चेन्नई बंदरातच ती पडून राहिली. औषधांची Expiry Date होत आली तरी तमिळनाडू सरकारकडून कोणतीही निर्णयप्रक्रिया झाली नाही.

२) सरकारी नोकरवर्गाची बदली:

पुनर्वसनाचे किंवा मदतकार्याचे एखादे कार्य हाती घेतल्यानंतर ते पूर्ण व्हायला साधारणपणे एक ते दीड वर्षांचा कालावधी लागू शकतो. पण दरम्यानच्या काळात सरकारी अधिकारी वर्गाची बदली झाली तर, संपूर्ण काम रेंगाळते किंवा नवीन येणाऱ्या अधिकाऱ्याने समजून घेऊन प्रक्रिया पार पाडण्यास फार वेळ जातो.

ब) वाहतूक सुविधांचा अभाव :

आपत्तीग्रस्तांपर्यंत कोणतेही साहित्य पोहोचवायचे असल्यास वाहतुकीमध्ये अनेक अडथळे येतात. अंदमान-निकोबारमध्ये शाळांच्या व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी हैद्राबादहून साहित्य न्यावे लागे. हे सर्व साहित्य चढविण्या-उतरविण्याची कसरत तर करावी लागलीच पण दुर्गम व डोंगराळ प्रदेशापर्यंत साहित्य पोचवून, प्रत्यक्ष बांधकाम करेपर्यंत वाहतूक, मजूर, सोयीसुविधांचा अभाव असे अनेक प्रश्न उभे राहिले. शासनाची मदत वा

सहकार्य मात्र इथे कोठेच मिळाले नाही! एकीकडे स्वयंसेवी संस्थांना काम करण्यास परवानगी नाकारली जाते, दुसरीकडे शासनाकडून उत्कृष्ट दर्जाचे व वेळेत काम पूर्ण होत नाही आणि यावरही महत्त्वाचे म्हणजे बीजेएस सारख्या ज्या स्वयंसेवी संस्था काम करतात त्यांनाही मदत वा सहकार्याचे धोरण ठेवले जात नाही!

क) मजुरांचा अभाव :

मजूरांचा अभाव ही फार मोठी समस्या वा डोकेदुखी आपत्तीच्या ठिकाणी काम करताना अनुभवायला मिळते. एक तर परराज्यात जाऊन महिनोन्‌महिने राहून कार्यकर्ते कार्यभार सांभाळू शकत नाहीत, त्यासाठी स्थानिक जनतेची मदत घ्यावी लागते. पण स्थानिक जनता बऱ्याचदा मदत घेण्याच्या रांगेमध्ये थांबलेली असल्याने, कामासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो!

ड) पुनर्बांधणीचे कार्य :

भारतीय जैन संघटनेने देशभरामध्ये उद्‌भवलेल्या आपत्तींमध्ये कार्य केले आहे. प्रत्येक राज्यातील आपत्तींच्यावेळी नवी आव्हाने, नव्या समस्या, नवीन परिस्थिती कार्य करताना बीजेएससमोर उभी ठाकलेली आहे. भूकंपासारखी आपत्ती कोसळल्यानंतर सर्व गावेच्या गावे बेचिराख होतात, घरे, शाळा उद्‌ध्वस्त होतात. या घरांची, शाळांची पुनर्बांधणी करण्याचे मोठे आव्हान सर्वांसमोर असते.

अशा वेळी पुनर्बांधणीसाठी आवश्यक अशा जमिनीची उपलब्धता, हे मोठे आव्हान असते. बिहारमध्ये पूर आल्यानंतर मल्टी-युटीलिटी कम्युनिटी सेंटर उभारणीचा

प्रस्ताव बीजेएसने दिला. परंतु त्यासाठी बिहार शासनाकडून जमीन मिळण्याचा प्रस्ताव अजूनही प्रलंबित आहे.

गावांमध्ये घरे कोसळल्यानंतर, त्या त्या ठिकाणी पुनर्उभारणी करताना तलाठी, सरपंच, जनता या सर्वांपासून ते राजकीय नेते, कलेक्टरपर्यंत परवानगी घ्यावी लागते. यामध्ये फार वेळ तर जातोच पण निर्णय प्रक्रिया चांगल्या प्रकारे पार पडेल की नाही याची शाश्वती नसते.

इ) इतर स्वयंसेवी संस्थांबरोबर कार्य करताना :

आपत्ती निवारणासाठी मोठ्या प्रमाणावर साहित्य व मदत घेऊन बऱ्याचशा छोट्या-मोठ्या स्वयंसेवी संस्था दुर्घटनास्थळी धाव घेतात. अशा वेळी शासन या सर्व स्वयंसेवी संस्थांना योग्य प्रकारचे काम वाटप करून देण्यामध्ये कमी पडते. त्यामुळे मदतीचे प्रमाण कमी-जास्त होत राहाते, किंवा स्वयंसेवी संस्थांमध्येच स्वत:चे नाव करून घेण्यासाठी स्पर्धा सुरू होते.

फ) विम्याची सुविधा :

भूकंपाच्या आपत्तीच्या ठिकाणी बऱ्याचदा पुन्हा पुन्हा भूकंपाचे धक्के जाणवत राहतात. त्यामुळे अशा ठिकाणी काम करणे ही खरे तर मोठी धोक्याची गोष्ट असते. रोगांचा प्रादुर्भाव, जीविताला धोका अशा परिस्थितीत काम करताना कार्यकर्त्यांना त्वरित विमासुविधा उपलब्ध होणे गरजेचे असते.

ग) हवामान :

भूकंपाच्या ठिकाणी हवामानामध्ये सातत्याने बदल घडून येत असतात. ऑक्टोबर २००५ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या भूकंपामध्ये याची प्रचिती आली. लोकांना निवारा नव्हता व थंडी वाढत होती. बीजेएसने गुजरातमधून

प्रीफॅब्रीकेटेड मटेरिअल जम्मू काश्मीरमध्ये त्वरित नेऊन, तेथील लोकांसाठी निवाऱ्याची व्यवस्था केली. तर बिहारमध्ये प्रचंड पाऊस, प्रचंड थंडी व धुक्याचे प्रमाण वाढलेले अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पण अशा विचित्र हवामानाशी जुळवून घेत कार्यकर्त्यांना मदत कार्य पुढे न्यावे लागते.

ह) लहान मुलांचे पुनर्वसन :

आपत्तीनंतरची सर्वांत मोठी आपत्ती म्हणजे लहान मुलांना बसलेला मानसिक धक्का व इतस्ततः पडलेले मृतदेह, उद्ध्वस्त घरे, आर्मी-पोलिस यंत्रणा हे सर्व पाहून त्यांच्या मनावर होत असलेला खोलवर परिणाम!

या गोष्टीचा विचार प्रामुख्याने शांतिलालजींनी केज व लातूर, गुजरात, जबलपूर, जम्मू-काश्मीर मधील मुलांना यातून बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

यातील महत्त्वाची उपाययोजना त्यांनी केली, ती म्हणजे मुलांना आपत्तीग्रस्त वातावरणातून बाहेर काढून, पुण्यासारख्या शहरी भागात आणून त्यांचे पुनर्वसन केले. त्यांचे शिक्षण पूर्ववत सुरू केले व शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या जगण्याला नवी उमेद दिली.

शांतीलालजींनी वाघोली येथे WERC ची उभारणी केली व या संपूर्ण पिढीचे उज्ज्वल भवितव्य घडविले!

भारतीय जैन संघटनेने आत्तापर्यंतच्या आलेल्या अनुभवातून सुचविलेल्या काही उपाय योजना-

स्वयंसेवी संस्थांना मदत कार्य करताना शासन, स्थानिक जनतेचेही सहकार्य मिळणे आवश्यक असते. त्यासाठी नव्याने काही तरतूदी करणे गरजेचे आहे.

१) आपत्तींची पूर्व सूचना मिळण्याची यंत्रणा संशोधिक करणे गरजेचे आहे.

२) आपत्तीग्रस्तांच्या सुटका व मदत कार्यासाठी काही धोरणात्मक निर्णय व नियमावली ठरविण्याची आवश्यकता आहे. शासनाची जबाबदारी, कार्य काय? स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी, कार्य काय? व जनतेच्या सहकार्याविषयी काही नियम असणे गरजेचे आहे. उदा. जनतेकडून वाहतुकीची कोंडी होते, मदतकार्य करण्यासाठी त्यामुळे आर्मी, होमगार्ड यंत्रणा वेळेत पोहचू शकत नाही.

३) शासनाकडून परवानगीसाठी एक खिडकी योजना हवी.

४) शासकीय कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

५) प्रसारमाध्यमांनी बॅलन्स्ड् रिपोर्टिंग करणे गरजेचे आहे. भावनावश होऊन बातम्या प्रसिद्ध करणे योग्य नाही. प्रिन्स मिडीया आणि इलेक्ट्रानिक मिडीया यांनी एकत्रितपणे कार्य करणे गरजेचे आहे. परदेशांतील बातम्या देण्याच्या पद्धतींचा अभ्यास व्हायला पाहिजे. ९ नोव्हेंबरला अमेरिका येथे वर्ल्ड ट्रेड सेंटर संदर्भातील व तद्नंतरच्या कॅटरिना आपत्तीसंदर्भातील बातम्या या अतिशय बॅलन्स्ड् होत्या. इंग्लंडमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर नुसतेच मृतदेहांचे अवशेष दाखविले जात नव्हते. तर बातम्यांमध्ये देखील विशिष्ट नियम पाळलेले दिसतात.

लातूरमध्ये जेव्हा मृतदेहांच्या अग्नीसाठी लाकडांची कमतरता होती, तेव्हा बातमी प्रसृत झाली. तद्नंतर एवढा लाकूडफाटा जमा झाला की ठेवायला जागा नव्हती. गुजरातमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. त्यासंदर्भात जेव्हा पेपरमध्ये बातमी आली, तेव्हाही अशीच परिस्थिती उद्भवली. पाण्याच्या बाटल्यांचा ओघ सुरू झाला. त्यामुळे

बातम्या देताना परिणामांचा विचार करून बातम्या दिल्या गेल्या पाहिजेत.

६) स्वयंसेवी संस्था व शासन यांच्यामध्ये व्यवस्थित Co-ordination करण्यासाठी मध्यस्थी संस्थांची गरज आहे.

७) अत्याधुनिक संपर्कयंत्रणा व दळणवळणांच्या साधनांचा वापर, तात्काळ संपर्क साधण्यासाठी केला पाहिजे.

८) दवाखाने, हॉस्पिटल्स, तसेच अत्याधुनिक उपकरणांद्वारे त्वरित उपचारांना प्राधान्य दिले गेले पाहिजे.

९) सर्व स्वयंसेवी संस्था, देणगीदार, भागीदार यांच्याबद्दलचा व त्यांनी केलेल्या कार्याबद्दलचा डेटा तयार ठेवणे जरूरी आहे.

१०) शासनाचा प्रतिनिधी या नात्याने कलेक्टरला प्रसार माध्यमांना सामोरे जावे लागते. मंत्री, आमदारांपुढे अहवाल, कामाचा पाठपुरावा सादर करावा लागतो. त्यामुळे वेळ तर जातो पण प्रत्यक्ष कार्यासाठी वेळ कमी मिळतो. सातत्याने इतर कामाशी संलग्न राहावे लागते. या बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

११) इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, नैसकॉम, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीची असोसिएशन, केमिस्ट लोकांची असोसिएशन, डॉक्टर्सची असोसिएशन- या सर्वांना आपत्ती व्यवस्थापनात सामावून घेतले गेले पाहिजे.

१२) बऱ्याचदा आपत्तीग्रस्तांना प्रत्यक्ष मदत मिळण्यास किंवा मदत त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यास अडचणी येतात. त्यामुळे ज्यांना प्रत्यक्ष मदत लवकर मिळाली नाही व नुकसान झाले असेल तर त्यांनी कोणाकडे जायचे? यासाठी नॅशनल लिगल ॲथारिटीजची निर्मिती केली गेली आहे. त्याचप्रमाणे राज्यस्तरावर स्टेट लिगल ॲथॉरिटीज, जिल्हास्तरावर डिस्ट्रीक्ट लिगल ॲथॉरिटी, तालुका पातळीवर तालुका

लिगल ॲथॉरिटीची नेमणूक केली आहे. या ॲथॉरिटीज व स्वयंसेवी संस्थांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण तयार होणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्थांनी या ॲथॉरिटीजच्या माध्यमातून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नरत राहिले पाहिजे.

१३) सरकारने १०० IAS अधिकाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले पाहिजे व अशा प्रशिक्षित खअड अधिकाऱ्यांची आपत्तीच्या ठिकाणी त्वरित नेमणूक केली पाहिजे.

१४) राज्याच्या मुख्यमंत्र्यासमोर निर्णय काय घ्यावेत, कसे असावेत यासंदर्भात विशिष्ट मार्गदर्शन पत्रिका, नियमावली तयार असायला हवी.

१५) मुलांच्या शाळा पंधरा दिवसांच्या आत सुरू करून मुलांना शाळेत नेऊन बसवले पाहिजे.

१६) "कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी" असणाऱ्या कंपन्यांकडून सरकारने देणगी अथवा पैसे रूपात मदत घेण्यापेक्षा त्यांना गावे दत्तक देऊन त्या गावांच्या सर्वांगीण विकास घडवून आणण्याची मुथा दिली पाहिजे.

१७) स्वयंसेवी संस्थांना इन्कम टॅक्स, सर्व्हिस टॅक्स, एक्साईज ड्युटी, सेल्स टॅक्स यामधून त्वरित सवलत दिली पाहिजे.

१८) आपत्तीग्रस्त गावाची लोकसंख्या आपत्तीनंतर दीडपटीने वाढते. तलाठ्याच्या शिफारशीवरून काही मंडळींना घरे मिळतात. अशा गोष्टींवर चांगल्या प्रकारचा वचक असला पाहिजे.

१९) एखादी व्यक्ती पुन्हा पुन्हा सामान/ साहित्य घेऊन जाते. यासाठी बीजेएसने एक रेशन कार्ड तयार केले. तारखेप्रमाणे वस्तू घेऊन जाण्यास सांगितले. अशा तरतुदी व त्यांची अंमलबजावणी सरकारतर्फेही होणे आवश्यक आहे.

२०) बीजेएसकडे वाघोली येथे आपत्तीशी निगडीत सर्व प्रकारचे साहित्य तयार आहे. जनरेटर, तंबू, अन्न बनविण्यासाठी

लागणारी भांडी, मदतीचे किट असे ट्रकभर सामान तयार आहे. प्रशिक्षित कार्यकर्त्यांची टीम आहे. देशभरातील सर्व जैन स्वयंसेवकांशी दळणवळण, संपर्क यंत्रणा आहे. त्यामुळे आपत्तीनंतर त्या त्या भागातील स्वयंसेवक अवघ्या दोन तासांत सर्व साहित्यानिशी तिथे पोहोचून मदत कार्य सुरू करू शकतात. याप्रकारचे नियोजन व व्यवस्थापन सरकारकडेही असणे अत्यंत जरूरी आहे.

श्री. शांतीलालजींच्या आपत्ती व्यवस्थापन व नियोजनाच्या संदर्भातील कार्याचा गौरव लोकसभेने ठरावाद्वारे केला. महाराष्ट्र विधानसभेमध्ये सर्व राजकीय पक्षांनी शांतीलालजींच्या कार्याची प्रशंसा केली. शांतीलालजींनी आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात जे व्याख्याने दिली आहेत, त्याबरहुकूम अंमलबजावणी सरकारचे रेव्हेन्यू डिपार्टमेंट करते, हा शांतीलालजींचा कार्याचा, नियोजनबद्ध सुसूत्रतेचा निश्चितच गौरव आहे.

भारतीय जैन संघटनेच्या भविष्यातील योजना व कार्याची दिशा :

भारतामध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या कोणताही पदवीपर्यंतचा कोर्स नाही, असा पदवीपर्यंतचा कोर्स सुरू करण्याचा विचार करीत आहे.

भारतीय जैन संघटना आपत्ती व्यवस्थापना संदर्भात ट्रेनिंग इन्स्टिट्यूट सुरू करण्याची योजना आखीत आहे. या ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये प्रसारमाध्यम, शासन व कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासंदर्भात अभ्यासक्रम विचाराधीन आहे.

सर्व स्वयंसेवी संस्था, गव्हर्नमेंट एजन्सी यांच्यासंदर्भात मॅन्युअल तयार करणे.

☆☆☆

१२. उपसंहार

आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात शांतीलालजींनी केलेले देशभरातील कार्य हे सर्वांसाठी आदर्श होय.

एखाद्या ठिकाणी घडलेल्या आपत्तीची त्वरित माहिती घेऊन, कार्यकर्त्यांना सूचना देऊन, अवघ्या दोन-तीन तासांत आपत्तीग्रस्त भागात सर्व तयारीनिशी, साहित्यानिशी पोहोचण्याची त्यांच्याकडील हातोटी ही खरोखरी विलक्षण होय!

प्रत्यक्ष आपत्तीग्रस्त भागात मदतकार्य सुरू करून, साहाय्य, सहकार्य देण्यामध्ये ते स्वत: अग्रणी असतात. आपत्तीग्रस्त ठिकाणी सुटका, मदतकार्य, अन्नपुरवठा, साहित्य वाटप, निवाऱ्याची व्यवस्था या अत्यंत गरजेच्या व जीवनावश्यक गोष्टींसदर्भातील कार्य सुरळीतपणे सुरू करून, ते लहान मुलांकडे वळतात. आपत्तीत सापडलेल्या लहान मुलांना मानसिक, भावनिक धक्का बसून, त्यांचे पुढील आयुष्यावर परिणाम होऊ नये म्हणून ते मुलांच्या शाळा सुरू ठेवण्याबद्दल आग्रही असतात. त्यांचे यामागचे विचार व दृष्टिकोन अतिशय उदार आहेत. देशाची भावी पिढी बरबाद होताना त्यांना पाहायची नाही तर देशाचे भवितव्य उज्ज्वल बनवायचे आहे. त्यामुळे त्यांनी लातूर, जबलपूर, गुजरात, अंदमान-निकोबार व जम्मू-काश्मीर येथील

आपत्तीग्रस्त मुलांच्या शिक्षणाची सोय हा प्राधान्यक्रम ठरविला. वाघोली येथे शैक्षणिक व पुनर्वसन प्रकल्पाची उभारणी केली. आपत्तीग्रस्त नव्हे तर कुपोषणग्रस्त मुलांनाही या शाळेमध्ये प्रवेश दिला.

या मुलांच्या राहण्या-खाण्या पिण्याच्या, कपड्यालत्याच्या, पुस्तकांच्या सर्व खर्चाची जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर पेलली. शांतीलालजींनी केलेले हे कार्य भावी पिढीसाठी निश्चितच दिशादर्शक, आदर्श असेच आहे. त्यामुळेच शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे. एखाद्या ठिकाणी उद्‌भवलेल्या आपत्तीचे निवारणकार्य करण्याचे कामी शासन भारतीय जैन संघटनेची मदत विचारात घेते, हा संघटनेच्या कार्याचा निश्चितच गौरव आहे.

जैन जीवनपद्धतीमध्ये अहिंसा, दान व सत्य यांचा आग्रह, अस्तेयाचे तत्त्व, विचार-आचार-उच्चार यांचे पावित्र्य यांना महत्त्व आहे. या तत्त्वांना प्रत्यक्ष जीवनामध्ये शांतीलालजींनी अंगिकारल्याचे निश्चितपणे जाणवते.

☆☆☆☆

विश्वाचे अनादित्व व अनंतत्व हे सारे आपल्याला मान्य करावे लागते. पण यासर्वांत समाजाविषयी संवेदनशीलतेने कार्यरत राहण्यातच शाश्वतत्त्व अंतर्भूत आहे. समाजविषयक कर्माचा उगम व्यक्तिगत गुणधर्मांपासून होतो. समाजाची आणि साऱ्या जगताची सुस्थिती कायम राखण्यासाठी प्रत्येक व्यक्ती व त्याची कृती या गोष्टी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत

Chintamani Hasabnis / 9422002185